काम संपले की
मोकळा वेळ खायला उठतो.
एवढे मोठे शहर
परंतु एक उडपी नाही.

शनिवार
८ मे १९७१
५० पैसे

सर्व उडप्यांचे इराण्यांचे
राष्ट्रीयीकरण करून
विकेंद्रीकरण केले पाहिजे.
उडपी नाही, इराणी नाही तिथे
माणसांनी जगावे कसे ?
पाय मोकळे करण्यासाठी
एरोड्रोमवर गेलो.
तिथे काही युरोपियन पत्रकार होते.
त्यांच्याशी तर्खडकरांना
आठवून विचार-विनिमय
करू लागलो. एवढयात
बंबार्डिंगचे आवाज येऊ लागले.
ब्राह्मणबेरियावर
पाक विमाने बॉम्ब
टाकीत होती.....



प्लसी ते डाक्का —

## सप्रेम नमस्कार....

▫ मी माणूस साप्ताहिकाचा एक चाहता आहे, तसेच वार्षिक वर्गणीदारही आहे. आपणास मुद्दाम पत्र लिहिण्याचे कारण की, आपला शनिवार ता. २४।४।७१ चा अंक नेहमीप्रमाणेच अत्यंत आतुरतेने वाचला व अतिशय समाधान झाले. माझ्या मताप्रमाणे आजपर्यंतच्या (मी वाचलेल्या) अंकातील हा सर्वात सरस असा हा अंक आहे. अंकातील सव कथा अत्यत आवडल्या परंतु मनाला एकच गोष्ट खटकलं, ती म्हणजे आपल्या क्रिकेट टीमने यदा जागतिक व भारताच्या इतिहासातला एक मोठा विक्रम करूनसुद्धा माणूस त्याबद्दल एक अक्षरही बोलण्यास तयार नाही याबद्दल फार खेद वाटतो. कृपया याबद्दल दखल घ्यावी ही विनंती. 'जिप्सी मधुकांत' यांचा लेख विशेष करून आवडला.

२५ एप्रिल, ७१ — धनंजय आगवेकर, पोफळी

▫ दि. २४ एप्रिल ७१ च्या अंकातील कथा जवळ जवळ तंतोतंत इंग्रजी नियतकालिकात वाचल्यासारखी


किमत पन्नास पैसे

शनिवार ८ मे १९७१

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये

परदेशची वर्गणी पंचेचाळीस रुपये

# माणूस

वर्ष : दहावे
अंक : एक्यांशीवा (८१)

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

वाटते. बहुधा Sunday Standard मध्ये असावी.

आपल्या मुखपृष्ठावर एक छोटी अनुक्रमणिका द्यावी. जुना लेख शोधण्यास त्याने मदत होईल.

भविष्य, लघुकथा हे प्रकार बहुतेक मासिके–साप्ताहिकात असतातच. इतरत्र जे वाचावयास मिळत नाही ते माणूसमध्ये मिळते म्हणून माणूसची लोकप्रियता. त्यात हे दोन निव्वळ जागा अडवणारे प्रकार कशाला? ओम, श=मप्र [2] व विज्ञान हे आपले धोरणच चालू रहावे. जेवढे मौल्यवान तेवढेच छापावे, मग पाने ६० भरली नाहीत तरी बिघडत नाही.

२७ एप्रिल, ७१ — म. दि. माटे, दिल्ली

□ २४–४–७१ चा माणूस पाहिला. 'प्लासी ते डाक्का' ही अनिल बर्वेंची लेखमाला सुरू झाल्यामुळे माणूसच्या वाचकांना सत्य समजू शकेल.
रविंद्र पिंगे यांची लेखमाला महानगर कलकत्ता फारच आवडली. महाराष्ट्रीयांना बंगालची शल्ये, दुःखें यांची ओळख फक्त माणूसच करून देत आहे.
वरील दोन्ही लेखमाला सुरू केल्याबद्दल अभिनंदन!
संतप्त तरुणांना योग्य न्याय व त्यांचे मूल्यमापन करण्याची आपली प्रथा इतरांना विचार करण्यास, अंतर्मुख होण्यास लावते.
वरील लेखमालांबद्दल आपले पुनःश्च अभिनंदन!!

२५ एप्रिल, ७१ — मोरेश्वर दाते, सोलापूर

आपल्या 'माणूस' मधली दि. १७–४–७१ मा अंकातील 'हुतात्मा' ही गोष्ट वाचली, तसेच आपल्या मागील काही अंकातील गोष्टी वाचल्यावर, मला जुन्या काळच्या इंग्लिश रीडर–क्रमिक पुस्तकांची (मॅकमीलन) आठवण झाली. त्यामध्ये राम व अबदुल या दोन मुलांवर आधारलेल्या काही बोधपर गोष्टी असत. त्यात नेहमी अब्दुल्ला हा सद्गुणी तसेच हुषार दाखविला जात असे. इंग्रजी प्रचाराचे धोरण तसे होते म्हणून मुसलमान मुलगा सद्वर्तनी दाखविला जाई.

मला वाटते की इंग्रज जाऊनही फारसा बदल झाला आहे असे वाटत नाही.

जगात, भारतात समजली जाणारी एकमेव अल्पसंख्य जमात बहुसंख्य होऊ इच्छिते. जगाच्या नकाशावर हिरवा रंग जास्तीत जास्त फासण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न चाललेला आहे. त्याला बरेचसे यशही येत चालले आहे. त्यांच्या राजकारणाचा प्रधान हेतू हा आहे–त्यांच्या आड येतील ते शत्रू. प्रचलीत राज्यकर्तेही (या देशातील) नाकर्तेपणाच्या कृतीने या गोष्टीस हातभार लावीत आहेत. सर्वांना समान कायदा नाही–त्रिकोणाची सक्ती ही ठराविक समाजालाच, वगैरे वगैरे–आकडे.

शास्त्रज्ञांनेही या गोष्टीकडे असावे तसे लक्ष दिसत नाही.

साहित्यातील शिष्टसंमत लोक शिष्टाचार प्रदर्शनाच्या नावाखाली हीच गोष्ट करतात. प्रत्यक्षपणे अन्यायी, तैमूरलंगी वृत्तीच्या लोकांवर प्रहार–वाङ्मयीन–करण्याची ताकद, धैर्य नाही–तसा प्रचार करणे त्यांना अशक्य–गैरसोईचे होत असावे मग निदान त्यांनी स्वस्थ तरी बसावे, तर तेही होत नाही.

एक 'हिंदू' याची व्याख्या कै. अण्णासाहेब भोपटकर करत असत, त्याची आठवण होते. ज्या समाजातील घटकाला नेमके आपले फक्त हित कळत नाही तो 'हिंदू' समजावा.

आपण 'हुतात्मा' यासारख्या गोष्टी कशास छापता–या योगे जबलपूरला झालेल्या एक अनर्थाबाबत उगीच लोकांच्यात अहितकारक असा संशय मात्र यामुळे उत्पन्न होतो.

आपल्या मनात तसे नसतानाही मी म्हणतो तसा परिणाम होण्याचा संभव–आपण स्वतः गोष्टी वाचत नसाव्यात.

बाकी सर्व अत्युत्तम असे साहित्य आपल्या 'माणूस' मधून वाचावयास मिळते–फक्त गोष्टींचा भाग हा तितकासा चांगला नसतो. वाटल्यास हा भाग काढावा.

२७ एप्रिल, १९७१ — मो. ग. कानिटकर, पुणे

◻ ◻ ◻

## साप्ताहिक माणूस : वर्गणीचे दर

| | | | |
|---|---|---|---|
| पाच वर्षे : | १००–०० | वार्षिक : | २५–०० |
| तीन वर्षे : | ६०–०० | सहामाही : | १५–०० |
| दोन वर्षे : | ४५–०० | परदेशी जलमार्गे वार्षिक : | ४५–०० |

- ◻ ३१ ऑगस्ट १९७० नंतरच्या ज्या वर्गणीदारांनी रुपये तीस वार्षिक वर्गणी पाठविली आहे त्यांची वर्गणीची मुदत तीन महिन्यांनी वाढवून घेतलेली असून त्याप्रमाणे नोंदवहीत फेरबदल करण्याचे काम चालू आहे.
- ◻ नवीन वर्गणीची रक्कम शक्यतो ड्राफ्ट वा म. ऑ. ने पाठवावी. कार्यालयात रोख भरणा करण्यासही हरकत नाही. चेकनेच रक्कम पाठविणे सोयीचे वाटल्यास बँक कमिशन एक रूपया अधिक हिशोबी धरावे.
- ◻ चेक, ड्राफ्ट 'साप्ताहिक माणूस' या नावावर पाठवावा.
- ◻ पत्रव्यवहार करताना आपला वर्गणीदार क्रमांक शक्यतो कळवावा.

# प्लासीते ढाक्का



पुर्बेर आकाश सूर्य उठे छे,

आलोके आलोकमय.

जब जय जय जय बांगला जय !

पूर्वेला उगवता सूर्य स्वातंत्र्याचा – त्याला अर्घ्य सहस्रवीर देशभक्तांचे – निर्वासितांच्या लांबलचक रांगा – सनसनाटी बातम्यांसाठी अधीर पत्रकार – केविलवाणी बायाबापुडे – लांब दुर कोसावर 'अखराची' सरहद्द !

अखरा,

फाळणीपूर्वीचे जकातनाके – क्वचित कारकुनास अधेली मिळायची. आता मात्र

# असहकार आंदोलनाचे शिपायांच्या बंडात झालेले स्थित्यंतर

## अनिल बर्वे : लेखांक तीन

आंतरराष्ट्रीय सरहद्द ! स्मगलरांशी झटायला 'बॉर्डर सिक्युरिटी फोर्स' – आणि स्मगलींग तरी कसले ? बोचकभर तांदूळ – टोपडीभर मासळी – मडक्यातुन चंदी. या दारिद्र्याला हसावे का रडावे ?

सरहद्दीपासून आत तीन मैलांवर 'अखवरा' रेल्वे जंक्शन आहे. बारा मैलावर 'ब्राह्मणबारीया' आहे – पेट्रोल व गॅसचे साठे असलेल्या या शहरवजा गावावर आजपर्यंत दोन वेळा पाक फौजांनी बंबार्डिंग केले आहे. खाली चाळीस मैलांवर 'कोमील्ला.' ज्या करता दोन्ही सैन्ये जिवाचे रान करीत आहेत.

निर्मनुष्य पट्ट्यात पाऊल टाकले नी थबकलो – वर फडकत होता झेंडा हिरवा पाकिस्तानचा, नव्हे विप्लवी बांगलाचा.

'हा ध्वज केव्हा फडकावला ?' मी एका शिपायाला विचारले. 'पंचवीस तारखेला त्यांचे बाजूला पहारा देणारे इस्ट पाकिस्तान रायफल्सचे शिपाई निघून गेले – जाताना त्यांनी पाकिस्तानी ध्वज खाली खेचून जाळला आणि बांगला देशचा झेंडा फडकावला.' मी चार पावले पुढे सरकलो. आता इस्ट पाकिस्तान रायफल्सची जागा इस्ट पाकिस्तान पोलिसांनी घेतली आहे. अर्थात हे इ. पी. पी. वालेसुद्धा अवामी लीगचेच पाठीराखे आहेत.

रेलींगला टेकून उभा राहिलो तोच दोघे-तिघे धावत आले आणि त्यांनी माझ्या हातातला 'टाइम्स ऑफ इंडीया' जवळ जवळ खेचूनच घेतला. माझ्या प्रश्नांकडे त्यांचे लक्षच नव्हते – अधाशासारखे ते पेपर वाचण्यात गढून गेले होते. त्यांच्याशी बोलण्यात अर्थ नाही हे पाहून मी परत फिरलो.

'बाबूजी, आपण त्यांना पेपर देऊन टाकलेत ?'–शिपाई.

'हो'–मी.

'फुकट ?' शिपायाने पुन्हा विचारला. मी पहातच राहिलो.

इथे पेपर ब्लॅकमध्ये विकले जातात – अमृत बझार पत्रिका तीन-साडेतीन रुपयाला विकली जाते. त्यांचेकडे पेपर चालू नाहीत ना – म्हणून इंडीयन पेपर्सला फार भाव येतोय.'

या अवामी लीगवाल्यांसारखी बाजारबुणगी स्वातंत्र्य आघाडी जगाच्या इतिहासात झाली नसेल. यांचेजवळ लष्करी नेतृत्व नाही. निश्चित कार्यक्रम नाही. – मुक्त केलेल्या किंवा मुक्तच असलेल्या प्रदेशासाठी सिव्हील अॅडमिनिस्ट्रेशन नाही. इतकेच काय तर लढत असलेल्या विविध गटांमध्ये आपापसात दळणवळण नाही. जनतेचे मनोधैर्य टिकवण्यासाठी तिच्यापर्यंत बातम्या पुरवण्यासाठी स्वतःचे ' क्लॅन्डस्टाइन पेपर 'सुद्धा नाहीत. कलकत्त्याचे मूठभर नक्षलवादी दर आठवड्याला ' देशव्रती ' प्रसिद्ध करतात आणि अवामी लीगला स्वतःचा पेपर चालवता येऊ नये ? एक रेडियो केंद्र चालवले आहे. ते सुद्धा हुगळी नदीतल्या जहाजावरून – इतरांच्या कृपेने.

आगरताळयाला परत जाण्यासाठी रिक्षात बसलो. पाहतो तो तेवीस वर्षांच्या स्वातंत्र्यसूर्याने चेकपोस्टवरला तिरंगा चांगलाच विटला होता. बिचाऱ्या अशोकचक्राचा तर पत्ताच नव्हता. तिथल्या सबइन्स्पेक्टरला – पी. के. नागला बोलावून झेंड्याची ती अवस्था दाखवली. ' बदलला पाहिजे ' तो म्हणाला. ' लवकर बदला नाहीतर लोक बदलतील '–मी म्हणालो.

बिचाऱ्याला माझ्या बोलण्यातला अर्थ उमगला नसावा. हळू हळू आखवरा मागे पडत होते.

शहराच्या वेशीवर येतोय ना येतोय तर पाऊस झोडायला लागला. आसऱ्यासाठी एका कळकाच्या झोपडीमेड हॉटेलात शिरलो. कोणी एक तरुण सुशिक्षित निर्वासित माझ्या शेजारी चहा पीत होता. त्याच्याकडे पाहून आठवण झाली –. अतुलसाठी–धाकट्या भावासाठी काही पाकिस्तानी नाणी घ्यायची होती. बॉर्डरवर मागायची विसरलो तेव्हा त्यालाच मागितली. खिशातून त्याने नोटांचे पुडके काढले सर्व चलन हिंदुस्थानीच होते. मोठ्या मुश्किलीने सव्वा रुपयाची पाकिस्तानी नाणी निघाली. त्यातली रुपयाची घेऊन त्याला भारतीय रुपया दिला. तो त्याने तीस नवे पैसे परत दिले. सरहद्दीवर पाकिस्तानी नाण्याची किंमत चांगलीच घसरली आहे. पाकिस्तानच्या रुपयाकरता भारतीय सत्तर पैसे दिले जातात.

केव्हा आलात ?–मी.

झाले आठ-पंधरा दिवस–. तो

कुठले राहणारे ?–मी.

' कोमील्लाचा '–तो.

किती दिवस मुक्काम ?–मी.

' हा काय, परतच चाललो आहे. कोमील्लाला माझी फॅमिली आहे. काय बरे

वाईट झाले आहे ते पाहून येतो '–मृतवत थंड स्वर. अंगावर शहारे आले बर च वेळ कोणीच बोलले नाही. मग मीच विचारले.

–पण तुमच्याकडे तर सारे भारतीय चलन आहे.

–होय, युद्ध सुरू झाल्यापासून आत विनिमयासाठी भारतीय चलनच वापरतात–तो.

तो केव्हा उठून गेला हे लक्षातच आले नाही. भानावर आलो तेव्हा पावसाची रिपरिप थांबली होती. आभाळ मात्र ढगाळलेलेच होते.

आगरतळचाच्या सेक्रेटरीएटपुढे निर्वासितांचा एक घोळका उभा होता. त्या घोळक्यात शिरलो. निर्वासितांसारखे निर्वासित ते. पुन्हा पुन्हा कशाला त्यांची वर्णने ? देशोधडीला लागलेली ही माणसे कोणत्या जातीची धर्माची असतात यावर माझा विश्वासच नाही. ही माणसं – हे निर्वासित राजकारणाची दिशा दाखवणारे परिस्थितीबरोबर वाहणारे, दिशादर्शक कोंबडे असतात. एकदा वीस वर्षांपूर्वी यांनी माणुसकीच्या पराजयाची आणि जातीयवादी राजकारणाच्या विजयाची बातमी आणली होती. आज त्यांचे आगमन म्हणजे अवामी लीगच्या पराजयाची नांदी !

केवळ पाकिस्तानचा नाश म्हणून आमचे पत्रकार अवामी लीगला डोक्यावर चढवत आहेत. पण या अवामी लीगची संघटना, कार्य व सध्याची लढाई यांचे वस्तुनिष्ठ अवलोकन कोणी केले आहे काय ? एवढा मोठा जनअसंतोष शतकाशत-कातून कधी तरी होतो. मग तरीसुद्धा बांगला देशला मान्यता द्यायला एकही राष्ट्र कसे धजावले नाही ?–कोणीच धजावणार नाही. कारण ही पराभूत होणारी चळ-वळ आहे.

जगात जेव्हा स्वातंत्र्ययुद्धे झाली तेव्हा सत्ताधारी वर्ग आणि त्याचे पाठीराखे निर्वासित झाले, पुढारी निर्वासीत झाले, जनता नव्हे आणि इथे मात्र सर्वसामान्य पाकिस्तानी नागरीक निर्वासित होत आहेत. माझ्या अंदाजाप्रमाणे केवळ त्रिपुरातच पन्नास हजार पाक निर्वासित आले असावेत. या निर्वासितांचे पुढे काय ?

भारतात त्यांना कामधंदा नाही. घर नाही. पाकिस्तानात धड लष्कराचेही राज्य नाही. अवामी लीगचे सारे नेते भारतात ठाण मांडून. आज जर सुव्यवस्था निर्माण केली नाही आणि शेते पिकली नाहीत तर वर्षभराने हजारो लोक अन्नान्न होऊन मरतील. व्हिएतनाममध्ये गेली वीस वर्षे जीवघेणी लढाई चालू आहे. पण आजसुद्धा सतराव्या अक्षांशावर शेती पिकेल याची काळजी व्हिएतनामी मुक्ती आघाडीने घेतली आहे. व्यापार टिकेल याची काळजी घेतली आहे रोगराई होऊ नये म्हणून औषधो-पचारांची सक्ती केली आहे आणि पाकिस्तानात ? सर्व अंधार आहे.

मी अनेक निर्वासितांशी बोललो. त्यांचे मनात पाकिस्तानी लष्करशाहीविरुद्ध द्वेष आहे. चीड आहे–पण विजयाची खात्री नाही. ते अगतिक आहेत. जेव्हा जनता

अगतिक होते तेव्हा सत्ताधाऱ्यांची सत्तास्थाने अधिकच बळकट होतात.

रोज पेपर उघडतो. मथळेच्या मथळे छापलेले असतात. जेस्सोरवर मुक्ती फौजांचा पुन्हा कब्जा–कुश्तीया सेनेच्या हातात. या बातम्या वाचूनच डोके सुन्न होते. शहरात राहून लष्कराशी लढायला या मुक्तीसैनिकांना कोणी सांगितले ? या अशा उरफाटया लढाईतून या स्वातंत्र्य योध्यांचीच शहरेच्या शहरे नष्ट होतात. हजारो निरपराध लोक मारले जातात. खेडी जिंकून शहरे वेढा–या स्वातंत्र्य युद्धातील सामान्य नियमाची मुक्ती फौजांना माहिती नसावी यापेक्षा दुर्दैव ते कोणते ?

एकदा पंडित नेहरूंना लोकसभेत विचारण्यात आले–'नागांना पाकिस्तानामध्ये गनिमीयुद्धाचे शिक्षण मिळते हे खरे काय ?' तेव्हा पंडितजी हसून म्हणाले–'कदाचित नागाच त्यांना शिक्षण देत असावेत.' त्यावेळी वृत्तपत्रीय चौकटी पलीकडे त्या विधानाला कोणी किंमत दिली नाही. आज त्या विधानाची किंमत चार लाखांचा मृत्यू ही आहे !

बंगालसारखा गनिमी युद्धास अनुकूल प्रदेश असताना दोन लष्करांनी लढावे त्या पद्धतीने मुक्तीफौज पाक लष्कराशी लढून नाहक बळी पडत आहे. कारण

–अखेर हे शिपायांचे बंड आहे !

या विधानातील सत्यता गेल्या महिन्या दोन महिन्यांचे पेपर चाळल्यावर लक्षात येईल. पाकिस्तानात असहकाराची चळवळ सुरू झाली तेव्हाच पाकिस्तानी राजकारणाचा प्रवाह हा शांततामय आंदोलनाचा आहे हे स्पष्ट झाले होते आणि जनतेने त्या आंदोलनाचे दायित्व खऱ्या अर्थाने पत्करले होते. सर्व बांगला देशात अवामी लीगचेच राज्य चालत होते आणि त्याच वेळी खऱ्या अर्थाने बांगला देश मुक्त झाला होता. सैन्य व लष्करी अधिकारी आणि याह्याखान खऱ्या अर्थाने वेढले गेले होते–वाटाघाटीच्या टेबलावर खेचले गेले होते. शेख मजीबुर रेहमान यांचे जाहीर झालेले पस्तीस नियम म्हणजे प्रतिसरकारचेच अस्तित्व होते. अशा रीतीने असहकारची चळवळ सुरू राहिली असती तर याह्याखान खऱ्या अर्थाने पेचात पडला असता. परिणामी त्यानी अवामी लीगवर बंदी घालून शेख मजीबूर रेहमानना देशद्रोही म्हणून जाहीर केले.

शांततामय राजकीय चळवळीची फलनिष्पत्ती म्हणजे त्या वेळेस अवामी लीगचे नेते भूमिगत गेले असते व स्वातंत्र्याची घोषणा करून त्यांनी आंदोलन चालू ठेवले असते. मुक्ती आघाडी स्थापन करून लहान गटांनी लष्कराशी युद्ध चालू ठेवले असते. रसद तोडणे, छापे घालणे या गनिमी मार्गांनी लष्कराला हतबल केले असते तर आजचा सर्वनाश झाला नसता. जनतेचे मनोधैर्य टिकले असते व आजच्या अन्नधान्याच्या, मदतीच्या समस्या निर्माण झाल्या नसत्या. परंतु घडले ते उलटे–अघटीत.

अवामी लीगने स्वातंत्र्याची घोषणा करताच इस्ट पाकिस्तान रायफल्स, इस्ट

पाकिस्तान पोलीस, अन्सार यांच्यातला असतोष भडकून उठला व त्यांनी सरळ शहरात शिरून लष्करावर हल्ले चढवले आणि अवामी लीगच्या नेत्यांनीसुद्धा उत्साहाच्या भरात त्यांना आवरण्याऐवजी पाठिंबा दिला व मुक्तीलढयाचे नेतृत्व शिपायांकडे गेले. जनता चळवळ संपून शिपायांचे बंड सुरू झाले आणि आता कदाचित या बंडाची परिणती एका फार मोठया पराभवात आणि नैराश्यात होण्याची शक्यता आहे.

पाकिस्तानकडे सुमारे अडीच लाख सैन्य आहे. पैकी फार मोठे अफगाण-भारत सरहद्दीवर आणि बलुची व पख्तून टोळयांच्या बंदोबस्तात गुंतले आहे. याचाच अर्थ पाकिस्तान जास्तीत जास्त एक लाख सैन्य पूर्व पाकिस्तानात धाडू शकते. आणि एक लाख सैन्याला साडेसात कोटी जनतेवर राज्य गाजवणे केवळ अशक्य होते. सैन्याची व्यूहरचना मोठमोठी शहरे—राजमार्ग-विमानतळ-रेल्वेस्टेशनस् ताब्यात ठेवणे आणि दहशत निर्माण करणे अशी होती. अशा परिस्थितीत मुक्तीसैन्याने प्रथम सैन्याला विखुरण्यास भाग पाडायला पाहिजे होते. विखुरलेल्या सैन्यगटांची रसद तोडून त्याचेवर छोटे मोठे हल्ले चढवून ते नाकाम करावयास पाहिजे होते. याकरता खेडी जिकून (जी जिकल्यातच जमा होती) शहराबाहेरील लहान मोठ्या ठाण्यांवर हल्ले करून आडरानात टेकडयांमध्ये सैन्याला ओढावयास पाहिजे होते परंतु मुक्तीफौजा सरळसरळ शहरात शिरून तिने सैन्यावर हल्ले चढवले. यामुळे सैन्य विखुरले गेले नाही व शहरे नष्ट होऊ लागली. मुक्तीसैन्याला मोठ्या प्रमाणावर पराभव पत्करावा लागला. जनतेचे मनोधैर्य खचायला लागले. सुरुवातीच्या या चुकांमुळे येणाऱ्या पावसाळ्याचा मुक्तीफौजांना फायदा उठवता येणार नाही. कारण झालेल्या हानीमुळे लष्कराप्रमाणेच मुक्तीफौजेपुढेसुद्धा फार मोठ्या प्रमाणावर अडचणी उभ्या राहिल्या आहेत. आजपर्यंतच्या घडलेल्या या घटना पाहता बांगला देशात झालेल्या हत्याकांडांना लष्करापेक्षा बेजबाबदार-अकुशल असे अवामी लीगचे नेते व जबाबदार आहेत असे म्हणावयास पाहिजे.

अवामी लीगचा एक कार्यकर्ता सादीकखान मोठ्या निराशेने मला म्हणाला— 'भारत सरकारची सहानुभूती आणि मदत आहे म्हणून आम्ही टिकलो—नसता काय झाले असते कुणास ठाऊक ?'

भारतात येणाऱ्या हजारो निर्वासितांची काळजी भारत सरकार घेत आहे. जखमी होऊन येणारे मुक्तीसैनिक भारतीय दवाखान्यात उपचारासाठी दाखल होत आहेत. मानवतेच्या नावाखाली का होईना, पण स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी भारत सरकारने आंतरराष्ट्रीय चव्हाटयावर पूर्व पाकचा प्रश्न मांडला आहे. आगरताळयामध्ये चाळीस पोलीस-पन्नासाहून अधिक लहान मोठे अवामी नेते विना अटकाव रहात आहेत. भारतीय रेडियो पूर्व पाकिस्तानच्या बातम्यांवर भर देत आहे. बांगला देश सहाय्य समितीकडून हजारो रुपयांची मदत दिली जात आहे. इथे उठलेल्या वदंतेप्रमाणे पासष्टच्या युद्धात पकडलेली पाक शस्त्रास्त्रे मुक्तीफौजांना

देण्यात येत आहेत. बॉर्डर सिक्युरीटी फोर्सच्या काही तुकड्या आत जाऊन मुक्ती-फौजांना मदत करीत आहेत. आजपर्यंत पाडलेली विमाने भारत सरकारनी पुरवलेल्या अँटीएअर क्राफ्टची किमया आहे–यात सत्य किती खोटे किती याचे गणित करण्यापेक्षा मुख्य प्रश्न आहे–

क्रांतीची निर्यात होऊ शकते काय ? आणि याचे उत्तर 'अर्थातच नाही !'

अवामी लीगच्या नेत्यांनी आपली कार्य पद्धती बदलली पाहिजे. हे युद्ध फार दीर्घकाल चालणार आहे हे लक्षात घेतले पाहिजे. तरच यशाची शक्यता.

काम संपले की मोकळा वेळ खायला उठतो. एवढे मोठे शहर परंतु एक उडपी नाही. एक इराणी नाही. सर्व उडप्यांचे, इराण्यांचे राष्ट्रीयीकरण करून विकेंद्रीकरण केले पाहिजे. उडपी नाही इराणी नाही तिथे माणसाने जगावे कसे ?

पाय मोकळे करण्यासाठी एरोड्रमवर गेलो. तेथे काही युरोपियन पत्रकार होते. त्यांच्याशी तर्खडकरांना आठवून विचारविनिमय करू लागलो. एवढ्यात बबार्डींगचे आवाज येऊ लागले. पाक विमाने ब्राह्मणबारीयावर बॉंब टाकीत होती.

माझ्या शेजारी उभ्या असलेल्या एका बुटक्या पण स्मार्ट बंगाली पोराने मला विचारले–

'आज ब्राह्मणबारीयावर बंबार्डींग करणाऱ्या याह्याखानने वादळाच्या आपत्तीत विमानांची मदत केली नव्हती हे तुम्हाला माहिती आहे काय ?'

'हो ऐकून आहे. तुमचे नाव ?'–मी

'ए. के. एम्. अझीझुल्ला. मी डाक्याचा राहणारा. टेलिव्हीजन आणि रेडियो आर्टिस्ट. लिबरेशन आर्मीच्या मदतीकरता इथे काही कार्यक्रम करायला आलो आहे'–तो.

'हं, पण वादळाच्या वेळी याह्याखानाने काहीच मदत केली नाही. स्वतः भेट दली नाही हे अशक्य वाटतं'–मी.

अत्यंत छद्मी व तिरस्काराने हसत त्याने उत्तर दिले.

प्लेने बोसे तिनो बांटलार मुख देखे छेने
गंध गोलापे नाक टेके तिनी केंद छेन
प्रजारंजक शासक हिसेबे तुलना नेइ
बेतारे, टिभीते घरे छन तिनी पुरनो थेइ
बाचते गेलेइ बाचबे एमन कथा तो नेइ

–विमानात बसून हवेतून उडताना त्यांनी मातृभूचे दर्शन घेतले. गुलाबाचा सुवास घेता घेता अश्रूही ढाळलेत चार. अशा प्रजावत्सलांची कोणाशी तुलना करावी–रेडियोवर गायली नेहमीचीच शोकगीते आणि ठरवले स्वतःस वाचवायचे तरी वाचतीलच असेही नाही–

(क्रमशः)

शतपावली

रवींद्र पिंगे

# एका कादंबरीकाराची करामत

शिष्ट लेखकांच्या हेटाळणीचा, पोथीबाज टिकाकारांच्या उपेक्षेचा, प्रकाशकांच्या आशेचा आणि वाचकांच्या प्रीतिचा विषय झालेल्या कादंबरीकार काकोडकरांची म्हणून काही बाजू आहे. ती आपण समजून घेतली पाहिजे, काकोडकरांचा म्हणून काही झगडा आहे. काकोडकरांचं म्हणून काही झगमगीत यश आहे. काकोडकरांची म्हणून काही धारदार जिद्द आहे. क्षणभर थांबून ह्या सर्वांचं स्वरूप आपण न्याहाळलं पाहिजे. गोव्याहून एक मुलगा चार अक्षरं शिकून पोट भरायला मुंबईत येतो आणि लेखकांच्या गोतावळ्यात पाऊलही न टाकता, दूर एका कोपऱ्यात बसून दिडशे—किती ? तर, मोजून दिडशे !—कादंबऱ्या लिहून सामान्य मराठी वाचकांच्या गळ्यातला ताईत होतो, ह्याचा अर्थ आणि अन्वय आपण एकदा लावून घेतला पाहिजे. मालवणच्या साहित्य संमेलनाला जमलेले चष्मिष्ट साहित्यिक आणि त्यांचे पाठीराखे प्राध्यापक छात्या पुढे काढून तिथल्या नगर वाचनमंदिरात गेले. आपण सारेजण सरस्वतीच्या दरबारातले मानकरी आहोत वगैरे प्रकारे त्यांनी आपली ओळख कॉलरी ताठ करीत तिथल्या ग्रंथपालाला करून दिला. त्या ग्रंथपालाने आनंदी मुद्रेने विचारलं, 'तुमच्यापैकी चंद्रकांत काकोडकर कोण ?' घोळका अर्थातच निरुत्तर, आणि जोडीला दिङ्मूढही झाला. आपण मात्र दिङ्मूढ न होता, ग्रंथपालाला नेमक्या काकोडकरांचीच तेवढी आठवण का झाली ते जाणून घेतलं पाहीजे. काकोडकरांच्या यशाला साथ दिली नाही, तरी दाद दिली.

पाहिजे. काकोडकर गेलं पाव शतक ओळीने कादंबरीलेखन करीत आले आहेत त्या पाव शतकाच्या प्रदीर्घ काळात जरा आस्थेने शतपावली घातली पाहिजे. त्यांच्या यशाचा आणि जिद्दीचा कानोसा वेळीच घेतला पाहीजे.

काकोडकरचा उल्लेख एकेरी नावाने करायला हरकत नाही कारण तो माझा शाळेतला वर्गबंधू आहे. गोमंतकातल्या सावर्डे गावाजवळ काकोडा नावाचं लहान गाव आहे. तिथला हा गरीब घरचा मुलगा. दुसरं महायुद्ध सुरू झाल्याबरोबर मुंबईला आला. वेळेवाडीतल्या ओरीएंट शाळेचा तो विद्यार्थी. बेचाळीसच्या चळवळीत त्या शाळेची हाडं खिळखिळी झाली. शिक्षक फुटले. काकोडकर बाहेर पडून चिकित्सक शाळेत मॅट्रिकच्या वर्गात आला. तिथेच आम्ही एका बाकावर बसू लागलो. तो मॅट्रिक झाला की नाही ते आठवत नाही. तो पुढेमागे लेखक होणार असल्याची कुठलीही खूण त्याच्यापाशी नव्हती. ही पंचवीस वर्षांपूर्वीची कथा. आज सत्तर साल पालटल्यावरही त्याच्या व्यक्तिमत्वावर लेखकपणाची मुद्रा उमटलेली दिसत नाही. परवाच त्याने पन्नाशी ओलांडली, तेव्हा तो चाळीशीतलाच भासला. सुखवस्तूपणा आता त्याच्या आसपास रेंगाळताना दिसू लागला आहे. मुलंबाळं कॉलेजला गेली आहेत. पण त्याच्या गृहस्थ जीवनात साहित्यिकाच्या जिंदगीची झुळूक काही दिसली नाही. लेखकाच्या घरी पुस्तकांचं रान असतं. असायला पाहिजे. काकोडकरच्या अद्ययावत घरात पुस्तक दिसलंच नाही. दोन नवे कोरे रेफ्रिजेटर्स दिसले. एक लाकडी बंद कपाट होतं. त्यात बहुतेक त्याच्याच कादंबऱ्यांचा ढिग असेल. आम्ही इतके मित्र चट्टामट्टा करायला तिथे जमलो होतो. पण त्याच्या कादबऱ्यांबद्दल विषय निघाला नाही. हा आमचा शिष्टपणा, उपेक्षाबुद्धी, की त्याच्याच लेखनातली आम्हाला न वाचताच जाणवलेली कमजोरी? काय रे काकोडकरा, तुला काय वाटतं?

हे बघ, मी ओळीने दिडशे कादंबऱ्या लिहून दाखवल्या आहेत! तुमची सर्वांची मिळून तरी ह्याच्या निम्म्याने पुस्तकं होतात काय?

दीडशे कादंबऱ्या? मग तुझ्या पायावर दंडवतच घातला पाहिजे. कारण आम्हाला दिडशे पानं लिहायची म्हटली तरी ब्रह्म आठवतं!

शिवाय मी इतर लेखनही केलं आहे! अरेबियन नाईटस्चं आठशे-नऊशे पानाचं भाषांतर केलं आहे. त्याची आवृत्ती हातोहात संपली. माझ्या कादंबऱ्यांच्याही आवृत्या भराभर संपतात. अग्निदिव्य, अभिमान, आनंदभैरवी, सुचिता वगैरे माझ्या कादंबऱ्या फार झपाट्याने खपल्या. आज फडक्यांच्या खालोखाल मीच सर्वात जास्त खपाऊ लेखक आहे.

खपाचं सोड. पण तू कादंबऱ्याही फार झपाट्याने लिहून काढीत असणार.

मी नोकरीधंदा करीत नाही. सर्व वेळ लेखनच करतो कुणाच्याकडे जात-येत नाही. त्यामुळे सर्व चित्त एकाग्र करून मी पंधरा दिवसात एक कादंबरी पुरी

करतो. महिन्याला दोन कादंबऱ्यांची हस्तलिखितं माझ्याकडे तयार होतात. दिवाळी अंकांच्या निमित्ताने मला सात-आठ कादंबऱ्या तयार कराव्याच लागतात. मी त्या झपाटयाने पुऱ्या करतो. रोज संध्याकाळी विरंगुळा म्हणून सेंट्रल सिनेमाजवळ बागवे एजंटांकडे नेमाने बसतो. एरव्ही मी बरा की माझं लेखनं बरं. कुठल्या सभा-संमेलनाला किंवा साहित्यिक अड्ड्यावर मला कुणी कधी पाहिलंय ? तो मार्ग आपला नव्हे. माझा मार्ग लेखनाचा त्यावरून मी रेसभरसुद्धा ढळत नाही. गेली पंचवीस तीस वर्षं मी सतत लेखन करीत आलो आहे. हिशोबाने सांगायचं तर गेली तीस वर्षं मी दरवर्षी सहा ललित पुस्तकं लिहीत आलो आहे. तुम्हा शिष्टां-पैकी काहीजणांची ह्या हयातीतसुद्धा सहा पुस्तकं होणार नाहीत.

इतकं असूनही टिकाकार तुझी उपेक्षा करतात, किंवा टिंगल करतात, ह्याचं इंगित काय असेल ?

टिकाकारांच्या टिकेची, उपहासाची, निंदेची किंवा अनुल्लेखाची मला काडी-इतकीही खंत वाटत नाही, कारण मराठी टिकाकार ही बिलकूल उपेक्षणीय चीज आहे. टिकाकार कोण होतो ? ज्याला ललित साहित्यात अपयश येतं, तो चष्मा लावून टिकाकार बनतो. आपली प्रौढी मिरविण्यासाठी तो मूळ ग्रंथ पाहिल्याशिवाय निव्वळ शेरेबाजी करतो. ते जर अभ्यास करून, पुस्तक नीट वाचून टिका करतील तर तिचा विचार करावाच लागेल. केव्हाही पाहिजे. पण माझ्या कादंबऱ्या न वाचताच मी शृंगारिक किंवा चावट लिहितो असा शेरा मारणारांना काय किंमत द्यायची ? गोमंतक साहित्य संमेलनाचं सुवर्णपदक माझ्या 'गर्जा जयजयकार !' ह्या कादंबरीला मिळालेलं आहे. तिचा रशियन भाषेतही अनुवाद झाला आहे. माझी चार-पाच पुस्तकं हिंदीत अनुवादीत झाली आहेत. 'किर्ती मंदिर' ह्या माझ्या कादंबरीच्या हिंदी अनुवादाच्या प्रती यू. पी. सरकारने खरेदी करून शाळां-मधून वाटल्या. ह्यातली एक तरी गोष्ट माझ्या टिकाकारांना माहीत आहे काय ? 'गोमंतका, जागा हो !', 'मांडवी, तू पेटलीस !', 'तेथें कर माझे जुळती' वगैरे माझ्या कादंबऱ्या गोमंतकाच्या मुक्तीसंग्रामाची राजकीय पार्श्वभूमी वर्णन करणाऱ्या आहेत. त्यांना कमालीची लोकप्रियता मिळालेली आहे. पण माझ्या यशाची ही बाजू टिकाकार हिशोबातच घेत नाहीत. साहजिकच मी त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो. निदान माझ्या वाङ्मयावर तरी त्यांच्या फालतू टिकेचा काहीही परिणाम होत नाही.

सामान्य वाचकांचं नि तुझ्या कादंबरी लेखनाचं नातं कुठल्या प्रकारचं आहे ?

मुळात मी 'यशवंत' मासिकाचा लेखक. नंतर जास्त जास्त लिहू लागलो, कारण पैशाची गरज निर्माण झाली. माझ्या गोष्टी वाचकांना आवडू लागल्यावर संपादक मला पत्रं पाठवून श्रृंगारीक कथा लिहिण्याचा आग्रह करू लागले. मला पैशांची फार गरज होती. मी लिहित गेलो. पैसा मिळत गेला. जोडीला लोक-

प्रिष्ठताही मिळत गेली.

म्हणजे संपादकांनी तुझी लेखणी बिघडवली म्हणायची !

तसं नाही. शृंगारिक लेखन करण्यात पाप नाहीं. रंजक कथा सांगणं हेच कथा-कादबरीकाराचं कार्य आहे. त्याच्या पलीकडे त्याच्याकडून अपेक्षा करणं चूक आहे. उद्बोधन करण हे लेखकाचं कार्य असूंच शकत नाही.

लोक म्हणतात की शृंगारीक लेखनाचा तरुण पिढीच्या मनावर विपरीत परिणाम होतो. आणि म्हणून काकोडकराचं लेखन आक्षेपार्ह.

हे सुद्धा चूक आहे. वाङ्मयाचा वाचकांच्या मनावर दीर्घजीवी असा परिणाम कधीही होत नाही. तो एक तात्पुरता तरंग असतो. बाबुराव अर्नाळकरांच्या डिटेक्टीव कथा वाचणारे वाचक लाखनी आहेत. पण म्हणून काही दरोडेखोरी किंवा खूनाखूनी वाढलेली नाही. मी रंजक कथा रमतगमत सांगतो. ह्या पलीकडे मला वाङ्मयीन ध्येय नाही. तसंच, मी वाचकांच्या अभिरुचीच्या पातळीवर कधीही आलेलो नाही. माझ्या पातळीवर मी वाचकांना आणलेलं आहे.

ह्या दिडशे कादंबऱ्यांना विषय कसे सापडले ?

वर्तमानपत्रांतून बातम्या वाचल्या की माझं विचारचक्र सुरू होतं. त्या बातम्यांची दुसरी बाजू काय असू शकेल त्याचा मी विचार करतो. सवयीने आता ताबडतोब कथानक जुळवता येतं. शिवाय मी जे ललित साहित्य वाचतो, त्यातूनही नव्या व्यक्तिरेखा सुचतात. दुसऱ्यांनी कच्चे सोडलेले दुवे मी पकडतो नि पक्का माल तयार करतो. सवयीने हे सहज जमतं.

ह्या रामरगाड्यात तुला दुसऱ्यांचं लेखन वाचायला वेळ मिळतो तरी कसा ?

मी कटाक्षाने वाचतो. फडके, माडखोलकर, खांडेकर, पेंडसे, दांडेकर दळवी, कर्णिक, असे सगळे लेखक मी वाचले आहेत. इतरही वाचतो. डिटेक्टीव पुस्तकं

हंसा वाडकर
यांचे
आत्मकथन
सांगत्ये ऐका
सांगत्ये ऐका
मूल्य आठ रुपये
राजहंस प्रकाशन

वाचतो. त्यातून 'राजाराम राजे' ही माझी गुप्त-पोलिसांच्या चातुर्यकथांची मालिका तयार झाली आहे.

म्हणजे तू लिहितोस तरी काय काय?

कथा, कादबऱ्या, कुमार वाङ्मय, डिटेक्टीव कथा आणि सिनेवाङ्मय!

किती सिनेमे लिहिलेस?

'यंदा कर्तव्य आहे.', 'लक्ष्मी आली घरा,' 'अपराध,' 'धाकटी बहीण,' 'दो रास्ते,' हे सगळे माझेच चित्रपट. ते सगळेच यशस्वी ठरले. 'अपराध'ला महाराष्ट्र सरकारची अकरा पारितोषिकं मिळाली. 'दो रास्ते'च्या कथेबद्दल मला पाच सहस्त्र रुपयांचं पारितोषिक मिळालं. माझी टिंगल-टवाळी करणाऱ्या फालतू टिकाकारांना ह्यातल्या एक शतांश गोष्टी तरी करून दाखविता येतील? शिवाय मी दर दिवाळीला 'चंद्रकांत' हा माझ्या कादंबऱ्यांचा भरगच्च अंक काढतो. तोही हातोहात खपतो. इतरांचं पौष्टिक वाङ्मय मात्र वाचकांच्या आश्रयाभावी सगळं फूटपाथवर पडतं.

तू शृंगारीक लिहितोस अशी भलीबुरी जाहिरात झाल्यामुळे तुझ्या कादंबऱ्यांचा उठाव होत असेल.

तसंही म्हणता येणार नाही, 'श्यामा" ह्या माझ्या कादंवरीवर अश्लीलतेचा आरोप ठेवून खटला झाला. मी सुप्रीम कोर्टापर्यंत भांडलो. बारा सहस्त्र रुपयांची माती केली. माझी खूप बदनामी झाली. शेवटी मी त्या खोडसाळ आरोपातून सहि-सलामत निर्दोषी म्हणून सुटलो. पण अश्लीलतेचा आळ आला म्हणून "श्यामा" कादंबरी अधिक खपली, असं झालं नाही. म्हणजे शृंगारीकतेचं लेबल लावल्यावर कादंबरीचा खप वाढतोच असं नाही. ते खपाचं गणित वेगळंच आहे. त्याला तुमचीच पुण्याई असावी लागते. ललित लेखनात पराभूत झाल्यामुळे टिकेकडे वळलेल्या टिकाकारांना तर ती गोष्ट कळणारच नाही.

तुझ्यावर झालेल्या अश्लीलतेच्या खटल्याचं पुस्तक का काढलं नाही?

"श्यामा" कादंबरीची नवी आवृत्ती निघणार आहे. तिला परिशिष्ट म्हणून कोर्टातलं कामकाज शब्दशः जोडणार आहे. सुप्रीम कोर्टाचा निवाडासुद्धा छापून प्रसिद्ध करणार आहे.

एवढया कादंबऱ्यांच्या मानधनाचा तू हिशोब तरी कसा ठेवतोस?

मी हिशोब-बिशोब काही ठेवत नाही. ह्या हाताने हस्तलिखित देतो नि त्या हाताने एक रकमी उक्ते हजार बाराशे रुपये घेतो. पैसे मिळाले की माझा प्रकाशनाशी संबंध संपतो.


म्हणजे लेखनावर बरं चाललंय तुझं!

उत्तम चाललंय. पूर्वी नोकरी होतो. आता माझा मीच धनी. तरीही रुबाबात संसार चालवला आहे. मुलंबाळं शिकताहेत. पुण्याला लवकरच बंगला बांधायचा

विचार आहे. आणखी काय हवंय? वाचकांचं प्रेम आणि संसारातली समृद्धी ह्या दोन्ही दुर्मिळ गोष्टी मला माझ्या लेखनाने दिल्या. म्हणून मी साहित्याशी कृतज्ञ आहे. देवदया झाली तर अजूनही मी शं दोनशे कादंबऱ्या लिहीणारच आहे!

हे शेटचे शब्द ऐकून मी पार चितपट हरलो आहे! असाच पंचवीस वर्षापूर्वी ह्याच काकोडकराच्या समोर हरलो होतो. त्यावेळी मान्यतेच्या शिखरावर असलेल्या कुसुमावती देशपांड्यानी जाहीरपणे सांगितलं होतं की फडक्यांनी निर्माण केलेल्या कल्पनारम्यतेचं कवच फोडून मराठी कादंबरीला बाहेर काढण्याचं ऐतिहासीक कार्य पेंडशांची 'हद्दपार', बिलवरकरांची 'सुनिता', आणि काकोडकरांच्या 'कुणाच्या स्वातंत्र्यासाठी?' ह्या तीन महान कादंबऱ्यांनी केलं आहे. माझ्याच बाकावर बसणारा मुलगा ऐतिहासीक कार्य करेल? काय बिशाद आहे! पण कुसुमावतीबाई आणखी पुढे म्हणाल्या की "चला निसर्गाकडे" ही काकोडकरांची कादंबरी एक नवा आशय मराठी कादंबरीला समर्थपणे देत आहे! जखमी मनाने ते मान्य करावं लागलं. पुढचा इतिहास ताजाच आहे. पेंडशांच्या खांद्यावर भले सुरवातीपासूनच जरिपटका आहे! बिलवरकरांनी अनाकलनीय पूर्णविराम टाकला. आणि काकोडकरांची आता अनाकलनीय न उरलेली घोडदौड चालू आहे. तिचा पाढा त्यांनी वाचलाच. पन्नाशीच्या उंबरठ्यावर उभा असलेला हा लेखनवीस संख्येच्या दृष्टीने तरी अखिल भारतीय विक्रम करणार हे सांगायला ज्योतिषी नको. प्रश्न शिल्लक उरतो तो ज्या काटयावर अखेर माल तोलून निघणार आहे त्या वाङ्मयीन गुणवत्तेचा. सध्या मी गुणवत्तावर्धक बाळगोळ्या कुठें मिळतात त्याच्या जालीम तपासात आहेच. आज ना उद्या त्या मिळतीलही. त्यांचं एक पाकीट घेऊन मित्रभावाने काकोडकरांकडे जाणं भागच आहे. पण दरम्यानच्या काळात तो बेटा घोडदौड करीत बऱ्याच दूरच्या पल्ल्यावर गेलेला असेल. तिथून तो मला सांगेल, 'ही माझी तिनशेवी कादंबरी!" आता बोल! अशा वेळी काही बोलायचं नसतं. आळीमिळी गूपचिळी उभं राह्यचं. स्तिमित व्हायच. त्याचं चांगभलं चिंतायचं आणि आपल्या हातातलं बाळगोळ्यांचं पाकीट आपल्याच हातात ठेवायचं.

आणि एरव्हीसुद्धा दुसऱ्याला दुरुस्त करत बसणं हे आपलं अवतारकृत्य कधीच नसतं.



कलकत्ता

# बांगला देशाला अनुकूल असलेली
# भौगोलिक परिस्थिती

सौ. तारा पंडित

स्वातंत्र्य युद्ध खेळणाऱ्या बांगला देशातील लोकांना तेथील भौगोलिक परिस्थिती खूपच अनुकूल ठरली आहे. कोरडे हवामान जास्त काळ टिकणारे नाही. कारण लवकरच कालबैशाखी (मान्सून वारे) सुरू होणार आणि शत्रुच्या हवाई हल्ल्यांना साहजिकच त्यामुळे अडथळा निर्माण होईल. महिना दीड महिन्यातच पावसाळा सुरू होईल आणि सारे सैन्य सप्टेंबरची वाट पहात जेथल्या तेथेच बसून राहील. पाकिस्तानी लोकांनी पावसाळा येण्यापूर्वीच बांगला देशच्या लोकांची अहिंसेच्या मार्गाने आकार घेणारी चळवळ, खून–धाकदपटशा व लष्करी अंमल इत्यादी मार्गांनी पुर्णपणे दाबून टाकण्याचा खूप प्रयत्न चालवला हे त्यांच्या अत्यंत क्रूर वर्तणुकीनेच सिद्ध झाले आहे.

गंगा आणि ब्रह्मपुत्रा ह्या नद्यांमुळे पूर्व बंगालचे तीन विभाग पडतात. गंगेवर फक्त बारा नावाच्या ठिकाणी एकच पूल आहे. परंतु ह्या पुलापर्यंत, डाक्का किंवा चित्तगाववरून पोचण्यासाठी पाकिस्तानी सैन्याला पद्मा नदी ओलांडणे अत्यावश्यक आहे. गोआलुंडा येथूनच फक्त बोटीने प्रवास करता येतो आणि या ठिकाणी तर पद्मा नदीचे पात्र इतके विशाल आहे की उन्हाळ्याच्या दिवसातदेखील तिच्या एका किनाऱ्यावर उभे राहिले असता दुसरा किनारा दृष्टिपथात येत नाही. शिवाय एप्रिल मे महिन्यात सतत वादळ येत असते. ह्या वादळाचे प्रमाण आठवड्यातून दोनदा असे पडते. त्यामुळे तर वाफेवर चालणाऱ्या नौकांनादेखील भयंकर अडथळा निर्माण होत असतो.

ब्रह्मपुत्रा गंगेला मिळाल्यानंतर पुढची नदी पद्मा म्हणून संबोधली जाते. ह्या नदीवर तर एकदेखील पूल नाही. शिवाय येथेही सतत वादळ निर्माण होत असते. तिच्या पाण्यावर दिनाजपूर व रंगपूर जिल्ह्यातील उंचावरील माळरानात ज्यूट व तंबाखूचे पीक काढतात. ही ठिकाणे चित्तगाव किंवा डाक्क्यापासून बरीच

दूर पडतात व तेथे पोचण्यासाठी सरळ मार्गही नाहीत. जरी ह्या विभागात रस्ते पुष्कळ आणि चांगले असले तरी रणगाडे चालवण्याच्या लायकीचे ते नाहीत. इतर वाहनांना रस्ता कळणे कठीण. कारण ३० मैल × ३० मैल एवढ्या विभागातील रस्त्यांच्या खुणा नकाशावर उपलब्ध नाहीत. खेड्यांमध्ये सतत बैलगाडीचा वापर होतो व तिला बैलाऐवजी रेडेच अधिक जुंपण्यात येतात. तेथील हेच एकमेव वाहन होय. शेतकरी लोक भाताच्या शेतातून सहज चालत जाऊ शकतात. पण सैनिकांना त्यांच्या पायात असलेल्या वजनदार जोड्यांमुळे असे चालत जाणे सहज जमण्यासारखे नाही. मातीचा थर फार जाड असून पावसाळ्यात ती माती पायांना भयंकर चिकटून बसते.

नैऋत्येकडील त्रिभुज प्रदेशात खुलना, बारिसाल व भाकरगंज हे जिल्हे येतात. या विभागात तर रस्तेच नाहीत. हाताने सारवून तयार करावी इतकी सपाट जमीन ह्या भागात आहे. मधून मधून नद्यांना भरती येत असल्याने त्या वारंवार पात्र बदलतात व त्यामुळे सलग जमिनीचे अनेक विभाग होतात. याच विशाल प्रदेशात तांदूळ व ज्यूटची पिके काढली जातात.

येथे छोट्या छोट्या नौकातून प्रवास करणे फार सोयीचे आहे. परंतु डाक्क्यापासून बारिसाल हे केवळ ७५ मैलांचे अंतर कापण्यास तब्बल तीन दिवस लागतात. त्या मानाने कलकत्त्याचे १८० मैलांचे अंतर असले तरी वेळ कमी लागत असल्याने तेच जवळचे वाटते. चार दिवसात बोटीने व सात दिवसात छोट्या होडीने कलकत्त्यास पोचता येते. बारिसाल हे त्रिभुज प्रदेशाच्या उत्तरेला असून खुलना हे पश्चिमेला आहे. ते पश्चिम बंगालच्या चोवीस परगणा जिल्ह्यास अगदी लागूनच असून एका छोट्या रेल्वेने कलकत्त्यास जोडलेले आहे. भारत–पाकिस्तान विभाजनानंतर पूर्व पाकिस्तानात फक्त रंगपूर ते खुलना अशी एकच छोटी रेल्वे लाईन टाकण्यात आली. ही रेल्वे जेस्सोरमधून जाते. मोठ्या मुष्किलीने पाकिस्तानी सैन्याने आपल्या ताब्यात हे जेस्सोर ठेवण्याचा प्रयत्न केला.

त्रिभुज प्रदेशातील जिल्ह्यांना मात्र शत्रूच्या प्रतिकारासाठी पावसाळा संपेपर्यंत वाट पहात बसण्याची आवश्यकता नाही. पश्चिम पाकिस्तान्यांसकट कोणाही परकीयांना येथील असंख्य जलमार्ग व घनदाट सुंदरबनतील मार्ग यांची माहिती असणे शक्य नाही. त्यामुळे ह्या विभागात पाकिस्तानी सैन्याचा प्रभाव कमजोर आहे. पण वृत्तपत्रकार मात्र उपलब्ध मार्गांची माहिती असल्याकारणाने कलकत्त्याहून जेस्सोर, कुश्तिया, चौडंगापर्यंत आणि जवळपासच्या सर्व विभागात सहजरीत्या जाऊन पोचू शकले.

ब्रह्मपुत्रा व पद्मा ह्या नद्यांमुळे विभक्त झालेल्या प्रदेशाचे पुन्हा मेघना नदीमुळे दोन विभाग पडतात. सध्या या भागात चाललेले युद्ध हे चित्तगाव, नौखाली,

पृष्ठ २३ वर

# सधन शेती हाच बेकारीवरील चालू इलाज

विनायक राजगुरू

भारतीय निवडणुकांच्या जाहिरनाम्यात प्रत्येक पक्षाने बेकारी निवारण्याची किंवा कमी करण्याची ग्वाही दिली आहे. सत्तारूढ काँग्रेसने प्रत्येक वर्षी पाच लाख नवीन नोकऱ्या निर्माण करण्याचे वचन दिलेले आहे, तर जनसंघाने तीन वर्षांचे आत सर्व सुशिक्षित बेकारांना नोकरी देण्याची हमी घेतली आहे. स्वतंत्र पक्षाने रस्ते बांधणीचा कार्यक्रम हाती घेऊन दहा लाख लोकांना नोकरी मिळेल अशी योजना करण्याचं ठरविले आहे. त्यासाठी त्यांनी वार्षिक दोनशे पन्नास कोटी खर्चाचा अंदाज धरला आहे. संसोपानी मात्र आपण सत्तेवर येण्याची शक्यता नाही हे लक्षात घेऊन, बेकारीच निर्मूलन करा. नाहीतर बेकारीभत्ता तरी द्या, अशी मागणी केली आहे. सारांश बेकारीचा प्रश्न इतका महत्त्वाचा आणि जिव्हाळ्याचा आहे की सत्तारूढ काँग्रेसपासून तो अकाली दलापर्यंत प्रत्येक पक्षाने त्याला आपले जाहिरनाम्यात स्थान दिले आहे. त्याबरोबर हे पण स्पष्ट करणे जरूर आहे की कोणत्याही पक्षाने बेकारी निवारण्याची योजना मांडलेली नाही.

## बेकारीची व्याप्ती

भारतात किती लोक बेकार आहेत. याचे अंदाजही प्रत्येक पक्षाचे निरनिराळे आहेत. प्रजा-समाजवादी पक्षाने सात कोटी लोक बेकार आहेत असा अंदाज केला आहे. तर स्वतंत्र पक्षाचा अंदाज दहा ते पंधरा कोटींचा आहे. असा अंदाज करताना सुद्धा पाच कोटींची माया ठेवली आहे. यावरून अशा अंदाजांचा पोकळपणा लक्षात येईल. बेकारीची जी आकडेवारी आज उपलब्ध आहे. तिची अवस्था पण अशीच काहीशी आहे. प्रा. दांतवाला यांचे अध्यक्षतेखाली तीन अर्थशास्त्रज्ञांची एक समिती नेमण्यात आली होती. समितीने आपल्या अहवालात स्पष्टपणे म्हटलं आहे की अशा प्रकारचे बेकारीचे अंदाजात काही अर्थ नाही, त्यावरून आर्थिक स्थितीचे मूल्य-मापन सुद्धा करता येत नाही. अशा अडचणी निर्माण होण्याचे मुख्य कारण म्हणजे

बेकारीची व्याख्यासुद्धा आज स्पष्ट नाही. ज्या ज्या व्यक्तीला जीवनात काही काळ बेकारीत घालवावा लागला त्याला बेकारीची व्याख्या, त्याचा अर्थ, सारं काही स्पष्ट आहे. पण अर्थशास्त्री मात्र बेकारीचे व्याख्येबद्दल एक मत बनवू शकले नाहीत. अर्थशास्त्र हे सर्व शास्त्र आपण परकीयांपासून घेतले. त्यात भारतीय असं काहीच नाही. भारतातील बेकारी हा जागतिक विद्वानांचा चेष्टेचा विषय होऊन बसला आहे. दुःख एवढंच की त्यात आमचे अर्थशास्त्री पण सामील आहेत. 'इंडिया' नावाचे एक पुस्तक नुकतच ऑक्सफर्ड प्रेसनी प्रसिद्ध केले आहे. हे पुस्तक जगदीश भगवती व पद्मा देसाई या अमेरिकेत एम. आय. टी. व हार्वर्डमध्ये काम करणाऱ्या भारतीय प्राध्यापकानी लिहिलेलं आहे. त्यात त्यांनी बेकारीचे एक विनोदी उदाहरण दिलं आहे. एका झाडूवाल्याचे जागेसाठी एक दहा यत्ता शिकलेल्या माणसाने अर्ज केला. अर्जदाराचे चाचणीत त्याचे लक्षात आले आहे की एक बी. ए. झालेला गृहस्थ पण अर्जदार आहे. बी. ए. झालेल्या इसमाने त्यास दाखवून दिले, की त्या जागेसाठी एक एम्. ए. व पी एच. डी. पण उमेदवार म्हणून आला आहे. शेवटी ती झाडूवाल्याची नोकरी जेव्हा जाहिरातदाराचे जावयास मिळाली तेव्हा सर्वांचा विरस झाला. या गोष्टीच्या तात्पर्यात जरी तथ्य असलं तरी त्यात परदेशी वाचकांची करमणूक करण्याचा उद्देश स्पष्ट होतो. अशा तऱ्हेने एका जटील समस्येचा उपहास करून आमचे अर्थशास्त्री या प्रश्नास तोड सूचविण्यात आपली असमर्थता व्यक्त करतात.

## व्याख्या आणि अर्थ

आज अर्थशास्त्रज्ञामध्ये बेकारीची व्याख्या व अर्थ यापासून दुमत आहे. तीन टक्के बेकारी म्हणजे बेकारीच नव्हे. तसेच ऐच्छिक बेकारी व अनैच्छिक बेकारी, काम करण्यास असमर्थ असलेले कामगार, शेतीतही छुपी बेकारी वगैरे प्रश्न परदेशी शास्त्रज्ञांच्या दृष्टीतून निर्माण झाले आहे. शेतीमध्ये छुपी बेकारी आहे का नाही ? हा प्रश्न भारतीय मनात संभवत नाही. जी बेकारी आहे ती स्पष्ट आणि उघड आहे. दोष आहे तो आकडेवारी करण्यात. बरेच शेतकरी, शेतीचा व्यवसाय नाईलाजाने करतात. कोणत्याही प्रकारचे शिक्षण न मिळालेली नवी पिढीसुद्धा शेतावर काम करते. परंतु कोरडवाहू शेतीवर वर्षांतून जेमतेम तीन-चार महिने काम असतं आणि त्यातून वर्षाचं धान्यसुद्धा निर्माण होत नाही. अशा स्थितीत ही सर्वच मंडळी बेकार नव्हेत काय ? घरची शेती नसलेल्या शेतमजुरांची नवी पिढी काम शोधत हिंडते व कामाच्या आशेने शहरात झोपडीच्या आधाराने राहते. हे काय बेकार कामगार होतात ? पण शहरात येऊन तो बेकार झाला की तो वेगळ्या कोष्टकात जातो. आपले प्रश्न सोडवताना आपण दुसऱ्या देशातील विचारवंतांकडून आराखडा घेतला. तर या अडचणी निर्माण होणे अपरिहार्य आहे. किंबहुना परदेशी

शास्त्रीय पुस्तकांचे वाचनावर आपली वैचारिक बैठक ठेवल्यावर अन्य विवेचन शक्य होत नाही. आज बेकारीची समस्या अमेरिकेसारख्या प्रगत देशापुढे आहे. अमेरिकेत आज सुमारे पाच ते सहा टक्के बेकार आहेत. प्रा. पॉलस्विझी यांनी या आकडेवारीतील दोष दाखवून दिलेले आहेत. त्यांच्या दृष्टीने नोकरी शोधूनही न मिळल्यामुळे कंटाळन बसलेले कामगार जमेस धरता ही बेकारी सुमारे सात ते आठ टक्के भरते. अर्थात अमेरिकन विचारवंत 'रेड इंडियन' हा माणूस समजतच नाहीत. त्यांचा समावेश या आकडेवारीत नाही. तेव्हा आज एक नवीन आकडेबाज अर्थशास्त्रज्ञांची पिढी निर्माण झाली आहे की ते तुम्हाला आकड्यांची किमया करून हवे ते सिद्धांत मांडून दाखवतील. तेव्हा भारतातील बेकारीची समस्येला ठोकळेबाज विचारवंताकडून काही उपाय-योजना मिळेल अशी अपेक्षा करणं चूक आहे.

## भारतीय बेकारीचा वेगळेपणा

भारत हा शेतीप्रधान देश आहे. सुमारे सत्तर टक्के प्रजा खेड्यात रहाते. खेड्यातील जीवनात अजून शहरी तुटकपणा नाही. एक दुसऱ्याला मदत करण्याची भावना आहे. एखादा गाववाला मंत्री झाला तर गावातल्या इसमास शिपायाची नोकरी देण्यासाठी तो आपले वजन खर्च करतो, हे आपण पाहतो. आपल्या गावच्या माणसाची थोडीफार जबाबदारी आपल्यावर आहे असं तो मानतो. एकत्र कुटुंबात असलेली भावना काही अंशी खेड्यात अजून आहे. किंबहुना सुमारे दहा मोठी शहरे सोडली तर ही भारताची धारणा आहे. औद्योगीकरणामुळे येणारा तुटक व्यक्तीवाद अजून भारतात म्हणावा तसा रूजला नाही. प्रगत देशातसुद्धा यापासून निर्माण होणारा धोका स्पष्ट दिसू लागला आहे. आज अमेरिकेतील कौटुंबिक जीवनाचा नाश या व्यक्तीवादातून निर्माण झाला आहे.

भारतीय बेकाराला कोणताही बेकार-भत्ता मिळत नाही. अडचणीच्या काळात आप्त मित्र यांचेवर तो अवलंबून असतो. आपल्यावर झालेल्या उपकाराची फेड तो दुसऱ्याला मदत देऊन करतो. एक कुटुंब एक गाव ही भावना नवीन योजनेत मोडावी का तिचा होईल तेवढा फायदा घ्यावयाचा हा एक प्रश्न आहे आणि या-मधूनच भारतीय बेकारीच्या प्रश्नाचा वेगळेपणा स्पष्ट होत आहे.

आपल्याकडील बेकारीचे आकडे काही मोठ्या देशाच्या संपूर्ण लोकसंख्येएवढे आहेत. अमाप भांडवलाचे पाठबळ असतानासुद्धा जर अमेरिका बेकारीची समस्या सोडवू शकत नाही, तर तुटपुंज्या भांडवलावर जवळजवळ अमेरिकेच्या लोकसंख्ये-एवढ्या बेकार लोकांना आम्ही पाच वर्षांत नोकऱ्या देण्याच्या वल्गना करण्यात काय अर्थ आहे? भारतातील सर्व बेकारांना नोकऱ्या अगर बेकारीभत्ता येत्या पाच वर्षात देणे शक्य नाही. किंबहुना बेकारांची संपूर्ण नोंद पाच वर्षांत झाली

तरी फार मोठे कार्य झाले असे म्हणावे लागेल.'

आपल्या बेकारीचा आणखी एक भाग म्हणजे, महारोगी, आंधळे, पंग वगैरे. यांचा आकडा पण फार मोठा आहे. अशा तऱ्हेचे कोटयावधी लोक आहेत की ज्यांचा एकमेव धंदा भीक मागणे हा आहे. या सर्व लोकांचा पोटापाण्याचा प्रश्न सोडवून त्यांना राष्ट्रीय उत्पादनात हातभार लावण्यास मदत करणे ही एक भारताची वेगळी समस्या आहे. हे भारतीय बेकारीचे एक वैशिष्ट आहे. असा भयंकर प्रश्न जगातील इतर कोणत्याही राष्ट्रापुढे नाही. या सर्वांचा विचार करता आम्हाला या प्रश्नाचा एक चाकोरीतून विचार न करता संपूर्णपणे वेगळ्या पद्धतीने विचार करणे जरूर आहे.

## नोकरी आणि चरितार्थ

या सर्वांना येत्या पाच वर्षांत किंबहुना दहा वर्षात कोणतेही सरकार नोकऱ्या देऊ शकणार नाही. तर मग या सर्वांच्या चरितार्थाची सोय काय? किमान ध्येय म्हणून या सर्वांची, निदान त्यांच्या पोराबाळांची उपासमार थांबवून त्यांचा आम्ही राष्ट्राची संपत्ती वाढविण्यास उपयोग करू शकतो का, हे पाहणे जरूर आहे.

खेड्यातील बेकार शहराकडे धाव घेतात ती थांबविणे, याला खेडी समृद्ध करणे हा एकमेव उपाय आहे. सघन शेती हा औद्योगीकरणाचा पाया आहे हे सर्वत्र अर्थ-शास्त्री मानतात. औद्योगिकरणाला लागणारे भांडवल व कारखान्यातून निर्माण होणाऱ्या मालाला गिऱ्हाईक हे दोन्हीही सघन शेतीमधून निर्माण होतात. जोपर्यंत शेतीउत्पादनात वाढ होत नाही तोपर्यंत औद्योगिकरण यशस्वी होण्याची आशा नाही. तेव्हा नवीन नोकऱ्या निर्माण करण्यासाठी जो पैसा खर्च होईल तो सर्व शेतीसुधारणेच्या कामी लावण्याशिवाय दुसरा पर्याय भारताला नाही.

स्वातंत्र्य चळवळीत गांधीजींनी खेड्यात चला असा संदेश दिला. शहरांचीच फक्त वाढ होऊ देणे व तिथे सर्व उद्योगधंदे केंद्रित करणे याला गांधीजींचा विरोध होता. आज मात्र त्यांच्या नावाच्या टोप्या मिरवणारे त्यांचे अनुयायी नको तेवढेच करत आहेत. स्वातंत्र्यानंतर मुंबई, पुणे, दिल्ली, मद्रास, कलकत्ता वगैरे दहा-पंधरा शहरांची भरमसाट वाढ झाली. जसजसे मोठे धंदे वाढले तसतसे भिकारी, झोपड-पट्टी, वेश्याव्यवसाय, चोऱ्या, खून, साऱ्या नको त्या गोष्टी वाढल्या. देशाची प्रगती सर्व दृष्टीने एकांगी झाली. खेड्यांच्या सुधारणेकडे संपूर्ण दुर्लक्ष केले गेले. संपत्तीची वाढ करताना, राष्ट्राची खरी संपत्ती प्रजा, तिची मात्र अवहेलना झाली. भांडवली खर्चात मानवी संपत्तीच्या विकासावर भांडवल खर्च झाले नाहीत. गांधीजींचे विचार माहीत असलेले गांधीवादी शिल्लक राहिले नाहीत.

बेकारीची समस्या वेगळी करून त्यावर तोडगा काढणे भारतातील कोणत्याही पक्षाच्या सरकारला शक्य होणार नाही. त्याची तीव्रता, त्यापासून होणारे दुष्परिणाम कमी करणे एवढेच उद्दिष्ट या पाच वर्षांत शक्य आहे. यापेक्षा जास्त साध्य नाही. तेव्हा जो भांडवली खर्च यापुढे बेकारीवर करणे शक्य आहे तेवढा सर्व खेड्यात होणे जरूर आहे. विहिरी खणणे, ताली बांधणे, दवाखाने-शाळा बांधणे, शेतीवर अवलंबून असलेले छोटे कारखाने उभारणे, रस्ते सुधारणे हे सर्व काम खेड्यात चालू केले पाहिजे. त्यासाठी लागणारे मजूर त्या कामाचे आजूबाजूचे खेड्यातून घेतले जावेत. याचे फायदे तावडतोब दिसू लागतील. खेड्यातून शहराकडे येणारा बेकारांचा ओघ थांबेल. खेड्यात रोजगारामुळे पैसे खेळू लागतील व खेड्यातील मालाला उठाव मिळेल. या कारणाने खेड्यातील रोजगारी आणखी वाढेल. शेतीउत्पादनात वाढ होईल व चरितार्थाचा प्रश्न काहीसा हलका होईल. याने बेकारीची समस्या सुटणार नाही. परंतु बेकारीच्या महापुराला बांध मात्र जरूर घातले जातील.

□ □ □

---

बांगला देश

: पृष्ठ १८ वरून

कोमिल्ला व अखौरा ह्यांना डाक्क्याशी जोडणारी एकुलती एक रेल्वे ताब्यात ठेवण्याच्या इराद्यानेच !

मिमेनसिंग व डाक्का ही शहरे जरा कोरडी आहेत. पण ती दोन नद्यांमध्ये अडकून पडली आहेत. पश्चिमेला ब्रह्मपुत्रा आहे व पूर्वेकडे मेघना ! नारायणगंज ते डाक्का हा सुमारे ३५ मैल लांबीचा एकच मोठा रस्ता पूर्व बंगालमध्ये आहे, ज्यावर रणगाडे चालू शकतील. डाक्का परत मिळवण्याच्या वेळी ह्याच रस्त्याचा पाकिस्तानने भरपूर उपयोग करून घेतला.

मिमेनसिंग हे दोन्ही प्रतिस्पर्ध्यांच्या दृष्टीने महत्वाचे शहर आहे. कारण जेथे पाऊस व वादळ ही कमी प्रमाणात असतात अशा उंचवट्याच्या प्रदेशाकडे मिमेनसिंगवरून पटकन् जाता येते, जे डाक्का किंवा चित्तगाववरून अशक्य आहे. पाकिस्तानच्या सैन्याचे लोक कदाचित् सबंध पावसाळा रंगपूर, दिनाजपूर व बोगरा ह्या विभागात घालवतील (त्यांच्या हातात ही गावे राहू शकली तरच अर्थात् !) आणि जमालपूर व बहादुराबाद येथून दळणवळण करू शकतील.

□ □ □



# कविता

सौ. शैलजा गिरमे

सकाळपासून पावसाची अखंड रिपरिप चालू होती. दिवसही या पावसाला कटाळल्यासारखा झाला होता, परंतु रात्रीलाही त्रास देऊन पावसाचा खोडकरपणा अजून जिरला नव्हता. शिवाय दिवसा पडून एकाच वेळी पुष्कळजणांना त्रास देण्याची संधी तो का सोडील? सूर्याच्या किरणांचा भरजरी पोशाख नेसून दिमाखात उगवणाऱ्या दिवसाचा नक्षा तो असाच कधीतरी त्याला चिंब भिजवून उतरवीत असे. सकाळची वेळ असूनही पक्ष्यांचा किलबिलाट कमीच होता. जणू तेही पावसाचा मूक निषेध करीत होते. खिडकीवरील पडदा बाजूला करून उभी असलेली मीराही तेच करीत होती.

पहाटे अंथरुणात असताना तिच्या खिडकीच्या तावदानावर पडणाऱ्या त्या लहरी तिला सतारीच्या झंकारासारख्या वाटल्या होत्या. त्याच नादात गुंगून ती परत झोपेच्या आधीन झाली होती. परंतु आता खिडकीबाहेर पाहताना तिच्या कपाळा वर आठ्या पडल्या होत्या. पावसालाही एक प्रकारचा रिदम् असतो, सूर असतो. कधी त्याच्या साथीला वारा असतो, मेघ असतात आणि कधी त्या तालावर बिजलीच्या नृत्याचाही कार्यक्रम असतो. मीरेला पावसाचे सर्व सूर आवडत.

पोरांसारखा थयथय धिंगाणा घालणारा सूर, घोडयांच्या टापांसारखा सूर, एखाद्या अवखळ मुलीसारखा धावत येणारा आणि लगेच लाजून तोंड लपवीत परत जाणारा न सांगता येणाऱ्या पाहुण्यांसारखा आणि त्या अवचित आगमनाने उडालेली त्रेधा-तिरपीट पाहणारा. परंतु आज त्याचा सूर इतका कंटाळवाणा झाला होता, जणू काही एखादा पगारी गायक कर्तव्य म्हणून काहीतरी आळवतो आहे. सृष्टीदेवतेच्या रंग-मंचावरील इतर श्रोत्यांनी त्याचा नाद सोडून देऊन कानात बोळे घालून आपापली नित्य कर्तव्ये सुरू केली होती. एरवी मीरा या पावसालाही पुरून उरे. चहाचा एक पेग मारून, हातात एक पुस्तक घेऊन खिडकीजवळ बसली की तिची समाधी लागे, पावसाचं पार्श्वसंगीत असेच. मधूनच पुस्तकातलं लक्ष काढून ती त्याच्यावर मेहरनजर करी आणि दाद देई. त्यामुळें स्फूर्ती येऊन तो अधिकच कंटाळवाणा सूर काढी.

परंतु आज त्याला या श्रोत्याची साद मिळेल असा रंग दिसत नव्हता. परत एकदा नाक मुरडून आणि आपली नाराजी व्यक्त करून ती स्वयंपाकघराकडे वळली. गरम वाफाळलेल्या चहानेही तिच्या चित्तवृत्ती फुलल्या नाहीत. 'आज काय करावे ?' हा नेहमीचा गहन प्रश्न तिच्यापुढे पडला. दादांच्या स्टडीकम् लाय-ब्ररीत गेलं की वेळेचा प्रश्न तावडतोब सुटला असता, पण आजचा दिवस वेगळा होता. कसलीतरी हुरहुर लागली होती. कशाची तरी प्रतिक्षा चालू होती.

हॉलमधल्या टीपॉयवर नवं कोरं रिडर्स डायजेस्ट पडले होते. ते पाहून मीरेचे मन जरा टवटवलं. पण बराच वेळ न वाचताच ती ते नुसतं चाळीतच राहिली. मग आता लक्ष देऊन वाचलंच पाहिजे या निर्धाराने तिने अनुक्रमणिका पहायला सुरुवात केली. 'Forget your Boredour' हे शीर्षक पाहून तिने पुस्तक उघडले आणि वाचायला सुरुवात केली. लेख वाचनीय होता, परंतु एक-दोन परिच्छेदानंतर आपल्या वाचनातला यांत्रिकपणा तिच्या लक्षात आला आणि तिने पुस्तक मिटून खाली ठेवले. पाच-दहा मिनिटे ती तशीच बसून राहिली. मग आपण जणू काही आजच हे घर बघतोय या दृष्टीने हॉलकडे पाहण्याचा चाळा थोडा वेळ केला पण त्याचाही कंटाळा येऊन तिने टेबलावरचे ताजे वर्तमानपत्र वाचायला सुरुवात केली. त्याच त्याच बातम्या. काही नाविन्य नाही. काहीच कसं निर्माण होत नाही. तिने वर्तमानपत्रही खाली ठेवले. दार उघडून बजाबा आत आला. त्याच्या हातात ताज्या भाजीची पिशवी होती. तिच्याकडे एक मूर्ख हास्य करून तो स्वयंपाकघरात गेला. तिच्या हिंदोळणाऱ्या मनाने एक कल्पना पकडली आणि ती स्वयंपाकघराकडे वळली.

"आज मीच करते ग सगळं" तिने इच्छा प्रदर्शित केली.

"नको ग. आधीच तुझी तब्बेत बरी नाही, त्यातून काही कमी जास्त झालं म्हणजे ?"

पण तिने ऐकले नाही. मग सगळा स्वयंपाक तिनेच केला. आई ही मग तेवढ्यात बाहेर जाऊन आली. कामाच्या गडबडीत पावसाची रिपरिप केव्हा थांबली हे

तिच्या लक्षात आले नाही. नावडत्या व्यक्तीकडे दुर्लक्ष करावे तसे तिने त्याच्याकड पूर्ण दुर्लक्ष केले होते.

नुकताच पाऊस पडून गेल्याने आणि सूर्याने मेघांची ओढणी दूर करून आपल्या तळपत्या सौंदर्याचे दर्शन दिल्यामुळे दुपार एका निराळयाच रंगात न्हाऊन निघाली होती. पावसाच्या सरीतील उरलेले मोती झाडांच्या पानातून ठिबकत होते. खरं तर काहीच उद्योग नसताना अशा हवेत उबदार पांघरुणात पडून राहण्याइतके सुख नव्हते. पण तिला तेही करावेसे वाटत नव्हते. काहीतरी करावेसे वाटत होते, पण ते काय हे उमजत नव्हते, त्यामुळे ती नुसतीच खिडकीबाहेर पहात उभी राहिली.

मनात निरनिराळया विचारांच्या आवर्तांची भेंडोळी उलटसुलट विणली जात होती, उलगडली जात होती. खिडकीत एका कोळयाने एक सुंदर जाळे विणायला घेतले होते, त्यावर सूर्याचा प्रकाश पडून ते चमचमत होते. इतकं नाजूक पण तरी सुस्पष्ट असं आपल्या हातून काहीच कसं होत नाही, या विचारात ती गुंगून गेली होती. दारावर टकटक झाली. दुपारी बेल वाजवायची नाही असा तिच्या बिल्डिंगचा सर्वमान्य शिरस्ता होता. तिने दार उघडले तो छोटा पिंटू तेथे उभा होता. 'चलो न दिदी कॅरम खेले!' त्याच्या या आर्जवी विनंतीला तिने तत्काळ मान दिला. सर्व दुपार ओलेत्या टेरेसवर कॅरम खेळण्यात घालवली. पूर्णपणे लक्ष देऊन तिला कॅरम खेळता आला नाही. विचाराच्या नादात तिने अख्खी दुपार टेरेसवर घालवली. आईला कळले तेव्हा ती चांगलीच रागावली, अशा स्थितीत गारठयात बसण्याने भलतंच काहीतरी होईल. तिला त्या संध्याकाळी कोठे बाहेरही जाता आले नाही. हॉल-मधल्या सोफयावर ती आईशी गप्पा मारीत, पुस्तक चाळीत थोडावेळ लोळली नंतर खिडकीबाहेर संध्याकाळची रहदारी न्याहाळीत उभी राहिली. आईच्याही लक्षात तिची अस्वस्थता आली होती. "जायचंय म्हणून इतकं काय मनाला लावून घेतेस? लवकरच येणार आहेस ना परत? तुला काही खावसं वाटत असेल तर सांग, नंतर मिळणार नाही."

ती काही बोलली नाही. मात्र जेव्हा आई स्वयंपाक घरात गेली, तेव्हा तीही तिच्यामागोमाग गेली. आई स्वयंपाक करताना तिच्याशी गप्पा मारू लागली. "आता बरं आहे ना मीरे? नाहीतर ऐनवेळेला काहीतरी घोटाळा करशील. जायची वेळ आली आहे नं?"

"तू काही काळजी करू नको ग. ठीक आहे मी." मीरेने तुटक उत्तर दिले आणि त्याचवेळेला तिच्या मनात विचार चमकून गेला. कल्पनेचा पक्षी भिरभिरला आणि त्याच्या पंखाच्या धक्क्याने तिच्या मनाचा लोलक हेलकावे खाऊ लागला.

नव निर्मितीच्या कल्पनेने बेहोष होऊन ती कधी आपल्या खोलीत गेली ते तिला कळलेच नाही. पांढऱ्या शुभ्र कागदावरून शाई झटपट उतरू लागली. बाहेर पाव-साच्या सरीही वेगात कोसळू लागल्या. लवकर संपले पाहिजे सगळं, दोन दिवसांनी तिचं कॉलेज सुरू होणार होतं त्यामुळे जावं लागणार होतं.

तिची पहिली कविता साकार झाली. □ □ □

सावरकरांच्या भीतीने मोडलेले

# साहित्य सम्मेलन

**संकलक : बाळाराव सावरकर**

काही सावरकर प्रेमी साहित्यिकांनी १९२४ मध्ये नागपूर येथे भरणाऱ्या साहित्य-सम्मेलनाच्या अध्यक्षपदासाठी सावरकर यांचे नाव सुचविले होते. अध्यक्षाची निवड करण्यासाठी स्वागत मंडळाची सभा रविवार दि. ५ ऑक्टोबर १९२४ ला नगरभवनांत (टाऊन हॉलमध्ये) झाली. ह्या सभेला ३७।३८ सभासद उपस्थित होते. स्वागत मंडळाचे अध्यक्ष सर गंगाधर चिटणवीस सभेला उपस्थित नव्हते. त्यांनी पत्राने कळविले होते की मातोश्रींच्या आजारपणामुळे ते सभेला उपस्थित राहू शकत नाहीत. ह्याच पत्रात त्यांनी अध्यक्षपदासाठी श्री. दादासाहेब खापर्डे यांचे नाव सुचविले होते. स्वागत मंडळाचे मुख्य सचिव श्री. भवाळकर यांनी हे पत्र वाचून दाखविले आणि त्यांनीच सूचना केली की आजच्या सभेचे अध्यक्षस्थान श्री. विश्वनाथराव केळकर यांनी स्विकारावे त्याप्रमाणे श्री. केळकर अध्यक्षस्थानी निवडून आले.

श्री. विश्वनाथराव केळकर हे विनायकराव सावरकर यांचे एक कट्टर सहकारी नि अनुयायी होते. ते बी. ए. एलएल. बी. होते आणि 'स्वातंत्र्य' ह्या पत्राचे संपादकहि होते. त्यांनी फेब्रुवारी १९२४ मध्येच रत्नागिरी येथे जाऊन वीर सावरकर यांची भेट घेतली होती. एवढेच नव्हे तर त्यांनी स्वा. वीर सावरकरांनी लिहिलेली हिंदुत्व, अंदमानाच्या अंधेरीतून, कमला आदी पुस्तके प्रसिद्धही केली होती. हेच विश्वनाथराव केळकर ह्या स्वागत मंडळाच्या अध्यक्षपदी निवडून आले.

सभेमध्ये प्रथम अध्यक्षांची निवडणूक कशी करावी, बाहेरून आलेल्या मतपत्रिका जमेस धराव्यात की नाही या विषयी बराच वादविवाद झाला. रा. मंडलेकर, घोरघडे आदी मंडळीं ती पत्रे जमेस धरू नयेत असे म्हणत होती. रा. ओगले, रा. ब. पंडित आदी मंडळी ती मते मोजणेच आवश्यक आहे अशा मतांची होती. कारण

कार्यकारी मंडळाने 'पत्राने आपली मतें पाठविली तरी चालतील' असे आगाउच सभासदांस कळविले होते. त्यामुळे जबलपूर, खानदेश, वर्धा आदी नगरांतील सभासदांनी आपली मतं टपालाने पाठविली होती. ही लेखो मते मोजली जावी असा अध्यक्षांनी निर्णय दिला.

त्यानंतर कार्यकारी मंडळाने १. श्री. खाडिलकर (कृष्णाजी प्रभाकर) २. गोविंदराव सरदेसाई आणि ३. श्री. शिवरामपंत परांजपे अशी जी नावे अध्यक्षपदासाठी सुचविली होती. ती कार्यवाहांनी सभेत मांडली. श्री. गोविंदराव देव यांनी श्री. खापर्डे यांचें नाव स्वागताध्यक्षांच्यावतीने सुचविले. श्री. उपाध्ये यांनी डॉ. केतकर यांचे, श्री. मंडलेकर यांनी श्री. माधवराव अणे यांचे रामचंद्रराव पाध्ये यांनी तात्यासाहेब कोल्हटकर यांच, विठ्ठलराव दाते यांनी वासुदेवराव आपटे यांचें आणि श्री. चोरघडे यांनी सावरकर यांचे नाव सुचविले.

त्यानंतर मतदान घेण्यात आले. मतमोजणीचा निर्णय असा : सावरकर ३४; गोविंदराव सरदेसाई ३२; खाडिलकर १४; खापर्डे ४, परांजपे २, डॉ. केतकर नि वासुदेवराव आपटे यांस प्रत्येकी एक एक मत, अशी मते पडली आणि अध्यक्षांनी सावरकर मराठी साहित्य सम्मेलनाच्या अध्यक्षपदी बहुमताने निवडून आले अशी प्रकट घोषणा केली.

सावरकर यांना जी ३४ मते मिळाली त्यापैकी १९ मते तेथे उपस्थित असले- ल्यांची होती आणि टपालाने १५ मते आली होती.

पुढे सभेत असे ठरले की सावरकर यांस मुंबई इलाख्यांतील विशिष्ट मर्यादे- पलिकडे जाण्यास सरकारी बंदी आहे. त्यामुळे ते येऊ न शकल्यास त्यांच्या जागी अध्यक्षपद श्री. सरदेसाई यास देण्यात यावे.

सावरकर अध्यक्षपदी निवडून आल्याचे प्रसिद्ध होताच, स्वागत मंडळाचे अध्यक्ष सर गंगाधरराव चिटणवीस यांनी अध्यक्षपदाचे त्यागपत्र दिले. सावरकरांच्या विरोधकांनी ही निवडणूक अवैध आहे असा प्रचार चालू केला.

ह्या संबंधात दि. ८ ऑक्टोबरचा 'महाराष्ट्र' लिहितो की "सदर निवडणूक ही स्वागत मंडळाच्या सभासदांच्या बहुमताची निदर्शक आहे असे म्हणता येणार नाही. नागपूर शहरातील पुष्कळ सभासद, त्या दिवशी येथील टिळक विद्यालयाच्या मदतीसाठी बलवंत संगीत मंडळीने केलेल्या 'पुण्य प्रभाव' नाटकास गेल्याकारणाने सभेस आले नव्हते. सावरकर यांचे नाव अध्यक्षपदाकरिता येणार अशी आगाऊ कुणकुण असती, तर स्वा. मं. चे बहुतेक सभासद अवश्य हजर राहिले असते. सावरकरांस बहुमत मिळाले ते केवळ आगाऊ रचून ठवलेल्या व्यूहामुळे मिळाले असे दिसते. सावरकरांस ज्या १९ गृहस्थांनी सभेत मते दिली; व ज्या १५ गृहस्थांनी त्यांचे नाव सुचविणाऱ्या मतपत्रिका लिहून पाठविल्या त्यापैकी बरीच मंडळी सभासद झालेली होती की नाही याबद्दल साहित्य सम्मेलन कचेरीला किंवा

सेक्रेटरीला बिलकुल गंधवार्ता नव्हती. त्यांना ज्या गृहस्थाने सभासद बनविले व त्यांच्यापासून फी गोळा केली त्याने सभा सुरू होण्यापूर्वी किंवा निदान निवडणूक सुरू होण्यापूर्वी तरी ' अमुक अमुक गृहस्थ सभासद झाले आहेत; त्यांनी मजकडे वर्गणी भरली आहे; व ते आजच्या सभेत भाग घ्यावयास आले आहेत " असे सेक्रेटरीस कळवावयास नको होते काय ?'

त्याच लेखात ' महाराष्ट्र ' पुढे लिहितो ' रविवारी झालेल्या आकस्मिक व गैरशिस्त बहुमताच्या जोरावर झालेल्या निवडणुकीच्या बेकायदेशीरपणाबद्दल स्वा. मं. च्या बऱ्याच सभासदांनी कार्यकारी मंडळाकडे तक्रार पाठविली आहे; व ती प्रसिद्धीसाठी आमच्याकडेही आली आहे. तिचा योग्य विचार कार्यकारी मंडळ करीलच......

' दे. भ. सावरकरांस निवडून देऊ इच्छिणारांनी निदान या प्रांतातील सन्मान्य गृहस्थांची नावे उगाच अध्यक्षपदासाठी सुचवून त्यांची थट्टा करण्याचे कारण नव्हते......

...सावरकरांस आपली मते द्यावयाची ठरविल्यावर दुसऱ्या सन्मान्य गृहस्थांची नावे सुचवून त्यांच्या नावास एकही मत मिळू न देण्याची थट्टा करण्यात तुमचा काय हेतू होता ? आपण जे नाव सुचविले त्यास अनुकुल मत देणे हे तुमचे प्रामाणिक कर्तव्य नाही काय ?'

ह्याच लेखात ' महाराष्ट्र ' पुढे लिहितो, ' श्री. सावरकर यांचे नाव यंदाच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी सुचविले जाऊ नये, असा आमचा अभिप्राय आम्ही पूर्वीच व्यक्त केला होता, व तसा आमचा अभिप्राय का आहे याची कारणे ही आम्ही आमच्या ता. २४ सप्टेंबरच्या अग्रलेखात दिली होती. त्यातील काही भाग आम्ही येथे उद्धृत करतो– ' बॅ. सावरकर यांच्या देशभक्तीबद्दल व स्वार्थत्यागाबद्दल त्यांचे उतराई होण्यात आम्ही कोणत्याही प्रकारे इतरास हार जाणार नाही. तरीसुद्धा आम्हास असे वाटते की त्यांचे नाव इतक्यातच साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी सुचविले जाऊ नये. सध्याची साहित्य संमेलनाची घटना अशी आहे की तिला सावरकरांसारखा अध्यक्ष पचावयाचा नाही. हल्लीच्या संमेलनात सरकारी नोकरसुद्धा सामील होत असतात. सरकारी नोकर, मवाळ, जहाल, त्रयस्थ, इत्यादी सर्व मताचे लोक एकत्र जमण्याची जी थोडीशी सार्वजनिक स्थळ आज मोकळी आहेत, त्यात सरस्वतीचे मंदिर हे एक आहे. सावरकरांसारखा सरकारला अत्यंत अप्रिय असलेला मनुष्य अध्यक्ष केला, तर सरकारी नोकरास या संमेलनात भाग घेता येणार नाही. खुद्द सरकारी नोकरांसही बॅ. सावरकरांविषयी मनात आदर नसेल असे नाही, पण ते अध्यक्ष झाल्यास संमेलनात भाग घेण्यास त्यांस भीति वाटेल, हे साहजिकच आहे. ' जाईनात सरकारी नोकर ' असेही काही लोक म्हणतील; पण आम्ही तसे म्हणावयास तयार नाही. '

याच कारणासाठी आम्हास बॅ. सावरकरांची निवडणूक पसंत नव्हती, व अजूनही नाही. मराठी साहित्य संमेलनात राजकीय पक्षभेद किंवा इतर मतभेद आड येऊ नयेत. मराठी भाषेच्या झाडून साऱ्या अभिमान्यास व सर्व वाङ्मयसेवकांस या संमेलनात सामील होता आले पाहिजे. अशी आमची पूर्वीपासून समजूत आहे. ता. १३ ऑगस्टच्या 'महाराष्ट्रा'च्या अग्रलेखात आम्ही पुढील वाक्ये लिहिली होती. 'वाङ्मयाच्या क्षेत्रात पक्षभेद, जातिभेद किंवा स्वभावभेद यास जागा नाही.- महाल-मवाळ, सरकारी नोकर, फेरवाल-नाफेखाला, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, अस्पृश्य श्रीमंत-गरीब, मालगुजार व शेतकरी मजूर, या सर्वांसच आपली महाराष्ट्रीय मातृभाषा ओजस्वी, तेजस्वी व वीर्यशाली व्हावी, अशी कळकळ असणारच. अशी कळकळ नसणारा किंवा जन्मभाषेविषयी तिरस्कार करणारा कोण असतो? सरस्वतीच्या सभामंडपात सर्वांस सारखेपणाने व चढाओढीने काम करण्यास अवकाश आहे.' महाराष्ट्र यात पुढे लिहितो, 'हीच आमची समजूत अजूनही ठाम असल्याकारणाने आम्हास श्री. सावरकरांची निवडणूक पसंत नाही.'

## महाराष्ट्राला उत्तर

महाराष्ट्राच्या ह्या लेखाला नि युक्तीवादाला उत्तरे देणारे जे काही लेख त्यावेळी प्रसिद्ध झाले आहेत त्यापैकी दि. १२ ऑक्टोबरच्या 'स्वतंत्र'मध्ये प्रसिद्ध झालेला 'वामनात्मज' यांचा लेख खाली देत आहे. 'वामनात्मज' यांनी या संबधात पाच-सहा तरी लेख लिहिले आहेत. हे 'वामनात्मज' कोण? पुढे 'वामनात्मज' यांच्या लेखाचा जो भाग देत आहे त्यात लिहिले आहे की 'श्री. गोविंद प्रल्हाद देव हे वामनात्मजाचे नाव सुचवितील.' श्री. देव यांनी सर. चिटणवीस यांच्या वतीने श्री. खापर्डे यांचे नाव सुचविलेले आहे. म्हणजे श्री. खापर्डे हेच 'वामनात्मज' ह्या नावाने लिहीत असत की काय? की श्री. विश्वनाथराव वामन केळकर हेच 'वामनात्मज' लिहीत असत? जुने साहित्यिक याविषयी लिहितील अशी आशा करून 'वामनात्मज' यांचे सडेतोड उत्तर पुढे देतो :

ते लिहितात 'साहित्य संमेलनाच्या अध्यक्षाच्या अंगी केवळ दोन गुण असले म्हणजे पुरे आहे अशी लेखकाची आजपर्यंत समजूत होती. एक विद्वत्ता व दुसरा कळकळीची व उत्कट साहित्य भक्ती. पण आमच्या नागपूरच्या साहित्यज्ञांनी तिसरा एक गुण—अवगुण म्हणण्याचे धाडस कसे करायचे! अध्यक्षपदाकरिता उमेदवार असलेल्या गृहस्थांची लायकी कसोटीस उतरविण्याकरिता शोधून काढला आहे. तो गुण म्हटला म्हणजे संमेलनाचा अध्यक्ष इतका सोज्वळ व सोवळा असला पाहिजे. की सरकारी नोकरांना त्याच्या नजरेस नजर भिडविण्यात संकोच वाटता कामा नये. ही कला ज्याला अवगत नाही, तो कितीही विद्वान असला, किंवा केवढाही 'उत्कट वृत्तीचा' साहित्यभक्त असला, तरी तो अध्यक्षत्वाच्या गादीला नालायक आहे. 'विद्वान सर्वत्र पूज्यते' म्हणतात...पण आमच्या नागपूरच्या

साहित्य ददयांनो असे ठरविले आहे की, संमेलनाचा अध्यक्ष नसता विद्वान व कळकळीचा साहित्यभक्त असून चालणार नाही, तर सरकारी नोकर ज्यांना भिणार नाहीत, पदवीवाल्यांना ज्याची डर वाटणार नाही, पेन्शनरांचे पाय ज्याला पाहताच लटलट कांपायला लागणार नाहीत, व ज्याला पाहून नेक-नामदार साहित्यसेवक 'निहायत' खूष होतील असे सदर अध्यक्षाचे पूर्व चरित्र नरम, मृदुमृदुल व दिलखुष असले पाहिजे.'

महाराष्ट्रकारांना उत्तर देताना ह्याच लेखात वामनात्मज पुढे लिहितात— 'सावरकरांचे नाव अध्यक्षपदाकरीता सुचविले जाणार अशी जर आगाऊच गुणगुण असती तर नाटक पहाण्याचा मोह खात्रीने पुष्कळ सभासदांनी आवरून धरला असता व सावरकरांना जो दोन मतानी विजय मिळाला तो प्रचंड बहुमताने मिळाला असता...कार्यकारी मंडळाने सुचविलेली तीन नावे सावरकरांच्या प्रताप-सूर्यापुढे दिपून गेली असती. सावरकरांचे नाव सदर लेखकाने 'स्वातंत्र्या'तून सुचविल्यानंतर त्यासंबंधी शहरात चर्चा चालू झाली व यापेक्षा दुसरी योग्य निवड शक्य नाही असेच बहुतेकांचे मत पडले. परंतु सावरकरांवर ज्या निर्दय सरकारी नियंत्रणाचे दडपण पडले आहे त्याकडे लक्ष देता त्यांच्या अंगावर ही जबाबदारी टाकणे इष्ट होणार नाही असा नागपूरच्या जनतेचा साधारण कल दिसल्यामुळे हा विषय तसाच सोडून देण्यात आला. यानतर महाराष्ट्राने सावरकरांच्या नाव. ज्या हरकती घेतल्या त्या अत्यंत फोल व काल्पनिक असल्यामुळे त्यांचे वैवर्थ सिद्ध करण्याकरताच सदर लेखकाने फिरून निवडणुकीचे आदले दिवशी स्वातंत्र्यात लेख पाठविला व आपल्या वैयक्तिक रुचिनुसार गुणानुक्रमे काही नावे सुचविली. पण त्यावेळेपर्यंत सुद्धा वरील कारणांमुळेच सावरकरांच्या नावाविषयी आग्रह धरण्याचे कोणाच्या स्वप्नीसुद्धा नव्हते. परंतु त्यानंतर कित्येक साहित्य बुवांना सावरकरांच्या चाहत्यांना आव्हान दिले की पाहू या तुम्ही सावरकरांना कसे निवडून आणता ते. त्या आव्हानाचाच सावरकराची निवडणूक हा परिणाम होय. हे आव्हान ज्यावेळी देण्यात आले त्यावेळी सभेला अत्यंत थोडा अवधी होता परंतु ह्या थोड्या वेळातच या आव्हानाची 'गुणगुण' सर्वत्र फैलावली व सावरकरांच्या पुण्यप्रभावाने आव्हाहकांचे प्रयत्न उलथून पाडून सावरकरपक्षीयांना विजय मिळवून दिला.'

निवडणुकीच्या दिवशीच सकाळी प्रसिद्ध झालेल्या 'सावरकरांनाच अध्यक्ष निवडा' ह्या दि. ५-१०-२४ च्या 'स्वातंत्र्य'मधील लेखात वामनात्मज यांनी लिहिले होते की 'भगवती सरस्वती ही 'वीणावर दण्ड मण्डित करा' आहे. हे सरस्वती भक्तांनी विसरून चालणार नाही. ती ज्याप्रमाणे नादब्रह्माची स्वामिनी आहे, त्याचप्रमाणे निग्रहानुग्रह समर्थ आहे. उत्पत्ती, स्थिती, लय या त्रिविध जगस्थितीचे कर्ते ब्रह्माच्युत शंकर प्रभृति देव त्यांनीही अभिवादन करावे असे तिचे अजस्त्र सामर्थ्य आहे. ज्या सरस्वतीचे इतके अलोट सामर्थ्य आहे त्या

सरस्वतीच्या मंदिरात मेषपात्र श्याडांना स्थान मिळणे शक्य नाही. सरस्वतीचे भक्त सरकारी नोकर असले तरी चालतील पण जर ते एका सरस्वती-भक्ताला, तो केवळ सरकारला अप्रिय आहे म्हणून बहिष्कृत करतील तर ते सरस्वती भक्तच नव्हेत. साहित्य संमेलनाची परंपरा सरकारी नोकरांस वगळण्याची नाही. आणि त्याने सरकारी नोकरांस वगळावे असा तरुण पिढीचा बुढ्ढ्या पिढीला आग्रह नाही, परंतु सावरकरांसारख्या साहित्य भक्त देशसेवकाचा आदरसत्कार करण्यास सरकारी नोकरांची अस्मिता आड का यावी हेच तरुण पिढीला समजत नाही. सरकारने त्यांना येण्याची परवानगी दिला नाही तर गोष्ट वेगळी.

याच संबंधात श्री. रामचंद्र सखाराम खोलकुटे व काही सभासद लिहितात,'... याच सभेत जर सावरकर निवडून आले नसते तर शिस्त गैरशिस्तीचा प्रश्न गुलदस्तात ठेवून याच लोकांनी आनंदाने टिऱ्या बडविल्या असत्या....मनाविरुद्ध गोष्टी होताच कायदेशीरपणा व गैरशिस्तपणा नंतर सुचायला लागला.'

१९२४ मधील घडलेल्या घटनाचे हे वर्णन त्या वेळची ही उत्तरे-प्रत्युत्तरे यांची तुलना आजच्या १९७१ च्या परिस्थितीशी केली तर असेच म्हणावे लागेल की मनुष्य स्वभाव हाही ठराविक चाकोरीतच फिरत असतो !

सावरकरांच्या विरोधकांना उत्तर देताना दि. ९ ऑक्टोबर १९२४ च्या 'स्वातंत्र्य'मध्ये श्री. वा. न. घोरपडे लिहितात. '...सरकारी नोकरांच्या सबबी-वर सावरकरांना विरोध करू पहाणे अत्यंत अविचाराचे आहे...सरकारी नोकर परावलंबी असले तरी सारासार विवेकशून्य असतील असे आम्हास वाटत नाही. साहित्यसंमेलन ही राजकीय परिषद नव्हे हे त्यांना कळत नाही काय ? 'राजकीय सावरकर नि 'साहित्यभक्त' सावरकर यांच्यातील भेद त्यांना ओळखता येत नाही काय ?...सरकारी नोकर म्हटला म्हणजे तो वृत्तीने 'भित्रा' व 'परावलंबी' असलाच पाहिजे असा सदर लेखकाचा समज झालेला दिसतो. पण अनाठायी व असमंजस भीती बाळगण्याइतके साहित्य सेवकाचा उच्च दर्जा संभाळून असलेले सरकारी नोकर मूर्ख असतील असे आम्हाला वाटत नाही....सावरकर ही एक राजकीय व्यक्ती आहे म्हणून त्यांचे साहित्य विषयक विचारसुद्धा आम्हाला ऐकाव-याचे नाहीत असे म्हणणारे जे असतील त्यांच्याविषयी पर्वा करण्याचे खरोखरच काही कारण नाही. इतका कमालीचा असमंजसपणाचा दुराग्रह व भीती साहित्य संमेलनाच्या कार्यात वावरू लागली तर सावरकरांनाच काय पण राजकारणात पडण्याचे पाप ज्यांच्या हातून घडले असेल, अशा बऱ्याच थोर व्यक्तींना साहित्य संमेलनास मुकावे लागेल...अध्यक्षांची निवड सर्व संग्राहक दृष्टीने झाली पाहिजे असे लेखक म्हणतो पण त्याच्या सर्वसंग्राहक दृष्टीला भित्रे सरकारी नोकर चालतात, पण सावरकर मात्र चालत नाहीत...सदर लेखकाच्या 'सर्वांत' सावरकरांचा समावेश होत नसल्यास गोष्ट निराळी. सावरकर अध्यक्ष नको म्हणणे म्हणजे पर्यायाने

ावरकरांनी संमेलनाला हजर राहू नये असे म्हणण्यासारखेच आहे. कारण लेखकाच्या कल्पनेतील सरकारी नोकर हे अध्यक्षपीठावरील सावरकरांना भीतील आणि अध्यक्षपीठाशेजारच्या साध्या खुर्चीवर बसलेल्या सावरकरांना भिणार नाहीत याची हमी कोण देईल ?...राजकारणांतील सरकारची बंदी व साहित्यक्षेत्रात स्वजनांची बंदी अशा रीतीने दोन्हींकडून बहिष्कृत झालेल्या सावरकरांचे दृष्य. त्यांच्याविषयी आदर असलेल्या कृतज्ञ लेखकाला मोठे रमणीय दिसेल नाही बरे !'

श्री. घोरपडें यांनी १९२४ मध्ये लिहिलेल्या ह. पा. लेखात सरकारी नोकर भित्रे नाहीत, परावलंबी नाहीत असे लिहिले आहे. सरकारी नोकर असे असले पाहिजेत. दे. भ. न्यायमूर्ती रानडे यांच्यासारखे काही सरकारी नोकर थोडे निडर होते हे खरे पण–? सर्वसाधारण सरकारी नोकर एवढेच काय पण मंत्र्यासारखे हंगामी सरकारी सेवकसुद्धा ह्या दशकातही सावरकरांचे नाव घेण्यास घाबरतात ही वस्तुस्थिती आहे ! न्यायमूर्ती गजेंद्र गडकर यांनी त्यांच्या समाज प्रबोधन ग्रंथांत गल्लीतील समाज सुधारकांच्या कार्याचाही उल्लेख केला आहे पण समाजसुधारक सावरकरांचे नाव त्यांनी घेतले नाही ! ! यशवंतराव चव्हाण यांनी अंदमानात केलेल्या भाषणातही सावरकरांचे नाव घेतले नाही. जाऊ द्या ! तो ह्या लेखाचा विषय नाही !

## आता डॉ. मुंजे

मे १९२४ मध्ये रत्नागिरीत प्लेगचा प्रादुर्भाव झाल्यामुळे सावरकरांना काही दिवस नासिकला राहण्याची अनुज्ञा मिळाली होती. त्यावेळी महाराष्ट्राचे वतीने दि. २८ ऑगस्टला डॉ. मुंजे यांच्या अध्यक्षतेखाली वीर सावरकर यांचा भव्य सत्कार करण्यात आला. त्यावेळी डॉ. मुंजे म्हणाले होते, ' सावरकरांसंबंधी पुष्कळ

---

## गडकरी नि सावरकर

' महाराष्ट्रामध्ये जर कवी कोणी झाला असेल तर ते गडकरीच होत. राष्ट्रीय दृष्टीचा अभाव हे जरी गडकऱ्यांच्या कवितेचे वैगुण्य असले तरी काव्य या दृष्टीने त्यांची योग्यता मोठी आहे.' हे विचार स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी साप्ताहिक 'वैनतेय'च्या प्रतिनिधीने दि. ३० एप्रिल १९२५ ला विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना व्यक्त केले आहेत. प्रश्न होता की, ' अलिकडची कविता आपण वाचली आहे काय ?'

ह्या प्रश्नाला उत्तर देताना स्वा. वीर सावरकर पुढे म्हणाले, ' मराठीचा विस्तार स्पृहणीय रीतीने होत असला तरी पूर्वीच्या मराठीत जे एक प्रकारचे पौरुष किंवा तेज दिसत असे, ते हल्ली दिसत नाही असे कष्टाने म्हणावे लागते.

बोलावेसे वाटते. अनेक कल्पना मनात उद्भवतात आणि त्या कल्पना बोलाव्या म्हणून मनाला स्फूर्ती मिळते, पण नाइलाज म्हणून ती दाबून ठेवावी लागते. बॅ. विनायकरावजींची योग्यता एकाच शब्दात सांगावयाची म्हणजे आपल्या अंगातील चिवटपणा नि जिवंतपणा हार खाल्ल्यावरसुद्धा जाऊ न देणारे तात्यासाहेब सावरकर आहेत. माझ्या मनातील विचारतरंग व स्फूर्ती तशीच दाबून ठेवून मी समारंभ पुरा करतो.' (नवाकाळ दि. ३०-८-२४) थोर सावरकरांच्याविषयी हे विचार व्यक्त करणारे डॉ. मुंजे सावरकरांनी अध्यक्ष होऊ नये असे म्हणणाऱ्या गटात होते, असे खालील उताऱ्यांवरून दिसते. 'चाबुक' १२-१०-२४ च्या अंकात मारलेले हे खुशखुशीत तडाखे पहा. १ : नागपूर येथील साहित्य परिषदेचे अध्यक्षस्थानी दे. विनायकराव सावरकर यांची निवडणूक झाल्यापासून ओगले, मुंजे वगैरे काही लोकांना फार वाईट वाटायला लागलेले आहे. पण ओगले, मुंजांनी ह्यात भिण्यासारखे काय आहे? विनायकराव म्हणजे कोणी बागुलबुवा नव्हे ना? २ : ओगले मुंजांचे असे म्हणणे आहे की आम्ही स्वतःकरिता भीत नाही, पण काही सरकारी नोकर भितात व ते भितात म्हणून आम्ही भितो. ३ : वा काय हा कोटिक्रम! पूर्वी नागपूर येथे काँग्रस भरावयाची होती व लो. टिळकांना काँग्रेसचे अध्यक्ष करावयाचे लोकांच्या मनात होते. त्यावेळी मवाळ लोक जे म्हणत होते तेच आता ओगले-मुंजे म्हणत आहेत...त्यावेळी ओगले-मुंजे लोकांचे बाजूने होते, त्यावेळी भित्रेपणाबद्दल ते मवाळ लोकांचे कान उपटीत होते. पण आता ते स्वतःच भ्यायला लागले आहेत. आता त्यांनेच कान उपटण्याची पाळी आलेली आहे......विनायकराव सावरकर हे सरकारी हुकमाने तुरुंगातून सुटलेले आहेत. ते काही पळून आलेले नाहीत. तेव्हा जे सरकारच्या हुकमाने तुरुंगातून सुटले ते अध्यक्ष झाल्यास सरकारी नोकर कशाला भितील?......मग ओगले, मुंजे जी भीती वर्णन करतात ती कुणाची? ती त्यांच्या स्वतःच्याच मनाची! त्यांचे मन सध्या दुबळे झालेले आहे, म्हातारे झालेले आहे. 'वुईक' झालेले आहे. मवाळ झालेले आहे. भेकड झालेले आहे.

अशी ही उलटसुलट चर्चा त्यावेळच्या वृत्तपत्रांतून बरेच दिवस चाललेली आढळते. 'सावरकर अध्यक्ष का नकोत' ह्या मथळ्याखाली ७ नोव्हेंबरच्या 'स्वातंत्र्या'मध्ये श्री. ग. त्र्यं. माडखोलकर आणि पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांचे एक निवेदन प्रसिद्ध झाले आहे. ह्या वादामुळे नागपूरला हे साहित्य संमेलन भरण्याचेच स्थगित झाले.

१६ एप्रिल १९२५ च्या नासिक येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'स्वातंत्र्य'मध्ये खालील वार्ता प्रसिद्ध झालेली दिसते. वार्ता अशी : महाराष्ट्र साहित्य संमेलन नासिक येथे येत्या सप्टेंबर ऑक्टोबरमध्ये भरणार असल्याचे काही वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाले आहे. पण खुद्द नासिकला याची विशेष माहिती अद्याप तरी नाही. हे संमेलन नागपुरास भरायचे होते पण सावरकरांचे अध्यक्षपद न मानवण्याइतकी त्यांची

नाजुक प्रकृती बनल्यामुळे या वादापायी या संमेलनाने नागपूर सोडले. नाशिक येथे ह्या वाद न माजता अध्यक्षाच्या निवडीच्या वेळी त्याच्या राजकीय मताचे वावडे मनात न आणता त्यांची साहित्य सेवाच लक्षात घेतली जाईल अशी आम्हास आशा आहे !

ह्या वार्तेत लिहिल्याप्रमाणे नाशिकलाही हे संमेलन झाले नाही. ह्या संबंधात दै. 'लोकमान्य' मध्ये एका साहित्य भक्ताचे पत्र प्रसिद्ध झाले आहे. त्यात त्याने 'लोकमान्यकर्ते' यांस लिहिले आहे की, दोन वर्षे होत आली तरी संमेलन का भरत नाही. असल्या कार्यांना अडचण असते ती पैशाची. पण हजारो रुपये शिल्लक असलेल्या साहित्य परिषदेला ही अडचण असणे शक्य नाही. मग अडते आहे कोठे?

## ह्या हजारो रुपयांचे काय ?

वरील पत्रात उल्लेखिलेले हजारो रुपये कोणाकडे होते हा प्रश्न साहजिक येतो! त्याचे उत्तर 'चाबुकस्वार' मध्ये प्रसिद्ध झालेल्या श्री विठ्ठल वामन हडप यांच्या दि. २२-२-२६ च्या पत्रात मिळते. श्री. हडप लिहितात, 'महाराष्ट्र साहित्य परिषद या नावाची संस्था मुंबईत आहे. तिची कचेरी पूर्वी लक्ष्मीनारायण छापखान्यात होती. पण आता ती रा. ब. पाध्ये यांच्या दिवाणखान्यात गेली आहे... परिषदेचा जमाखर्च १९२० सालअखेर १९२२ साली ऑडिट होऊन प्रसिद्ध झाला. त्यावरून असे दिसते की, एकूण १४ हजार रुपये परिषदेचा फंड होता. पण गेल्या पाच वर्षांत हिशेब नाही...नागपूर नि नाशकास दोन ठिकाणी संमेलन भरविण्याची खटपट झाली, पण तेथे बॅ. सावरकरांचा बागुलबोवा उभा राहिला. वस्तुतः संमेलनास दुसरी कसली अडचण नसून रा. ब. पाध्ये यांचा अध्यक्षपणा कायम राहील अशी कोणी हमी देत नाही हीच बहुधा असावी...येते ११ वे महाराष्ट्र साहित्य संमेलन येत्या इस्टरच्या सुटीत मुंबईस भरावयाचे आहे आणि अध्यक्ष कोणीतरी पाध्यांच्या पचनी पडणारा सभासद बाई किंवा बोवा होणार असे गृहीत धरण्यास हरकत नाही. तात्पर्य, महाराष्ट्र भाषेची अभिवृद्धी करण्याकरिता स्थापन झालेल्या सभेची अशी दीन अवस्था पाहून कोणालाही कीव आल्यावाचून रहाणार नाही:.. बॅ. सावरकर अध्यक्ष झाले असते तर कोणाचे काय बिघडले असते? मराठी भाषेची इमारत खचित ढासळून पडली नसती ''

श्री. हडप यांनी ह्या पत्रात लिहिल्याप्रमाणे ही साहित्य परिषद थोड्याच दिवसात समाप्त झाली ! तिचे ११ वे अधिवेशन काही भरलेले दिसत नाही. तिच्या स्थानी महाराष्ट्र साहित्य संमेलन ही नवी संस्था स्थापन होऊन तिचे अकरावे अधिवेशन दि. ३-४-५ मे १९२६ ला मुंबईत सरदार किबे यांच्या अध्यक्षतेखाली भरले. एवढेच नव्हे तर सरदार किबे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रारंभीच दे. भ. वि. दा. सावरकर यांच्या वाङ्मयातील थोर योग्यतेचा अतिशय गौरवपूर्वक उल्लेख केला.

[ ता. क. परवा पुढची कात्रणे पहाता पहातां ह्या संबंधात वीर सावरकरांनी १९२४ मध्येच लिहिलेले पण ' ज्योत्स्ना ' च्या सप्टेंबर १९३६ च्या अंकात छापलेले पत्र पाहिले. त्यामध्यें वीर सावरकर यांनी त्यांच्या बाजूने असलेल्या लोकांचे म्हणणे कसे योग्य आहे तेंच दाखविले आहे. त्यांनी जे लिहिले आहे. त्याचा सारांश असा :

१. ज्या सद्गृहस्थानी माझ्याविरुद्ध मते दिली त्यांनी ती सद्हेतुपूर्वकच दिली. याविषयी मला मुळीच शंका नाही.

२. पेन्शनर भीतिस्तव बहुमतास धुडकावणे हे तत्वतः चुकीचे आहे.

३. तसे करणे म्हणजे ज्यांनी सर्व विचार करून मते दिली ते अविचारी होते असे म्हणणे होय.

४. साहित्यक्षेत्रात कोणालाही प्रतिबंध नसावा हा नियम जितका पेन्शनरांना लागू तितकाच तो आम्हासही लावावा. निराधार भीतीने आमचे न्याय्य अधिकार लाथाडू नयेत.


५. माझ्या अयोग्यपणाविषयी वा मजविरुद्ध आक्षेप असेल तर तो स्पष्ट कळवावा. मी त्याचा सादर विचार करीन.


६. साहित्य संमेलनाची विनंती नाकारून सरकारने मला नागपूरला येण्यास अनुज्ञा दिली नाही तर तो माझा दोष नव्हे.

७. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत असे घोटाळे होतातच. ॲनी बेझंटचे वेळी काही संभावित लोक कॉंग्रेस सोडतील असे सुरेंद्रनाथ सांगत असताही टिळकांनी वा ॲनी बेझंटने बहुमताने रितसर दिलेला निर्णय अमान्य केला नाही. आपण सर्वजण मिळून साहित्य सम्मेलन उत्कृष्ट रीतीने पार पाडून व जे येण्यास कां-कू करीत असतील त्यांसही संतुष्ट व आश्वासित करून घेऊन येऊ अशी मला पूर्ण निश्चिती आहे.

आपला सावरकर ]

**[ स्वा. वीर सावरकर यांच्या संग्रहातील कात्रणांच्या आधारे ]**





पुस्तके

केशव मेश्राम

# प्रचलित संकेतात अडकलेल्या
# रानातल्या कविता

कवितासंग्रहांच्या प्रसिद्धीचा झपाटा वादविण्यासाठी म्हणून पॉप्युलर प्रकाशनाने 'नवे कवी नवी कविता' ही योजना सुरू केली. श्री. ना. धों. महानोर यांच्या 'रानातल्या कविता' त्या योजनेखाली प्रसिद्ध झाल्या आहेत. 'रानातल्या कविता' हा मराठवाड्यातील एक यशस्वी कवी श्री. ना. धों. महानोर यांच्या चौसष्ट कवितांचा संग्रह.

मराठी कवितेमध्ये रविकिरण मंडळापासूनच रचनेचे नवनवे बरेवाईट प्रयोग जोमाने सुरू झालेले दिसतात. ग्रामजीवनाच्या, शेतकऱ्यांच्या आयुष्यातील चढ-उताराची स्पंदने, त्यातील नाटच मोठ्या प्रमाणावर मराठी कवितेत आणण्याचा सातत्याने प्रयत्न झाला आहे. ग. ल. ठोकळ यांची 'सुगी', ग. ह. पाटलांची 'रानजाई' व 'लिंबोळ्या' हे त्यातल्या त्यात यशस्वी प्रयत्न. पण बाकीची कविता घाईघाईने पाहिलेली; अर्धकच्च्या कल्पनाचक्षूंनी शब्दाकार केलेली; एखाद्या तालबद्ध बोळीच्या कंपनातून निर्माण झालेली; आणि फक्त ग्रामजीवनाचा 'वास' छावलेली अशी होती. श्री. महानोर यांची कविता अशी परस्थ नाही. त्यांच्या कवितेतील निसर्ग हा रसरशीत आहे; 'रान' गच्च भरलेले आहे; आणि संध्या-वेळा उत्कट आहेत. पाखरांच्या खाणाखुणांची बोली, रंगगंधाचे अस्सल संकेत, भर-लेल्या कणसातील दुधाळ तृप्त चव, आणि पोटातील भुकेसाठी रानालाच साक्ष ठेवून कोडगेपणाने, अगतिकतेने होणारे देहाचे दान, असे कितीतरी अनुभव कवी महानोर मनःपूर्वकतेने टिपताना दिसतात. म्हणूनच हा संग्रह आजवरच्या कवितेहून अनोखा झाला आहे.

हे 'रान' म्हणजे डोंगर किंवा जंगलभाग नव्हे. तर 'रान' म्हणजे शेत. ह्या रानात मावळत्या सूर्याची सोनकिरणे मोठ्या प्रमाणात रंग भरताना दिसतात. मावळता सूर्य—त्याच्या काळोखाच्या विराट पंखाखाली पेंगुळणारे हे 'रान' अधिक गूढ व काव्यात्म बनते. सहा क्रमांकाची कविता ही ह्या संग्रहातील अत्यंत उत्तम व सच्ची कविता आहे; तर जागा सोडून परिशिष्टात छापलेली चौसष्ट क्रमांकाची कविता ही अत्यंत भुक्कड व 'बोगस' कविता आहे.

क्रमांक सहाच्या कवितेत काळ्या मातीत राबणाऱ्या भूमिपुत्राचा आयुष्यलेख महानोरांनी अतिशय रेखीवपणे पण संयमित शब्दात सादर केला आहे. पिकणाऱ्या शेताआधी रखरखीत ग्रीष्माला ह्या शेतकऱ्याला आधी तोंड द्यावे लागते. महानोर म्हणतात–

> ' ग्रीष्माचे ऊन्ह, ग्रीष्माचे ऊन्ह एकदा खेड्यावर आले
> खेडे उदास झाले, घरात असेल तेवढे झोळीत
> टाकून स्वतः नागडे झाले. '

अतिशय अलिप्त पण सूचक अशा प्रभावी अभिव्यक्तीची येथे जाणीव होते. काही साध्या ओळींनी ते दुःख किती गडद करतात–

> ' पाणवटल्या डोळ्यांनी गोऱ्या राजाचे महिमान गाणारी जख्ख म्हातारी
> मी पाहिल्या पासरीभरी ज्वारीवर भोग देणाऱ्या रूपवंत पोरी ! '

आणि हा अनुभव वाचणाराला मुळातूनच बधीर करतो.

महानोरांचे अनुभव हे वेगळे असले तरी त्यांना रेखीव करण्याकडे व सजवण्याकडेही त्यांचा खूप कल दिसतो. जांभळ्या रंगाचे त्यांना विशेष आकर्षण आहे.

> ' ...त्यात या जांभळ्या लुगड्याने तू अशी दिसतेस
> मोहाच्याही झाडाला मोह व्हावा ' (कविता क्र. ८)

कर्दळ, गव्हाचे थरथरणारे शेत, गाभुळी चिंच, मोहरलेला आंबा, शेलाट्या वेली, केळीचे बन, चवळीची शेंग, फुलांचा राजस शिणगार, गोबरे गाल, ओली पहाट, जुईजोंधळा, हिरव्या पानातले जावळ, घरी पाहुणा येणारा आभाळीचा पाहुणा चंद्र, अशा कितीतरी तऱ्हांनी आजुबाजूचा तृप्त निसर्ग कवी येथे साकार करतो. सगळे अनुभवविश्वच शृंगाराच्या पातळीवर नेऊन त्यात पूर्णपणे तादात्म्य पावण्याची किमया येथे महानोरांना अवगत झाली आहे.

आणखी एक गोष्ट रानातल्या कवितांबाबत तीव्रपणे जाणवते. श्री. महानोरांची अभिव्यक्तीची पद्धती परतंत्र आहे. बोरकर, ना. घ. देशपांडे, पाडगावकर, पु. शि. रेगे, मर्ढेकर आणि सुरेश भट ह्या कवींचे ठसे कितीतरी ठिकाणी दिसतात. शहरी वातावरणाचा पगडा ग्रामजीवन चितारू पाहणाऱ्या व्यक्तीला टाळता येत नाही हा आजवरचा अनुभव होता; पण खेड्यात राहणाऱ्या कवीलाही शहरी अभिव्यक्तीचा सफाईदारपणा टाळता आला नाही, हे विलक्षण समीकरण महानोरांच्या कवितेबाबत सिद्ध करता येते. पिवळे बांबू, गीतगंगा, कलती सांज, हर्षोन्माद, गंधगर्भ, रंगवेली, कातीर निळाई, गंधल्या मातीत, सांजल्या मनात, शब्दगाथा, चंद्रलेणे, हिमशुभ्र नितळ वृक्षावर चंद्रखुणा, स्वप्नांचे सुवर्णभांडार अशा कितीतरी आदर्शांचा, शहरी रूढ घटकांचा ह्या रानातल्या कवीने मुक्तहस्ताने स्वीकार व वापर केला आहे.

त्यामुळे ' राना 'चे पूर्ण प्रतिबिंब या रानातल्या कवितांमध्ये प्रकट होत नाही.

बहिणाबाई चौधरी अजूनही अजोडच राहते. इतकेच नव्हे तर हे 'रान' बरेच एकांगीही आहे. शेतकरी पण तृप्त. सघन शिवारातल्या पिकाच्या विविध विभ्रमात कवीला स्त्रीच्या तरण्या शरीराचा अभिसार दिसतो अर्थात ही चित्रे मात्र त्यांनी मोठी वेधक व बहारदार रंगविली आहेत.

महानोरांनी प्रचलित चलनी संकेत झुगारले पाहिजेत. तर त्यांचे 'लळा' लावणारे शेत सर्वांना ओढ लावील आणि मग 'त्याच्या हिरव्या बोलीचा शब्द जाहलो' या आपल्या ओळीचा आत्मविश्वासपूर्वक उद्घोष त्यांना करता येईल. महानोरांकडे ती ताकद आहे हे निर्विवाद.

**रानातल्या कविता : ना. धों. महानोर : पॉप्युलर प्रकाशन : किंमत ३ रुपये.**

# ग्रंथलय व्यवस्थेची रूपरेखा

## के. ह. बोरगावकर

लेखकाने दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने लिहीलेल्या मुखसंवादात म्हटल्याप्रमाणे या दुसऱ्या आवृत्तीत पुढील प्रकरणे नव्याने समाविष्ट केलेली आहेत. 'मुक्त-प्रवेश पद्धती' व 'ग्रंथालयीन व्यवस्था एक चिंतन' आणि प्रथमावृत्तीतील 'कागपत्रांची नोंद वही' व 'कपाटावरील ग्रंथांची मांडणी' ही स्वतंत्र प्रकरणे वगळून त्यामधील आशयाचा परामर्ष योग्य त्या प्रकरणात घेतला आहे. याशिवाय पुढील बाबींविषयी नव्याने माहिती दिलेली आहे. १) ग्रंथोपार्जनाचे धोरण, २) ग्रंथविक्रेत्याची निवड, ३) ग्रंथ खरेदीच्या अटी ४) दाखल नोंदीच्या पद्धती ५) नियमांची अंमलबजावणी ६) ग्रंथालय परिचय पुस्तिका ७) नियतकालीकांची खरेदी व त्याबाबतच्या समस्या व अटी ८) परिगणन व पुनर्शोधन ९) व्यवस्थापनाविषयी चिंतन, वाटचाल, मार्गदर्शक तत्वे व ग्रंथालयाच्या व्यवस्थेबाबत सूचना.

वरील माहितीशिवाय या दुसऱ्या आवृत्तीत प्रत्येक प्रकरणाचे शेवटी पुरवणी वाचनासाठी ग्रंथांची यादी दिलेली आहे. त्यामुळे अभ्यासू वाचकांची चांगलीच सोय झालेली आहे. ज्यांना या विषयातील विशिष्ट अंगाचा सखोल अभ्यास करावयाचा असेल त्या अभ्यासकांची या यादीमुळे चांगलीच सोय झालेली आहे. अभ्यासकला पाहिजे असलेल्या ग्रंथांच्या यादीसाठी त्याला धावपळ करावी लागणार नाही. तसेच प्रत्येक प्रकरणाचे शेवटी प्रमाणपत्रांच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र व पदवी परीक्षेच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र प्रश्न दिले आहेत. त्यामुळे अभ्यासकाची उत्कृष्ट सोय झाली आहे. प्रत्येक प्रकरणातील विषय अभ्यासकाला कळला किंवा नाही हे

समजण्याचे उत्तम साधन म्हणजे त्या प्रकरणावरील प्रश्न हे होय.

ग्रंथ निवडीचे तंत्र या प्रकरणात बहुतेक सर्व मुद्यांचा साकल्याने विचार केलेला आहे. मुद्दे सुटसुटीत दिले असून त्यांचे विवेचन अगदी थोडक्यात केले आहे. त्यामुळे प्रमाणपत्राच्या विद्यार्थ्यांना विषयाचे संपूर्ण आकलन होणे जरा कठीण जाईल असे वाटते. ग्रंथ खरेदीचे तंत्र, ग्रंथालय प्रसिद्धी, ग्रंथालयाचे नियम, मुक्त-प्रवेशपद्धती, देवघेव पद्धती, इत्यादी प्रकरणे अद्यावत असून माहितीपूर्ण आहेत. या प्रकरणातील कोणताही बारीक मुद्दा लेखकाचे विवेचनातून सुटलेला नाही. मराठीत अजून ग्रंथालयाची परिभाषा निश्चित झालेली नाही. म्हणून लेखकाने ज्या विषयाच्या परिभाषेबद्दल शंका वाटली आहे, त्या ठिकाणी त्या परिभाषेचा अर्थ स्पष्ट व्हावा यासाठी प्रचलित इंग्रजी परिभाषेचा उपयोग केलेला आहे. उदाहरणार्थ १) मूल्यांकनाबाबतचा करार– Net book agreement; २) जीर्ण झालेल्या पृष्ठांच्या दोन्ही बाजूस जिलेटीन कागद चिकटवून घेण्याचे क्रीयेस Reconditioning असे म्हणतात. ३) दाबाचा शिक्का. Embossing stamp; ४) पारदर्शक शिक्का–Perforating Stamp इत्यादी. यामुळे परिभाषा रूढ होण्यास चांगलीच मदत होईल असे वाटते.

प्रथम ग्रंथालयाची व्याख्या देऊन त्या व्याख्येतून ग्रंथालयाने व्यवस्थेचे स्वरूप कसे स्पष्ट होते याचे विवेचन केले असते तर या विषयांच्या अभ्यासकांना विषयाची कल्पना येण्यास चांगली मदत झाली असती व विषय चांगल्याप्रकारे कळला असता. लेखकाने ' पत्रिका ' हा शब्द अनेक ठिकाणी वापरलेला आहे. पत्रिके ऐवजी त्यानी जर ' पत्र ' हा शब्द वापरला असता तर अधिक चांगले झाले असते. कारण हल्ली ग्रंथालयातील सर्व नोंदी पत्रावरच करण्याची प्रवृत्ती वाढत चाललेली दिसते.

लेखकाने सुरवातीच्या सुखसंवादात म्हटले आहे की हे पुस्तक पदवी परीक्षेच्या विद्यार्थ्यांनाही उपयोगी पडेल. परंतु काही प्रकरणातील माहिती पदवी परीक्षेच्या दृष्टीने अपुरी वाटते. उदाहरणार्थ ' देवघेव पद्धती ' या प्रकरणात देवघेवीच्या ' द्विपत्र पद्धती ' व ब्राऊन पद्धती ' या दोन पद्धतींची फक्त माहिती दिलेली आहे. परंतु पदवी परीक्षेच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने निदान आणखी दोन पद्धतींची म्हणजे (१) डिकमन देवघेव पद्धती (Dickman charging system) व (२) फोटोग्राफिक देवघेव पद्धती (Photographic charging system), यांची तरी माहिती देणे आवश्यक आहे. ही उणीव या पुस्तकात वाटते. तसेच खारीज (Withdrawal) ही एक ग्रथालयातील महत्त्वाची नोंद आहे. व ग्रथ बांधणी ही सुद्धा एक महत्त्वाची बाब आहे. त्याची माहिती पदवी परीक्षेच्या दृष्टीने अपुरी वाटते. त्यांची खुलासेवार व सविस्तर माहिती दिली असती तर अधिक चांगले झाले असते.

बोधांकचिठ्ठी–याचे विवेचन करीत असताना बोधांक लिहिणेसाठी ' स्टायलस '

(Stylus) नावाचे एक साधन मिळते असा नुसता उल्लेख लेखकाने केलेला आहे. त्याची माहिती व ते कसे वापरावयाचे यासंबंधीचा खुलासा या ठिकाणी करावयास पाहिजे होता. तो त्या ठिकाणी लेखकाने केलेला नाही. त्यामुळे 'स्टायलस' या साधनासंबधीचे गुढ राहिलेले आहे. सध्या ग्रंथालयामध्ये बोधांक लिहिणेसाठी 'स्टायलस' या साधनाचा उपयोग करणेकडे अधिक कल आहे. तेव्हा त्याची संपूर्ण माहिती या पुस्तकात असणे आवश्यक वाटते. याची नोंद लेखकाने पुढील आवृत्तीच्यावेळी घ्यावी.

ग्रंथनेणेसाठी अनुज्ञापत्र व ग्रंथ राखून ठेवण्याची पद्धती यांचा विचार वास्तविक ग्रंथ देवघेव पद्धती यानंतर करावयास पाहिजे होता. परतु तो ग्रंथ देवघेव पद्धतीची पूर्व तयारी या प्रकरणात केला आहे. ग्रंथ नेणेसाठी द्यावयाचें अनुज्ञापत्र व ग्रंथ राखून ठेवणे या गोष्टी ग्रंथ वाचकास दिल्यानंतर करावयाच्या असतात, म्हणून त्यांचे विवेचन 'देवघेव' पद्धती यानंतरच करावयास पाहिजे.

यांनी वापरलेल्या परिभाषेसंबंधी पहिल्या आवृत्तीच्या पुरस्कारमध्ये श्री. वा. मु. मुळे यानी सविस्तर विवेचन केलेले आहे. त्यांचा आशय असा आहे की–'दैनंदिन लोक व्यवहाराशी संबंधीत- असणारे ग्रथालय एक शास्त्र असल्याने त्यात लोक भाषेतील नेहमीचे शब्द येणारच. त्यासाठी जड आणि भारदस्त शब्दांची नवी नाणी पाडावीत असा आग्रह सयुक्तिक ठरणार नाही–३०' श्री. कुलकर्णी यांनी आपल्या पुस्तकात वापरलेली परिभाषा सहज समजणारी नाही हे पुढील उदाहरणावरून स्पष्ट होईल.

(१) निविदा–Tender (२) संभाग–Sequence (३) देवघेव मेज–Counter (४) ग्रंथसंग्रह कक्ष–Stock-room (५) छोटेसे प्रदर्शन–Dis-play (६) खारीज पत्र–Withdrawal Register (७) खुणेची पद्धती–Dummy system इत्यादी सहज समजणारे नाहीत. त्यामुळे या पुस्तकातील परिभाषा जरा क्लिष्ट वाटते.

वरील काही उणीवा सोडल्यास हे पुस्तक मद्देसूद असून ग्रंथालयीन व्यवस्थेच्या सर्व अंगोपांगांचा यथोचित विचार केलेला आहे. लेखकाने सुखसंवादात लिहिल्याप्रमाणे ही दुसरी आवृत्ती पदवी परीक्षेच्या व प्रमाण परीक्षेच्या अभ्यासकांना, ग्रंथालयातील अधिकाऱ्यांना व ग्रंथपालांना उपयुक्त होईल यात शंका नाही. ग्रंथालयीन व्यवस्था या विषयावर मराठीतील हे उत्कृष्ट व एकमेव पाठ्य पुस्तक आहे याबद्दल दुमत असणे शक्य नाही. श्री. कुलकर्णी यांनी परीश्रमपूर्वक हे पुस्तक लिहून ग्रंथालयीन व्यवस्थेच्या अभ्यासकांची फार मोठी सोय केली आहे.

'ग्रंथालयीन व्यवस्थेची रूपरेखा' – लेखक वसंत विष्णू कुलकर्णी,
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

□

ढगांच्या थरातून अचानक जेट विमान इस्टर्न ८५३ ला सामोरे येते. परस्परांना टाळण्यालाही अवधी नसतो. एका क्षणात धडक बसते. मग उरतात फक्त दहा मिनिटे...

# अवघा दहा मिनिटांचा कारभार!

**जिप्सी मधुकान्त**

" कॅप्टन बोलतोय–

आपल्या विमानाला दुसऱ्या एका जेटने आताच पुसटती धडक दिलीय. कृपा करून पट्टे आवळा."

दोन तीन क्षणात पुन्हा–

" कंट्रोल गमावला आहे. लवकरच विमान जमेल तसे उतरवतो. प्रचंड धक्का असेल. तयारी ठेवा. मी गडबडीत आहे. पुन्हा सूचना द्यायला वेळ मिळणार नाही."

इस्टर्न एअरलाईन फ्लाईटचा कॅप्टन चार्ल्स व्हाईट धीम्या आवजात बोलत होता.

डिसेंबर १९६५ ची ४ तारीख होती. दुपारचे ४–१९ होत आले. न्यूयॉर्कच्या उत्तरेला सुमारे ५० मैलांवर झाडी प्रदेशावरून उड्डाण होत होते. प्रसन्न हवामान होते. अर्ध्या तासापूर्वीच नेवार्क–न्यू जर्सीकडे जायला विमानाने तळ सोडला होता. एअर ट्रॉफिक कंट्रोल टॉवरवरून कॉम्प्युटरने आदेश दिला. सहज नित्याप्रमाणे ते निघाले. अगदी सरधोपट मार्ग होता. ४९ उतारू आणि चार्ल्स व्हाईटचे चार सहाय्यक.

एक सहाय्यक किंचाळला–एक मोठे तांबडे पांढरे ट्रान्स वर्ल्ड एअरलाईन्सचे (T W A) चे जेट त्याने अगदी समोर उगवलेले पाहिले! त्याच्याच विमानाच्या दिशेने सुसाटत आले.

काही क्षणात इस्टर्न ८५३ च्या शेपटीचा चुराडा झाला. विमान गचकल्यासारखे झाले.

कॅ. चार्ल्स व्हाईटच्या ताबडतोब लक्षात आले. कंट्रोल ढळतोय. डावीकडे कलते होऊन विमानाने खाली सूर घेतला...त्याने ताबडतोब हालचाल केली. पण पंखाकडचा आणि शेपटीकडचा कंट्रोल साधत नव्हता. विमान लुळे पडले होते. सुरकांडी आवरता येणे अशक्य होते. त्याने त्वरित प्रवाशांना लाऊडस्पीकरवरून सूचना दिली.

आवाजात भीती नव्हती. भावना पाझरत नव्हती. कणखर अधिकारी वृत्ती.

नाना प्रकृतीचे व्यवसायाचे उतारू मजेत चालले होते. फादर पॅट्रिक हिले–सात वर्षांनी जपानहून सुट्टीवर आला होता. कॅथालिक धर्मगुरू होता. नौदलातल्या एका नर्सशी बोलत होता–मॅरिलीन श्रायबर–उंच आणि आकर्षक. बाजूलाच एक तरुण स्त्री आपल्या वर्षभराच्या मुलाला खेळवत होती. त्यांच्या मागच्या रांगेत जम्स बीअर्ड शेल होता–सेल्स एक्झिक्युटिव्ह. दुसऱ्या महायुद्धात त्यानेही B–२४ विमानावर पायलटगिरी केलेली होती. एका सपाट ढगावरून विमान चालले, त्याची त्याला थोडी आशंका होतीच. त्याच्या जवळचे एक युगुल आपल्यातच दंग होते. त्याचप्रमाणे त्या उतारूत काही इंजिनियर, वैज्ञानिक, व्यापारी प्रतिनिधी होते. एक स्त्री आपल्या आजारी आईला भेटायला निघाली होती. दोन बांधकाम कर्मचारी होते, एक जवाहिऱ्या होता, एक शर्टांचा विक्रेता, टोपाचा व्यापारी, त्याची बायको, दोन किनारपट्टीवरचे संरक्षक, एक नौदलातला वायुअधिकारी आणि काही तरणे नुकतेच भरती झालेले सैनिकही होते.

कार्मेलच्या नाविकतळावरून, न्यूयॉर्कवरून १० हजार फूट उंचीवरून जाण्याचा आदेश टॉवरवरून चार्ल्स व्हाईटला मिळाला होता.

दुसऱ्या रांगेतली अर्थशास्त्रज्ञ अॅलेटा स्टायर्स स्वतःशीच संध्याकाळच्या अपॉईंटमेंटबद्दल विचार करत होती. त्याचवेळी न्यूयॉर्कच्या केनेडी विमानतळावरून ताशी ४०० मैल वेगाने T W A चे जेट ४२ निघाले होते. कार्मेलच्या तळावरून त्यालाही वळण घ्यायचे होते.

## सारे एकाच क्षणी घडत होते...

न्यूयॉर्कपासून ६० मैलांवरच्या एअर रूट ट्रॅफिक कंट्रोलच्या टॉवरवर डेव्ह रिचर्डसन आणि मेल सुसमन हे रडार आणि रेडिओ ऑपरेटर स्कोपवरून निरीक्षण करीत होते. इस्टर्न फ्लाईट ८५३–चार्ल्स व्हाईटला त्यांनी ओळखले.

"दहा हजार फुटावरचे हे ईस्टर्न ८५३ च आहे ना?"–सुसमनने विचारले.

"तेंच ते"–डेव्ह.

"ओ. के. तर मग T W A ४२ जेट ला मी ११ हजार फुटांवरून जाण्याचा आदेश देईन."

रडारवर दोन ठिपके उमटत होते. पण धोका वाटत नसल्याने त्या जोडीने फिकिर केली नाही. विमानांची नेमकी उंची मापण्याचे निरीक्षण–साधन अद्यापही संशोधनान्ती उपलब्ध नव्हते. त्यांना खरी उंची कळू शकली नाही.

"पहा पहा..."

चार्ल्स् व्हाईटचा मदतनीस, इस्टर्नच्या कॉकपिटमधील राजर होल्ट ओरडला... त्याच क्षणी चार्ल्सला नि त्याला कळून चुकले–टक्कर अटळ आहे...कंट्रोलकडे ते झेपावले. त्याच क्षणी T W A च्या जेटनेही त्यांना पाहिले. उजवीकडे वळून वर जाण्याची जेटने धडपड सुरू केली.

हे सारे एकाच क्षणी घडत होते.

चार्ल्स व्हाईटही वर चढत होता ! अंतर ठेवणे आता आवाक्यात नव्हते.

अखेरच्या क्षणी त्यांनी एकमेकांच्याविरुद्ध दिशेला विमानं वळवली.

फुलकोबीच्या गड्डयांसारख्या दिसणाऱ्या ढगांच्या पुंजक्यांनी निर्माण झालेला संभ्रम दोघांनाही भोवला. एका पातळीवर यायचे नाही, अशी कसोशी करूनही भ्रामक क्षितिज रेषेने ते एकाच रेषेत आले असतील आणि इतक्या नजीक की, पातळीची दखल घ्यायला, चूक दुरुस्त करायला त्यांना वेळच मिळाला नाही. त्या दोघांनी किंवा त्यापैकी एकाने दुसऱ्याला पाहिले नसते–तर बरे झाले असते... (असे मागाहूनच्या अधिकृत अहवालात नोंदण्यात आले.)

पण घोटाळा तेथेच झाला. जेटच्या डाव्या पंख्याने इस्टर्नच्या शेपटीचा घास घेतला. जेटलाही तो पंखा गमवावा लागला. पण नेटाने ते केनेडी तळावर पोचू तरी शकले.

रडार कंट्रोलवर सुसमन–रिचर्डसनला काही धोका संभवत नव्हता. पण जेटने त्वरित संदेश धाडला ! सुसमन उडालाच..." अरे देवा, या जेटने धडक दिलीय ! डेव्ह, तू ईस्टर्नकडे पाहतोय ना, त्याचे कसे काय ?"

"ईस्टर्न ८५३. न्यूयॉर्क सेंटर, तुमची काय खबर ?" डेव्हने त्वरित विचारणा केली.

पण काहीच उत्तर नाही. पुन्हा पुन्हा विचारूनही थांग लागेना. तेव्हा नक्की काहीतरी धोका संभवल्याची त्यांची खात्री पटली.

## ते दुसरे विमान कोसळेल बिचारे...

मात्र ईस्टर्नला बसलेला धक्का आतल्या उतारूंना तेवढासा जाणवला नाही. हादरा निश्चितच होता. पण ती एक उसळण असावी, अशी त्यांची कल्पना. बेर्ते पिचान्ती खिडकीबाहेरच्या ढगांचे छायाचित्र घेण्यासाठी म्हणून आपला कॅमेरा सरसावून बसला होता–पण त्याच्या आड मध्येच जेट सुसाटून गेले.

'धडक दिलीय' तो ओरडला.

'खरंच का ?' ऑलिटा स्टायर्सने विचारले.

'तो आपली गंमत करतोय,' जेफ क्लाईनने तिला समजावले!

फादर हीलेंना वाटले, आपल्या विमानाने दुसऱ्या छोट्या विमानाला धडक दिलीय. ले. थाईबरशी ते कुजबुजले. 'ते दुसरे विमान कोसळेल बिचारे.'

पण ईस्टर्न ८५३ वरच खरी गदा आली होती! आणि अवघ्या दहा मिनिटा-तच सारा निकाल लागणार होता.

## विमानाची कंट्रोल-यंत्रणा बेकाम

कॅ. चार्ल्स व्हाईटने आपले विमान आधीच कमाल कोन साधून वर झेप घेतली होती. टक्कर टाळण्यासाठी. पण परिणामी ते अशा अवस्थेला पोचले की आणखी कोन घेता येणे अशक्यच झाले. काही क्षण ते वर गेले. मग अटळ होते ते घडले. क्षणार्धं ते थबकले आणि सुरकांडी घेतली... कॅ. चार्ल्स व्हाईटने सारे कौशल्य पणाला लावले.

त्याच्यामागे इंजिनियर एमिल ग्रीनवे होता. चार तांबडे फ्लॅश झालेले त्याने समोरच्या असंख्य दर्शकयंत्रांवर पाहिले. विमानातला हैड्रॉलिक दाब नष्ट झाला होता! आणि तबकडीवर काटा दाखवत होता. तेलही संपत आलेले. त्याने धोक्याची सूचना दिली. चट्दिशी चार्ल्स व्हाईटने थ्रॉट्ल्स पुढेमागे ओढून निष्फळ प्रयत्न केले. त्याची खूप आवश्यकता होती. पण विमानावर ताबा मिळवता आला नाही. केबल्स तुटल्या.

चार्ल्सच्या प्रयत्नाने खाली सुरकांडी घेतानाही विमानाचा वेग वाढतच होता. विमानाच्या पुढच्या भागावर अधिक भार पडला होता. ते डावीकडेही कलले होते. त्याचे भविष्य आता तर्काची बाब नव्हती!

अशा क्षणी घेतल्या जाणाऱ्या कृतीत, निर्णयात अवघ्या जीवनभरचे 'सॅक्शन' असते. अकस्मात क्षणातून ते निर्माण होत नसते. अशी अंतिम कसोटी देणारा हा कॅ. चार्ल्स व्हाईट कोण होता?

न्यूयॉर्कच्या एका पोलिस डिटेक्टिवचा तो मुलगा. लहानपणापासूनच विमानांची मॉडेल्स तो बनवत असे. १९ वर्षी अमेरिकन विमानदलात बी–२४ कमांडर्स मधला तो सर्वात तरुण कॅप्टन होता. जर्मनीवरच्या अनेक हल्ल्यात त्यानेही भाग घेतला. युद्धानंतर मुलकी वायुसेवेत त्याने काम चालू ठेवले होते. त्याच सुमारास संध्याकाळच्या वर्गांना जाऊन पदवीही त्याने प्राप्त करून घेतली. सध्या त्याचे वय ४२ वर्षांचे होते. एक कन्या आणि दोन लहान मुलं होती त्याला.

त्याचे वर्णन 'एक टिपिकल कॅप्टन' म्हणूनच करत. उड्डाणातले विशेष कौशल्य आणि यंत्रांचे 'फील' त्याच्या अंगी होते. आणीबाणीच्या क्षणी यंत्रावर काबू मिळवण्यात त्याची ख्याती होती.

ते सारेच आता परीक्षा पहाणार होते. धडक दिल्यावर सुमारे वीस सेकंद पसार झाले होते. (आणि तशीच अवस्था असती तर उरलेल्या वीस सेकंदात ते

धुळीत मिळणार होते) त्याच्या मदतनीसाने विचारले, 'पॉवर कशी काय आहे?'

पण त्याचा विचार करायला वेळ नव्हता. त्याने वेग वाढवला. या रीतीने विमानाचे नाकाड थोडे तरी वर उचलले जायला हवे. ढगांच्या थरातून ते खाली उतरले. हिवाळयातले धुकट वातावरण होते. खालच्या टेकडयांवरची झाडी दिसत होती. तीन हजार फुटांवर नाकाड थोडे वर सरकले. पण थोडयाच वेळात पुन्हा कोसळले.

एक जाहिरात एजंट खाली आपल्या बागेत काम करीत होता. हे लुळे-चुरडले विमान वरखाली होताना त्याच्या नजरेस पडले. धावतच बायकापोरांना त्याने घरातून बाहेर काढले. घराच्या रोखाने एखाद्या खडकासारखे ते विमान कोसळत होते...

पण कॅप्टन चार्लस व्हाईट आपले सारे कौशल्य पणाला लावून अंशत: नियंत्रण ठेवू इच्छित होता. थ्रॉट्लसच्या नेमक्या अॅक्शनने त्याने कोसळण्याचा झपाटा सावरला. नाकाड सरळ झाले. आता पुन्हा वर जाणे शक्यच नव्हते. विमान डावीकडे कलत घिरटया घेत होते. पुन: पुन्हा थ्रॉटलसवर काबू मिळवत चार्ल्स समतोल साधायची कोशीस करीत होता. त्यात थोडेफार यश आले. याच धडपडीत त्याने मघाशी प्रवाशांना धोक्याची सूचना देऊन टाकली.

एक स्त्री जोराने किंचाळली. पण कुणीतरी तिला गप्प केले. ती लगेच सावरली. कुणीच काही बोलत नव्हते. श्वास रोधले गेले. आता काही क्षणांचाच अवधी राहिला आहे याची उतारूंना जाणीव झाली. डोक्यात विचित्र गोंधळ सुरू होता प्रत्येकाचा. शांत रहायचा आणि एकमेकाला धीर द्यायचा प्रत्येकजण प्रयत्न करीत होता. तातडीने जीव वाचवायच्या संरक्षक हालचाली करणे आणि प्रार्थना करणे, एवढेच त्यांच्या हाती होते.

## आमच्यावर नजर ठेवा

एव्हाना अडीच-तीन मिनिटे पसार झाली. कॉकपिट मधला ग्रीनवे जगाला देता येईल तेवढी माहिती देत होता. आता कुठे रिचर्डसन आणि सुसमनला त्याचा आवाज ऐकू आला! कप पावलेल्या जलद स्वरात ग्रीनवे सांगत होता. 'आम्ही कंट्रोल गमावला आहे. खाली कोसळतोय. ७ हजार फुटावर आहोत.'

कंट्रोलर रिचर्डसनने त्वरित सर्वच तळांना ऐकण्याचा आदेश दिला. पण ईस्टर्न ८५३ च्या फ्रिक्वेन्सीवर अडथळा येऊ नये म्हणून त्या वेव्हवर शांत रहायला सांगितले. रडारवर तो चार्लसचे विमान पहात होता.

४.२४ वाजता – म्हणजे धडकेच्या पाच मिनिटानंतर – ग्रीनवेने पुन्हा रेडिओ संदेश सुरू केले. यावेळी तो थोडा शांत वाटला. कॅ. चार्लसच्या धडपडीने त्याला काहीशी आशा वाटली असावी. म्हणून त्याने केनेडी विमानतळाचा मार्ग विचारला. जवळपास उतरायला तोच एक उत्तम रनवे होता. पण...विमान खालीच येत होते.

'आता जास्तीत जास्त काय कोशीस होते ती पहायची' कॅ. चार्ल्स म्हणाला, 'आमच्यावर नजर ठेवा. कुठे जमिनीवर टेकतो का ते पहा.'

## मृत्यूचे तीन मार्ग

खालच्या झुडपी टेकड्यांकडे पाहताना कॅ. चार्ल्सपुढे तीन मार्ग होते–१) तसेच समोर जायचे. एका टेकडीला ठोकरून थांबता येत होते. समोर मार्गच खुंटत होता. २) उजवीकडे वळून एका तळ्यात उतरायचे, ३) डावीकडे वळण घेऊन आणखी काही सेकंद घालवत, जागा पहायची. 'त्या तळ्याची तेवढीशी फिकिर नाही.' मदतनीस म्हणाला, 'पण कितीक जीवंत राहतील कोण जाणे?'–समोरची ती उंच चढणही काही वेगळे मार्ग सुचवणार नव्हती! डावीकडे एक कुरणासारखे दिसत होते – तिकडे कॅ. चार्ल्सने मोर्चा वळवला. उतारूंना अखेरचा इशारा दिला. 'सांभाळा, आता आलोच आपण'–ग्रीनवेने विद्युत-तारेचे कनेक्शन तोडले. खालचे मैदान मोकळेच होते. पण तीन मुलं जात होती. त्यांच्याच दिशेने येणारे ते विमान–! कडेच्या एका दगडी भिंतीच्या आडोशाला ती लपली. पळायची फुरसत नव्हती. मैदानात समोर दोन घरे होती आणि एक कोठार. मैदानाचा वापर करायचा तर या घरांना अगदी स्पर्शूनच पुढे जावे लागणार. छपराखाली २० घोडे होते. दोन सईस, एक झाडूवाला आणि १४ वर्षाचा मुलगा होता. छप्पर फोडून विमान आत घुसल्यासारखे त्यांना वाटले. सारेच बाहेर पळाले.

कॅ. चार्ल्स अखेरची कसरत करत होता. विमानातले थ्रॉटल्स त्याने न्यूट्रल केले. पण नाकाड वर करणे भाग होते. एक क्षणाचा उशीर झाला असता पुन्हा थ्रॉटल्टची ॲक्शन घ्यायला, तर मैदान सटकले असते. मग आगीच्या लोळातच! आणि सेकंदाचा उशीर झाला असता तर दणक्यात विमान कोसळत होते.

मदतनीस होल्टने क्षणात सारे ताडले. त्यानेही शर्थ केली. पण कॅ. चार्ल्सने आधीच तो क्षण टिपला होता. सर्व एंजिने पुऱ्या शक्तीने त्याने सुरू केली. त्याची ही किमया अपूर्व होती.

विमानाचा खालचा भाग जमिनीवरच्या गवताला घासून जाऊ लागला तेव्हा डावा पंख चार फुटावर एका झाडाला आदळला. पंखाचा चुरा झाला. परिणामी पुढे झेपावून विमान टेकडीला आदळला. स्फोट झाला. ज्वाला उसळली!

आता साडे नऊ मिनिटे झाली होती.

स्फोटानंतर साराच ग्रंथ आटोपला. तुकडे तुकडे पसरले.

टेकडीच्या ७०० फुटावर आणि मुलांपासून १५० फुटावर ते विमान कोसळले होते.

सुरुवातीला ज्वाला कमी होत्या. पण जळणाऱ्या टाक्या फुटून त्यांनी भीषण रूप घेतले. जवळच रहाणारे एक निष्णात सर्जन डॉ. जेरे लॉर्ड आपल्या पत्नीसह तेथे धावत आले. "मी औषधाची बॅग आणू का" म्हणून ती विचारत होती...

" पण या आगीतून कुणी वाचेल असे वाटत नाही." डॉ. उत्तरले आणि पुढे सरसावले मदतीला.

त्या तीन मुलांपैकी एक डॅनी विल्यमसनने भितीआडून डोंगराएवढे धुराचे लोट पाहिले. त्याचे वडील विल्यम विल्यमसन न्यूयॉर्कच्या सिटी फायर डिपार्टमेंटमध्ये लेफ्टनंट होते. त्यावेळी तेथेच होते. ते धावत आले. विमानातल्या माणसांना बाहेर पडायला मदत करू लागले. थोड्याच वेळात त्यांना निकोलस मोन्ताना नावाचा डेअरीवाला येऊन मिळाला. लवकरच सर्वत्र खबर गेली. पोलीस, ॲम्ब्युलन्स, धावत आले. पण नंतर आलेल्यांसाठी खास असे काम राहिले नव्हते...

## विमान फुटून उघडे पडले

आतल्या उतारूंनी जिवाच्या आकांताने बाहेर पडायची धडपड सुरू केलीच होती. त्या मानाने त्यांना फारशी इजा झाली नव्हती. पण ज्वाळांची भीती होती.

त्या सर्वांच्या सुदैवाने अखेरच्या क्षणी एक गोष्ट झाली होती–विमानाचा बराच मोठा भाग चांगला रुंदावून फुटला होता. त्यामुळेच बाहेर पडणे शक्य होत होते. दाराखिडक्यातून उडी मारण्यापेक्षा या मोकळ्या जागेतून त्यांना लवकर बाहेर पडता आले. नाहीतर......

ती टेकडी आता जखमी उतारूंनी भरून गेली होती. कुणीतरी तबेल्यातून त्यांच्यासाठी ब्लँकेट्स आणली. डॉ. जेरे लॉर्डनी त्वरित औषधांची बॅग बोलावली! आणि प्रथमोपचार सुरू केले. जखमांवर मलमपट्टी केली.



थोड्याच वेळात डझनभर अॅम्ब्युलन्सेस आणि एक हेलिकॉप्टर येऊन पोचले.

एप्रिली ग्रीनवे कॉकपिटमधला एंजिनिअर—त्याचा हात तुटला होता अखेरच्या क्षणी कनेक्शन तोडताना. त्याला काहीच आठवत नव्हते नंतरचे दोन दिवस. होल्टला सुद्धा बाहेर पडताना बरीच दुखापत झाली होती. दोन दिवस तो बेशुद्धच होता. अनेक टाके घातले त्याला.

## कॅप्टनची कथा-तीस सेकंदातली

पण कॅ. चार्ल्स व्हाईटचे काय झाले ?

असा अंदाज केला जातो की सुरुवातीला त्याला विशेष दुखापत झाली नसावी. किती कौशल्याने त्याने दहा मिनिटे मृत्यूशी झुंज घेतली होती ! तरी अखेरचा नाश टळला नाही. या अपघातातले दोन उतारू तेवढे प्राणास मुकले, बाकीचे पन्नास जण कॅ. चार्ल्स व्हाईटच्या पराक्रमाची गाथा सांगायला आजही आहेत.

कॅ. चार्ल्सचे नेमके काय झाले, ते मात्र कुणाला आठवत नव्हते. विमानातून तो बाहेर येऊ शकत होता. आपला जीव वाचवू शकत होता. पण वैमानिकांचाही एक अलिखित नियम आहे. अपघातात सर्वात शेवटी कॅप्टनने बाहेर यायचे. आधी आतल्यांना मदतीचा हात द्यायचा. कॅ. चार्ल्स कॉकपिटमध्ये नव्हता. उतारूंच्या केबिनमध्ये आढळला. सर्व पुराव्यानिशी असे म्हणता येते की बाहेर पडायला अन्य तीन मार्ग असूनही त्याने आपले अखेरचे कर्तव्य केले. ३० सेकंदानी ज्वाळानी त्या दुर्दैवी उतारूंबरोबर-फ्लकरबरोबर त्याचाही घास घेतला.

त्याची आई म्हणायची, चार्ल्सने कधीही कातडीबचाऊपणा केला नव्हता. तो म्हणायचा : " माझं विमान कधी कोसळलं तर माझ्या आधी इतरांचे तर पाहीनच, पण प्रेतांनाही पॅरॅशूटने खाली पाठवून नतरच मी उतरेन !" त्याच्या शब्दांना मोल आले त्याच्या प्राणानेच. अखेर प्रायव्हेट फ्लकरचे एका उतारूचे सीट बेल्ट सोडता सोडताच त्याला मृत्यूने गाठले. फ्लकर एकटाच उरला होता. असे दिसते की, कॅ. चार्ल्सला त्याला मदत करण्यात यश आले होते, तो डावीकडे वळणार तेवढ्यात...विषारी ज्वाळांनी आपले घास घेतले.

दहा मिनिटे पूर्ण झाली होती !

कॅ. चार्ल्स व्हाईटवर मरणोत्तर सन्मानाचा वर्षाव झाला. त्याच्या कुटुंबासाठी अनेकांनी मदत केली. आता त्याचा लहान मुलगा-स्टेव्ह-वायुदलात दाखल झाला आहे. स्टेव्ह पायलट झाला. हा चार्ल्सचा मोठाच सन्मान आहे.

□ □ □

# क्रीडांगण

नरेंद्र दाभोलकर

## अखिल भारतीय कबड्डी स्पर्धा

# जय भवानी सोलापूर

उन्हाळी मोसमातील कबड्डी हंगामाचा नारळ सोलापुरात जय भवानीच्या मैदानावर फुटला. दहा हजार प्रेक्षकांनी मोठ्या हौसेने त्याला साथ दिली

मध्यंतरी चार वर्षे बंद पडलेला क्रीडामहोत्सव जय भवानी मंडळाने चालू केला याबद्दल त्यांचे अभिनंदन. कबड्डी क्षेत्रातील ही एक चांगली परंपरा आहे. जे संघ महाराष्ट्रातली अनेक मैदाने स्वतः गाजवितात ते आपल्या सामन्याचे मैदान गाजविण्यासाठी दुसऱ्या संघाना आमंत्रित करतात. मुंबईचा विजयबजरंग, सांगलीचा तरुणभारत, पुण्याचा राणाप्रताप ही याची उदाहरणे. विजयबजरंगची चांगली परंपरा गेले दोन वर्षे खंडित झाली आहे. याउलट तरुणभारतने मध्यंतरी बंद पडलेली परंपरा पुन्हा मोठ्या मानाने चालू केली आणि यंदा रौप्यमहोत्सवी सामने ते भरवीत आहेत. जय भवानी संघाचे हे सामने भरविण्याचे सोळावे वर्ष.

सोळावं वरीस काही सामने भरविणाऱ्या संघाला धोक्याचे नसते. पण यंदा मधल्या काही वर्षांच्या पोकळीपुढे सोलापुरकरांना थोडा त्रास झाला खरा. महाराष्ट्रातील बरेचसे नामवंत संघ या सामन्यात उतरू शकले नाहीत. सर्व खर्चाची व्यवस्था सोलापुरकरांनी स्वीकारल्यावर यापेक्षा अधिक भरघोस प्रतिसाद त्यांना मिळायला हवा होता.

ब गटात मुंबईच्या ओम बजरंगला बडगी (हुबळी) श्रीकृष्ण मं. सोलापूर याचा पराभव करण्यास फारसा त्रास पडला नाही. मात्र श्रीकृष्णच्या राम गायकवाडने त्यांना चांगले झुंजविले. ब गटात होते अवघे दोन संघ. शिवशक्ती आणि बाळीवेस मंडळ सोलापूर यांच्यातला हा सामना अगदी एकतर्फी झाला. बाळीवेसच्या

नावाजलेल्या संघाचा गेले काही वर्षे दर्जा घसरत चालला आहे. क गटात मुंबईचा विश्वशांती संघ होता अंजुमन आणि सिद्धेश्वर हे दोन्ही या गटातले अगदीच नवखे संघ. त्याच्यांबद्दल न लिहिणे बरे. स्थानिक संघाना आपल्या गावात अ. भा. पातळीवरील स्पर्धा भरत असताना भाग घावा हे एक सर्वमान्य धोरण आहे. पण तरीही संघाच्या दर्जाबाबत काही किमान पातळी नको का? सामन्यांचा दर्जा कमी होतो की नाही, याचा विचार नक्कीच व्हावयास हवा. मुंबईमध्ये कबड्डीचे सुमारे सहाशे संघ आहेत. त्यापैकी काही थोडे संघ अ दर्जाचे मानले जातात. काही निवडक स्पर्धांतच हे संघ भाग घेतात. आणि इतर अनेक स्पर्धा ह्या ब दर्जाच्या संघासाठीच फक्त खेळवल्या जातात. मंबईबाहेर अशी विभागणी थोडी अवघड असली तरी ती झाली तर स्वतःचा दर्जा टिकवण्यासाठी आणि नसलेला दर्जा मिळवण्यासाठी. त्यामुळे निकोप स्पर्धा चाल होऊन कबड्डीचे काही भले होईल अशी शक्यता निश्चितच आहे.

ड गटातला तरुणभारत व्यायाम मंडळ सांगली आणि बालवीर भैय्या हा सामना रंगला. खरे म्हटले तर सर्व गटातल्या साखळी पद्धतीच्या सामन्यात एवढ्याच सामन्याने काय ते नेत्रसुख दिले. मागीलवर्षी वाळीवेसच्या सामन्यात स्टेट बँकेच्या बलाढ्य संघाला उपांत्य फेरीत नामोहरम करणारा हा संघ. भारतीय रेल्वेच्या संघातला [खंदा खेळाडू अंबादास यामधून खेळतो. तरुणभारतचा संघ महाराष्ट्रातला जुना आणि नामवंत. या सामन्यामध्ये सुरुवातीच्या वर्षात लागोपाठ दोनदा अजिंक्यपद मिळवलेला. तरुणभारतला पहिल्यापासूनच पिछाडी तोडण्याचा प्रयत्न करावा लागला. त्यांच्या कोपरारक्षक मोरेने अंबादासला अवघ्या तीन खेळाडूत पायात सूर मारून अप्रतिम पकडले. तेही दोनदा. त्यामुळे संघ सावरला आणि अनिल दलवाईला चढाईत एकदम मिळालेल्या गुणाने हा हातातून निसटणारा विजय तरुणभारतला मिळवता आला. या लोनमधून छ. शिवाजी व्यायामशाळा आणि तरुणभारत हे दोन संघ बाद पद्धतीच्या सामन्यात गेले.

बाद पद्धतीच्या उपांत्यपूर्व आणि उपांत्य फेरीत आमच्या लाडक्या कबड्डीचे सारे दोष आणि मर्यादा उघडचा झाल्या. छत्रपति व्यायाम शाळा विरुद्ध ओम बजरंग, वाळीवेस सोलापूर विरुद्ध विश्वशांती मुंबई, श्रीराम संघ सोलापूर आणि तरुणभारत सांगली आणि शिवशक्ती मुंबई व श्रीकृष्ण सोलापूर असे उपांत्यपूर्व फेरीचे चार सामने. हे सर्व सामने कमालीचे एकतर्फी झाले. पहिला गुण एकदा हातात आल्यानंतर पोलादी क्षेत्ररक्षणाच्या जीवावर तो टिकवन सामना सहजपणे एकतर्फी जिंकणे हे तंत्र आता महाराष्ट्रातल्या अनेक संघांना सहज साध्य झाले आहे. नाव घेण्यासारखे चढाईबहाद्दर नवीन वीस-बावीसच्या पिढीत क्वचितच तयार होताना दिसतो त्यामुळे मग हे तंत्र अधिकच सोपे झाले आहे. याचा नेमका उलटा परिणाम खेळाच्या रंगतदारपणावर होतो. पहिला गुण हा निर्णायक ठरत

असल्याने तो न गमावण्यासाठी संथ व बचावात्मक खेळाचा पवित्रा दोन्ही संघाकडून घेतला जातो. त्यातही कोंडी फोडण्यासाठी एखाद्या खेळाडूने असा उत्साह कोणी दाखवला आणि तो अपयशी झाला तर त्याचा संघ बहुधा हमखास हार खातो आणि मग तो फुकटचा दोषाचा धनी ठरतो. उपांत्य सामन्यात असे झाले. तरुणभारत व्यायाम मंडळाच्या बच्चू हजवाईने पहिल्या काही मिनिटातच शिवशक्ती संघाच्या परशुराम कांबळीच्या पायात सूर मारला. आणि दुर्दैवाने त्यांच्या संघाला दोन गुण गमवावे लागले. आणि त्यानंतर पुढची तीस मिनिटे याच गुणसंख्येवर रटाळ, रडी कबड्डी खेळली गेली. सामन्यात रंगत यावी म्हणून बच्चूने केलेल्या प्रयत्नांचे हेच यश काय? पहिला गुण जाऊ नये म्हणून आधी नामर्दपणे खळणारे संघ बघायचे आणि पहिला गुण केल्यावर एकतर्फी चुरसहीन सामने बहुतेकवेळा बघायचे. अशी मोठी विचित्र कोंडी सध्या कबड्डीची होऊन बसली आहे. खेळाच्या विकासावर अनेक उपक्रम करणारी महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन या प्रश्नावर क्रीडा रसिकाने संतापावे इतकी उदासिन आणि निष्क्रिय आहे. सध्या तरी चमकदार कबड्डी बघण्यासाठी क्रीडारसिकांना नशिबावरच हवाला ठेवायला लागतो

सोलापूरकर हे मनापासूनचे कबड्डी शौकीन आहेत. बहुधा त्या इच्छाशक्तीनेच

---

## काहीतरी कारण काढून होणाऱ्या गोंधळाने

संस्थानिकाने पदरी मल्ल बाळगावेत तसे मोठ्या कंपन्या हल्ली नावाजलेले कबड्डीचे खेळाडू नोकरीस ठेवतात. तीन चार खाजगी संघातले खेळाडू एका संघात. तुलनेने कमकुवत असलेले खाजगी संघ त्यामुळे व्यावसायिक संघापुढे क्वचितच टिकाव धरतात. स्वतःच्या संघातून खेळात मोठे व्हायचे, नावाला यायचे आणि कंपनीत नोकरी मिळाली की पुन्हा आपले त्या संस्थेने नवीन खेळाडू तयार करावयाला सुरुवात करायची. शिवाय तो खेळाडू जरी संघातून खेळला तरी तो एकटा संघ झुंजवायला कितपत टिकाव धरणार. खाजगी संघाच्या वाढीवर हे मोठेच आक्रमण अप्रत्यक्षपणे होऊन बसले.

महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनने मग नियम केला की सामने भरविणाऱ्या संघानी फक्त खाजगी संघाचे वा फक्त व्यावसायिक संघावेच सामने भरवावेत. सरमिसळ करू नये. यामुळे बेजोड लढत टळेल आणि खाजगी संघ वाढतील ही अपेक्षा. त्याचप्रमाणे एका वर्षी व्यावसायिक सामने भरविले तर दुसऱ्या वर्षी खाजगी संघाचे सामने भरवावेत असाही नियम केला.

ऑगस्टमध्ये हे नियम करताना वा त्यानंतर आतापर्यंतही याबाबत कोणी

नशिब त्यांना अनुकूल झाले असावे. कारण पुरुष, महिला व वजनी गटातील तीन्हीही अंतिम सामने अत्यंत प्रेक्षणीय झाले.

शिवशक्ती आणि ओम बजरंग हा मुंबईच्याच दोन संघातील सामना अपेक्षेपलीकडे रंगला. पांडुरंग साळुंखेला ओम बजरंगच्या मध्य रक्षकाने काढलेला एकेरी पट फसला आणि हातात आलेल्या गुणाच्या साह्याने शिवशक्तीने ओम बजरंगवर पुरे लोण लावले. हा लोण फिरवताना निदानरेषेवर आणि चढाईचा जो खेळ विरोधी संघाने केला तो पैसे वसूल करणारा होता. वेगवान, हलती ताकदीचा योग्य उपयोग करणारी आनंद गंभीरेची जी चढाई त्यालाच सर्वोत्कृष्ट चढाईच्या खेळाडूचे सुवर्णपदक मिळाले ते योग्यच असे सिद्ध करणारी होती. ओम बजरंगने हा सामना जिंकला, प्रेक्षकांना काही दर्जेदार पहावयास मिळाल्याचे समाधान लाभले.

विभागातले महिलांचे सामने असेच अगदी एकतर्फी झाले. सन्मित्र संघ मुंबई, वाल्मिकी संघ मुंबई या दोन संघात काहीच राम नव्हता. महिलांचे संघ कमी पडत असल्याने त्यांना वरून आणले असावे. साधना केंद्र पुणेने त्यांना सरळसरळ हरविले. ब विभागात नवयुग संघ मुंबई आणि चेतना क्रीडा मंडळ सोलापूर हे दोनच संघ. सुरुवातीच्या काही मिनिटात चेतनाच्या हेमलता पाटीलने केलेल्या दोन पकडी

---

## ना खेळाडूचे भले होणार ना खेळाचे

शब्द काढला नाही. पण संघांना आमंत्रण देणे चालू झाले आणि एकदम गोंधळ उडाला. मागच्या वर्षी मिरजेच्या सामन्यात अजिंक्य असलेला बँक ऑफ महाराष्ट्र यंदा तेथे खाजगी संघांचे सामने असल्याने जाऊ शकेना. तर सांगलीला यंदा रौप्यमहोत्सवी सामने पण व्यावसायिक. त्यामुळे मागच्या वर्षीच्या लक्ष्मीमाता संघाला तेथे कसे जाता येणार. सांगलीकरांना तर मधू पाटीलचा खेळ बघायची इच्छा. तीही त्याच्या संघातून.

या सामन्यातून वादाला सुरुवात झाली. थोडी कटुता आली. आव्हान प्रति आव्हानाची भाषा वापरली गेली. याचा फेर विचार व्हावा असा आग्रह पुढे आला. ऑगस्टमध्ये ठरावाला पाठिंबा देणारेच आता त्याच्यामागे ठरावावर टीका करू लागले.

ऑगस्टनंतर आताच ही जाग कोठून आली? योग्य दिशेने होणाऱ्या प्रयोगक्षमतेला विरोध का? यावेळच्या सामन्याचे निष्कर्ष बघून पुन्हा पुढच्या वर्षी बदल करण्याची मुभा आहेच ना? मग वंडाची भ पा कशाला?

प्रश्न आहे कबड्डी खेळ आणि त्याबरोबर खेळाडू आणि संघ वाढण्याचा. इतर फालतू गोष्टींना महत्त्व देऊन आणि त्यासाठी काहीतरी कारण काढून होणाऱ्या गोंधळाने ना खेळाडूंचे भले होणार ना खेळाचे. □

---

आणि तिनेच बाद केलेले तीन गडी यामुळे सामना रंगला पण ही आघाडी चेतना टिकवू शकली नाही.

साधना केंद्र आणि नवयुगचा अंतिम सामना मात्र चांगलाच रंगला. साधनाचा संघ ताकदीने आणि खेळानेही सरस होता. संघनायक जोशी पहिल्यापासूनच खोल चढाया करत होती. साधना घारियाचीही तिला चांगली साथ होती. मुंबईचा संघ चढाईत कमी असला तरी क्षेत्ररक्षण भक्कम होते. जयश्री कदमची पकडीची पद्धत प्रेक्षणीय होती. सामना चांगला रंगला पण अपेक्षेप्रमाणे साधनाची क्रीडासाधना फळाला आली.

११५ पौंडाखालीलच्या वजनी गटात मागच्या वर्षाच्या स्टॅंडर्ड मिल या मुंबईच्या विजयी संघाला विकास मंडळ येळगी संघाकडून हार खावी लागली. गंगाराम घाणेकर आणि गजानन लाड या त्यांच्या दोन्ही खेळाडूंची चढाई उत्कृष्ट असूनही विकास मंडळाची प्रगती रोखू शकली नाही. त्यातच मधेच घाणेकरच्या पायाला दुखापत झाल्याने मागील वर्षीच्या विजेत्याला उपांत्य फेरीतच गारद व्हावे लागले.

जय महांतवीर सोलापूर संघाला अंतिम सामन्यात भीमराव कोशीकरच्या चढाईने चांगली एका लोणाची आघाडी मिळाली होती. पण हे सारे पारडे येळगी-करांनी फिरवले. सौदागरच्या चढाईचा त्यांना खूप उपयोग झाला. तुकाराम सुर्य-वंशींची पाठीमागून पळत जाऊन पाठ पकडण्याची पद्धत एवढी अप्रतिम होती की, शिवा पवारची आठवण व्हावी.

जेवणाची व्यवस्था आणि तीही उत्कृष्ट करून सोलापूरकरांनी खेळाडूंना खूष करून टाकले. गंमत म्हणून त्यांनी भोजन मंडपाबाहेर वही ठेवली होती, मते नोंद-विण्यासाठी. सर्वच शेरे चांगले लिहिण्याचे एक आश्चर्य त्या वहीत नोंदवले गेले. पण भोजनव्यवस्था त्या प्रशंसेला पात्र होती खरी.

बक्षिस समारंभातल्या दोन गोष्टी मला खटकल्या. महिलांचे सामने संपल्यावर त्यांचा बक्षिससमारंभ घाईने उरकून टाकण्याचो काय गरज. लगेच होणारा पुरुषांचा सामना झाल्यावर दोन्ही सामन्यांचा बक्षिस समारंभ एकत्र करणे उचित नाही का? तसेच पुरुषांच्या अंतिम सामन्याच्या मध्यंतराच्या वेळी सुमारे वीस पंचवीस मिनिटे रासक्रीडा आणि लेझीम यासाठी देण्याची काहीच गरज नव्हती. सामन्यानंतर हा कार्यक्रम सहज घेता आला असता. दोन डावातला नियमाप्रमाणे असलेला पाच मिनिटाचा वेळ वाढविणे हे खेळाडूंना आणि प्रेक्षकांना कोणालाच आवडण्यासारखे नाही.

असो. कबड्डी मोसमाची 'पहिली भवानी' जय भवानीच्या सामन्याने सोलापूरात झाली. आता त्यातून निर्माण झाले वातावरण सातारा, मुंबई, सांगली, औरंगाबाद, बंगलोर येथील मैदानावर कसे कसे आकारत गेले ते दिसेलच.

□ □ □

# रंगभूमी

शरद गोखले

श्रवणीय प्रयोग

## वैरीण झाली सखी

राज्य नाटयमहोत्सवामध्ये या वर्षी पुण्याने मिळवलेले यश कौतुकास्पद आहे. हिंदी, खुल्या, संस्कृत व संगीत अशा चारही स्पर्धांतून पुण्यातील नाटयसंस्थांनी यश मिळवून हौशी क्षेत्रातील आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. संगीत स्पर्धेमध्ये पुण्याच्या भरत नाटय मंदीर या संस्थेने सलग दुसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक मिळवला आहे. या वर्षी संस्थेने संजीव शेंडे यांनी लिहिलेले वैरीण झाली सखी हे नाटक सादर केले होते.

ययाति–देवयानी–शर्मिष्ठा यांच्या जीवनातील नाटय नाटककाराला मोह पडावा असे आहे. उत्कृष्ट नाटककाराचीही कसोटी लागावी असा हा विषय नाटकाचे तरुण लेखक संजीव शेंडे यांनी अगदी साधा सरळ गोष्ट सांगावी अशा पद्धतीने व संगीताला भरपूर वाव राहील अशी दक्षता घेऊन हाताळला आहे. नाटक लिहीत असतानाच ते संगीत स्पर्धेमध्ये सादर होणार आहे याची जाणीव असावी असे वाटते. मर्यादित उद्देशाने लिहिलेल्या या नाटकाला गद्य नाटकाच्या कसोट्या लावण्याचे कारण नाही. मात्र तरीही एकही व्यक्तिरेखा ठसठशीत उभी करण्यात नाटककार यशस्वी झालेले नाहीत हे नमूद करावे लागेल. भाषा सामर्थ्याचा अभाव आणि अनुभूतीचे मर्यादित क्षेत्र यामुळे विषयाला मानवतील, शोभतील, पेलतील अशा ताकदीचे संवाद नाटककार देऊ शकलेला नाही. कथा प्रवाही ठेवण्यामध्ये मात्र तो यशस्वी झाला आहे.

लेखनाचा उद्देश जसा मर्यादित, तसा प्रयोगाचा उद्देशही मर्यादित आहे. स्पर्धेचे उद्दिष्ट डोळ्यासमोर असल्याने पात्रयोजना त्या पद्धतीने करण्यात आली आहे.

प्रभाकर करंदीकर (ययाति), कुसुम शेंडे (शर्मिष्ठा) व शंकर घाणेकर (कच)

या कलाकारांवर संगीताची जबाबदारी पडली असून त्यांनी ती समर्थपणे उचलली आहे. संगीत आघाडीवर यशस्वी ठरलेल्या या कलाकारांच्या अभिनयातील आणि संवादफेकीतील मर्यादा चांगल्याच जाणवतात. या तिघांमध्ये या बाबतीत त्यातल्या त्यात समाधान कुसुम शेंडे देतात. रंगमंचावरील त्यांचा वावर मात्र त्रासदायक वाटला.

जयश्री फडणीस यांनी देवयानीची अवघड भूमिका भरपूर मेहनत घेऊन व भूमिका नीट समजवून घेऊन केल्याने त्यांचे काम झाले. लेखकाला अभिप्रेत असणारे सर्व बारकावे त्यांनी यशस्वीपणे दाखवले. शुक्राचार्यांच्या छोट्या भूमिकेत अजित धारपुरे यांनी निराशा केली. भूमिकेचा पोच त्यांना सांभाळता आला नाही. वृषपर्वा राजाची छोटी भूमिका वसंतराव देशपांडे छान करून गेले.

नाटकाचे संगीत ही त्याची मुख्य बाजू–छोटा गंधर्व व बाळ माटे यांनी ही जबाबदारी उचलली आहे. मंगेश पाडगावकर यांच्या काही अर्थवाही गीतांना त्यांनी दिलेल्या चाली वेधक आहेत. विशेषत: शर्मिष्ठेचे प्रणयिनी आज झाले, अशा अर्थाचे गीत, आणि कचाच्या तोंडचे तिसरे गाणे यांचा उल्लेख करावा लागेल. संगीताची यशस्वी बाजू हेच नाटकाच्या स्पर्धेतील यशाचे गमक मानावे लागेल.

निर्मितीची जबाबदारी भरत नाट्य मंदिराने यशस्वीपणे पार पाडली आहे. नेपथ्य, प्रकाशयोजना, ध्वनीसंकलन, या तांत्रिक बाजू नाटकाची गरज पूर्ण करणाऱ्या होत्या. परिश्रमपूर्वक बसवलेला, श्रवणीय प्रयोग म्हणून वैरीण झाली सखी दीर्घकाल लक्षात राहील. ◻

### एक सुमार फार्स

## जावयाला जेव्हा जाग येते

श्रीकांत मोघे – एक चांगला नट, पुष्कळ दिवसात रंगभूमीवर न दिसलेला. 'जावयाला जेव्हा जाग येते' हे नाट्यश्रीचे नवीन नाटक पाहण्यामध्ये एका बऱ्यापैकी स्कोप असलेल्या रोलमध्ये श्रीकांत मोघे पहावयास मिळावेत अशी अपेक्षा होती. राज्य नाट्यमहोत्सवामध्ये नाटक पाहिलेले असल्याने प्रयोगाबाबत फारशी उत्सुकता नव्हती. तथापी ज्या उद्देशाने नाटक पहावयास गेलो तो उद्देश पुर्णांशाने सफल झाला नाही. कारण रत्नाकर आणि अशोक अशा दुहेरी भूमिकेत मोघे अपेक्षेइतका आनंद देऊ शकले नाहीत.

जावयाला जेव्हा जाग येते हा एक सरळ सरळ फार्स. कथानकाला फारशी गती नसल्याने, आणि फार्सला अभिप्रेत असलेली संवाद, लेखनपट्टी न जमल्याने प्रयोग

कंटाळवाणा होतो. तात्या आणि सावित्री या दांपत्याची एकूलती एक कन्या माधवी प्रेमविवाह करते. जावई रत्नाकर घरी येतो तो घरजावई म्हणूनच. जावयाला घरात गड्याइतकी किंमत मिळत नाही. रत्नाकर संधीची वाट पहात असतो. आणि एक संधी मिळाल्याबरोबर तो फायदा घेतो. संकटात अडकलेले तात्या आपली सर्व इस्टेट रत्नाकरच्या नावाने करून देतात. आणि मग हा जागा झालेला जावई अन्य सर्वांना खडबडून जागा करतो. वास्तवतेच्या कसोटया फार्सला लावू नयेत हे मान्य केले तरी लेखकाने येथे कथासूत्र उभारण्यासाठी ज्या सवलती घेतल्या आहेत त्या केवळ हास्यास्पद म्हणाव्या लागतील.

लेखनाच्या दृष्टीने फसलेले असे हे नाटक. नाटयश्रीचे कलावंत त्यांच्या परीने जिवंत करण्याचा प्रयत्न करतात. सर्वात महत्त्वाची कामगिरी श्रीकांत मोघे बजावतात. अशोक आणि रत्नाकर अशा दुहेरी भूमिकेत सहजतेने वावरतात. त्यांच्या संवाद-फेकीतील 'मोनोटोनी' त्रासदायक आहे. त्यांनी प्रारंभापासून दाखवलेला अशोकचा 'मनमोकळेपणा' पटणारा नाही. सर्व कलावंतामध्ये त्यांना जास्त संधी आहे आणि ते उत्तम वाटत नसले तरी ठीक वाटतात.

अलीकडील मराठी चित्रपटातून वारंवार दिसणारी नयनतारा माधवीचे काम छान करते. पडद्यापेक्षा रंगमंचावर ती दिसतेही चांगली, आणि कामही सहज सफाईने करते. भोलाराम अठवले यांचा तात्या, आणि कुमुद दामले यांची सावित्री ठीक आहेत इतकेच. भिकूचे काम करणारा कलावंत या दोघांच्या मानाने बरा वाटला.

नेपथ्य, प्रकाश योजना, आदिबाबीत आढळणारी गुंतागुंत मुळीच नाही. एक साधा दिवाणखान्याचा ३५–४० सालापासून चालू असलेला सेट एकदा ठोकला की तिसऱ्या अंकाचा पडदा पडेपर्यंत बघायला नको. म्हणजे निर्मितीच्या दृष्टीने नाटक कमी खर्चाचे. नाटकाचा विषयही साधा समजण्यास सोपा. कलावंतांच्या तारखा हातात पडल्या की मुंबईपासून कोणत्याही तालुका प्लेसपर्यंत नाटक खुशाल पळवावे. प्रयोग संख्या फुगवावी. आणि यथाक्रम नवीन निर्मितीकडे जावे.

प्रयोगाला व्यवसायिक नाटकाचा दर्जा नाही हे येथे नमूद केलेच पाहिजे आणि अशा या प्रयोगाला पुण्या-मुंबईच्या परिसरात रसिकाश्रय मिळण्याची शक्यता नाही.

प्रतिनिधी

# चित्रपट

समाधानकारक

## घरकुल

परस्परांबद्दल वाटणारा गाढा विश्वास आणि निस्सीम प्रिती यावर वैवाहिक जीवनाचे घरकुल उभे असते. या विश्वासाला जर तडा गेला तर आपला अपमान झाला, आपण सर्वस्वाला मुकलो अशी भावना निर्माण होऊन घरकुलाचे चैतन्य हरपते, क्वचित प्रसंगी ते कोलमडून पडते.

छोटयाशा घरकुलामध्ये निर्माण झालेल्या अशाच एका गंभीर वादळाचे चित्रण यशवंत चित्र या संस्थेच्या ' घरकुल 'मध्ये पहावयास मिळते. स्वतःच्या घरावर, पत्नीवर, मुलाबाळांवर त्याचे प्रेम असते. जुन्या आयुष्यावर पडदा टाकून त्याने हे चिरेबंदी घरकुल उभे केलेले असते. आपल्या या छोटयाशा घरकुलात तो रमून गेलेला असतो. – पत्नी माहेरी गेलेली असते, कोणा जुन्या दोस्ताबरोबर तो सरळ कोठीवर जातो. गोव्याकडून नकत्याच आलेल्या गुलाबच्या मोहात पडतो. नको ती चूक होऊन जाते. या चुकीसाठी आपल्या सर्वस्वाचे बलिदान करण्याची त्याची तयारी नसते. कठोर बोलून तो गुलाबला दूर करतो. मनातल्या मनात जळत असतो, तरी घर सावरल्याचे समाधान असते. घरात पत्नी आणि दोन छोटया मुली यांच्याबरोबर आयुष्य सुरळीत जात असते आणि बाहेर त्याचाच छोटा मंगेश मोठा होत असतो. त्याच्याच पैशाने–त्याच्या देखरेखीखाली–फक्त घराबाहेर. हे असेच चालू राहते तर प्रश्न नव्हताच. खोटया समाधानात राहणाऱ्या अनेक घरांप्रमाणे हे एक घर झाले असते. पण नियतीला ते मंजूर नव्हते. छोटया मंगेशचा या घरकुलात प्रवेश होतो. वादळाची चाहूल लागते. पण तो स्वस्थच असतो. ही स्वस्थता अखेरीस नडते आणि जीवापाड कष्ट घेऊन उभे केलेले घर कोसळून पडण्यासारखी परिस्थिती निर्माण होते. या नवीन परिस्थितीचा मागोवा घेत चित्रपट पुढे सरकतो आणि तो जसा संपावा अशी अपेक्षा असते, अगदी तस्साच संपतो.

या पद्धतीची ही कथा चित्रपटासाठी नवीन नाही. चित्रपटातून, नाटकातून अशा पद्धतीचे कथानक अनेक वेळा येऊन गेले आहे. चित्रपटातील सर्वात नाटयपूर्ण प्रसंग सही सही उद्याचा संसार, या आचार्य अत्रे यांच्या नाटकातल्यासारखा आहे. फरक

असेल, तर तो अत्र्यांचा विश्राम, आणि या चित्रपटा ल नायकांच्या परस्परविरोधी व्यक्तिचित्रणामध्ये. उद्याचा संसारमधील प्रसंग अधिक स्वाभाविक आहे. इथे तो ओढून ताणून आणला आहे. स्वतःचा मुलगा कोठे आहे, काय करतो, यावर बारीक लक्ष ठेवणाऱ्या या चित्रपटाच्या नायकाला–औरस मुलगी आणि अनौरस पुत्र यांच्या प्रेमसंबंधाचा व त्यातून निर्माण होणाऱ्या विवाहशक्यतेचा हा प्रसंग निश्चित टाळता आला असता. कथेचा अस्वाभाविक परिपोष हा चित्रपटाचा मोठा दोष आहे. याच दोषामुळे प्रेक्षक प्रसंगाशी समरस होऊ शकत नाहीत.

वाचायला ठीक वाटणाऱ्या ग. वा. बेहेरे, यांच्या या कथेवरून शं. ना. नवरे यांनी पटकथा लिहिली आहे. संवादही त्यांचेच आहेत. मूळ कथेतील दोष पटकथेत कायम आहेत. शं. ना. चे संवाद मात्र छान आहेत. – साधे, सोपे अगदी सरळ घरगुती भाषेतील. दिग्दर्शक या नात्याने राजा ठाकूर यांनी उत्तम कामगिरी बजावली आहे. मूड लायटिंग योजून अनेक गंभीर प्रसंग त्यांनी परिणामकारकरित्या चित्रीत केले आहेत. – पती आपल्या पापाची कबुली पत्नीजवळ देतो तो प्रसंग छान जमवून आणला आहे. 'द हाऊस विथ द बांबू डोअर' या गाण्याचे चित्रीकरण संपूर्ण अमराठी पद्धतीने केले आहे. त्यांनी केलेली पात्रांची निवडही चांगली आहे. – लिलाधर मयेकर या नवीन नटास त्यांनी भरपूर संधी दिली आहे. त्याचा लाभ मात्र त्याला उठवता आला नाही. कथा विषयाशी प्रामाणिक राहून त्यांनी चित्रपट हाताळला आहे. कोळ्याच्या घरातील नाजूक प्रसंगाचे चित्रीकरण त्यांनी प्रसंगाला आवश्यक असणारे काही धाडसी शॉटस् (निदान मराठी चित्रपटासाठी तरी) घेऊन मोठ्या खुबीने केले आहे.

गुलाब जोगिया गाते तो प्रसंग असाच 'डेलीकेट'. राजा ठाकूर यांनी पुरेपूर परिश्रम घेऊनही

मलमली तारुण्य माझे तु पहाटे पांघरावे,
मोकळ्या केसात माझ्या तु जिवाला गुंतवावे,

या सुंदर गीताच्या पाठोपाठ येणारा जोगिया प्रेक्षक ऐकून घेत नाहीत. चांगल्या प्रसंगाचे खोबरे होत असले, तरी ते होते आहे. हे राजा ठाकूर यांच्यासारख्या सकळकाच्या तरी लक्षात यावयास हवे होते. हे संपूर्ण गीत काढून टाकावे.

कलाकारांपैकी अरुण सरनाईक, जयश्री गडकर आणि शरद तळवलकर यांची कामगिरी उत्तम आहे. रजिताने गुलाबची छोटीशी परंतु अवघड भमिका मन लावून केली आहे. दुर्दैवाने छायालेखक मनोहर आचार्य यांनी तिच्यावर गंभीर अन्याय केला आहे. तिच्या पहिल्या गीताच्या वेळचा 'बीग क्लोज अप' अक्षरशः भयावह आहे. तिला अधिक चांगले अँगल्स मिळणे आवश्यक होते. नंदाची भूमिका करणारी नयनतारा ठीक आहे इतकेच.

पृष्ठ ६३ वर

# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

८ ते १४ मे १९७१

**मेष** : शरीरप्रकृती जरा नरम राहील. धनस्थानी शनी येत आहे. तो दशमेश आहे व त्यावर अष्टमातील गुरू पाहात आहे. जमिनीचे येणारे पैसे आपोआप मंगळवार बुधवारी हातात पडतील. स्वभावात थोडीशी रगेली येईल. घरात धार्मिक समारंभ होईल. एजन्सीचे काम करणारांचा व्यापार चांगला चालेल. यात्रा एजन्सीवाल्यांना अमाप फायदा होईल.

विद्येत संपूर्ण यशप्राप्ती होईल. विद्वत्तेचं सरकारकडून कौतुक केलं जाईल. सरकारी कामात संपूर्ण यशप्राप्ती होईल. संततीचा उत्कर्ष होईल. दशमातील मंगळ अचानक अनपेक्षित मान-मान्यता मिळवून देईल. भागीदार नीट वागणार नाहीत. फॅन्सी व्यवसायातील व्यक्तींना व्यापारात थोडी माघार घ्यावी लागेल. मातुळ घराण्याकडून सर्व बाजूनी मदत होईल. शुभ तारखा ८।९।१०।१३।१४

**वृषभ** : शरीरप्रकृती चांगलीच राहील. ३६ च्या पुढील वयाच्या व्यक्तींना अत्यंत प्रगतीचे दिवस आहेत. कलावंतांना आपापल्या व्यवसायात मान मान्यता मिळेल. भागीदारांकडून संपूर्ण सहकार्य मिळून प्रवासात लाभदायक घटना घडतील. धनस्थानची स्थिती अत्यंत हलाकीची होईल. विद्येत अपयश येईल. संतती करता पैसा खर्चावा लागेल. गृहसौख्याने व्यत्यय येईल.

मामाकडून अगर सासऱ्याकडून उद्योग धंद्यात मदत होईल. गुरू-शुक्राचा ९।५ योग सर्व बाबतीत प्रगती घडवील. २७ ते ३२ वयाच्या मुलींना आपोआप मागणी येऊन प्रेमविवाह होण्याचा योग आहे. व.'ब' आणि 'अ' खेरीज स्वरानी ज्या मलीची व्यवहार नावे सुरू असतील त्यांना हा योग मंगळवारी बुधवारी यण्याचा योग आहे. इंडिकेटची राशी आहे. सर्वसप्ताह शुभफलदायी आहे.

**मिथून** : शरीरप्रकृती चांगली राहील. भावंडांकडून सर्व तऱ्हेची मदत होईल. विशेषत: शिक्षणाचे बाबतीत. धार्मिक समारंभाकरता पैसा खर्च होईल. गृहस्वास्थ्य चांगलेच राहील. संततीकडून भाग्योदयकारक गोष्टी घडतील. सरकारी कामात चांगल्या घटना घडतील. थोडासा अपचनाचा विकार वाढेल. पत्नीशी थोडा मतभेद होण्याचा योग गुरुवार-शुक्रवारी आहे.

विद्याभ्यासात चांगलेच प्रगतीकारक दिवस आहेत. तत्वज्ञान, साहित्य, कला या

विषयाचा अभ्यास करणाराना सरकारकडून प्रोत्साहन मिळेल. भाग्येश शनी व्ययात आहे. तो भाग्यावर स्वगृहावर भाग्यास्थानावर पाहात आहे. याचे फळ ३६ वयाचे पुढील व्यक्तिना अनपेक्षित रीतीने मिळेल. शत्रूंचे काही एक चालणार नाही. वडील भावंड अगर मामाकडील कोणीतरी बरेच आजारी पडण्याचा योग आहे. लक्ष्मीच्या तसबीरीचे दर्शन घ्यावे. शुभतारखा ८।९।१२।१३।१४

**कर्क :** शरीरप्रकृती साधारण राहील. मानसिक त्रास फार होईल. भागिदारांकडून नुकसानकारक गोष्टी केल्या जातील. वडिलार्जित स्थावर संपत्ती बाबतच्या भाऊबंदक्या मिटतील. त्याकरता चालू असलेल्या सरकारी कामात तडजोड होईल. घरातील सर्व मंडळी एकत्र येऊन दिवस आनंदात जातील. हा अनुभव सोमवारी रविवारी येईल.

विद्याभ्यासात भरपूर यश मिळेल. मेडिकल सायन्स शिकणाऱ्यांना दिवस प्रगति पथावर नेणारा आठवडा आहे. ४२ वयाच्या पुढील व्यक्तिला नवीन संशोधन करण्याचा योग आहे. संततीकडून त्रसदायक वागणूक होईल. मामांचे मार्फत केलेल्या प्रयत्नाला यश येऊन भाग्योदय होईल. गुरु-शुक्रांचा त्रिकोण सर्व बाबतीत यशस्वी करील. सामाजिक दर्जा प्राप्त होईल. शुभ तारखा ९।१०।११।१२।१३।१४

**सिंह :** शरीरप्रकृती अत्यंत चांगली राहील. धनस्थिती सर्व बाजूनी सुधारेल. मित्र व वडिल भावंडे साहाय्यक होतील. घरात शुभ समारंभ होईल. दत्त भक्ताना साक्षात्कार होण्याचा योग आहे. मनात घातकी विचार प्रबळ होतील. रविवार-सोमवार हा अनुभव येईल. अचानक धनलाभ होईल. पत्नी माहेरून परत येईल त्यामुळे व्यवसाय धंदा नीट चालेल.

घरातील वृद्ध नातलग आजारी पडण्याचा योग आहे. विद्येत भरपूर यश येईल. संततीचा भाग्योदय होईल. सरकारी खात्यात असलेल्या मुलाला मालकीचे घर करण्याचा योग येईल. अचानक धनलाभ होईल. उद्योग धंद्यात जरा मंदी येईल. सरकारी कंत्राटदाराना आठवडा चांगला आहे. शेतकी खात्यातील वरच्या अधिकाऱ्यांना परदेश गमनाचा योग येईल सबंध सप्ताह शुभफलदायी आहे.

**कन्या :** शरीर प्रकृतीला चांगलाच तडाखा बसेल. ३२ ते ३६ वयाच्या व्यक्तीना याचा अनुभव जास्त येईल. धनस्थानची स्थिती चांगलीच राहील. गुरु-शुक्रांचा त्रिकोण अत्यंत शुभ फलदायी आहे. कलाकाराना प्रवासात पैसा जास्त मिळेल, शत्रूकडून सुद्धा मोठेपणा मिळण्याला मदत होईल. बौद्धिक व्यवसायिकांना अपयश येईल.

विद्याभ्यासात संपूर्ण यशप्राप्ती मिळेल. अॅग्रिकल्चरल कोर्स घेणाऱ्यांना प्रगतीपर दिवस आहेत. संततीचा उत्कर्ष होईल, सरकारी कामात मनासारखे घडणार नाही. घरात काहीतरी धार्मिक शुभ समारंभ घडून येईल. हा योग मंगळवार-बुधवारी जास्त आहे. गुरुवार-शुक्रवार पाव्हणे मंडळी येऊन दिवस आनंदात जातील. शुभतारखा ९।१०।११।१२

तूळ : शरीरप्रकृती फारच चांगली राहील. हातून पराक्रम घडेल. अचानक धनलाभ होईल. धनस्थिती चांगलीच सुधारेल. शनिवार-रविवार सार्वजनिक कार्यात भाग घ्यावा लागेल. त्यात सन्मान होईल. गृहस्वास्थ बिघडेल. भावंडांकडून सर्व बाबतीत मदत होईल. सरकारकडन येणारी रक्कम गुरुवार-शुक्रवारी हातात पडेल.

विद्याभ्यासात अपयश येईल. शास्त्रीय विषय अगर तत्वज्ञानाच्या अभ्यास करणाराना अनेक अडचणी येतील. पंचमश शनी व कारक गुरू यांचा दृष्टीयोग आहे. त्यामुळे आयत्यावेळी थोडीशी प्रगती होईल. वाचा शुद्धी कमी होईल. वाणीत कठोरपणा येईल धंदा व्यवसाय फारच चांगला चालेल. सर्वसप्ताह शुभफलदायी आहे.

वृश्चिक : शरीरप्रकृती चांगली राहील. प्रवासयोग येईल तो टाळावा. हातून पराक्रम घडेल. धनस्थानची स्थिती चांगली राहील. बुद्धीच्या जोरावर पैसा प्राप्त होईल. गृहस्वास्थ्य चांगले राहील. जमीन अगर राहण्याच्या जागेबद्दल काहीतरी चांगला निर्णय लागेल.

विद्याभ्यासात यशस्वी होण्याचा शुभयोग आहे. कलाकाराना दिवस प्रगतीपथानेणारे आहेत. संततीचा उत्कर्ष होईल. शत्रू नाश होईल. सरकारी नोकरांना फार दगदग पडेल. काम जास्त वेळ करावे लागेल. भावडांकडून अडचणी निर्माण होतील. धार्मिक कामाकरता प्रवास घडेल. शुभतारखा ९।१०।१३।

धन : शरीरप्रकृती नरम राहील. धनस्थानची स्थिती चांगली राहणार नाही. अनेक खर्च भागविणे कठीण जाईल. भावंडांकडून मनःस्ताप होणाऱ्या गोष्टी होतील. घरात काहीतरी शुभसमारंभ होण्याचा योग आहे. अचानक धनलाभ होण्याचा शनिवार रविवारी योग आहे.

विद्याभ्यासात अडचणी उत्पन्न होतील. मेकॅनिकल अगर मिलिटरी शिक्षण कोर्स करणाराना दिवस जास्त त्रासदायक आहेत. शत्रूनाश होईल. प्रवास योग सरकारी कामाकरता येईल. त्यात सर्वप्रकारचा फायदा होईल. सरकारी शिक्षण खात्यातील नोकराना पगारवाढ होईल. वाणीत कठोरपणा येईल तो आवरावा. शुभतारखा ९।१०।१३।१४

मकर : शरीरप्रकृती चांगली राहील. धनस्थानची स्थिती चांगली राहील. काळा बाजार वगैरे वाममार्गानी भरपूर पैसा व मान मरातब मिळेल. सर्वेगुणः कांचनमाश्रयानी" साहित्याकरता प्रवासयोग येईल. त्यात चांगल्या घटना घडतील. गृहस्वास्थ्य चांगले राहील. मधून मधून डोक्यात विचित्र विचार येतील. शनिवारी भागिदाराशी मतभेद होईल.

विद्याभ्यासात संपूर्ण यश येईल. विद्यार्जनाकरता प्रवासयोग घडेल. सन्मित्र भेटतील. अचानक धनलाभ होईल. वरची जागा मिळून पगारवाढ होईल. प्रत्येक कामात प्रगती होईल. फॅन्सी वस्तूंचे व्यापारी, पेन्टर, प्रसाधनांचे व्यापारी यांना गुरु शुक्रांचा त्रिकोण अमाप पैसा मिळवून देईल. शनिवारी पत्नीकडून सर्व प्रकारचे सहाय्य मिळून दिवस आनंदात जाईल. शुभतारखा ८।९।१०।१३।१४.

कुंभ : शरीरप्रकृती चांगली होईल. शनी लग्नेश सुखस्थानात आला आहे तो चांगला आहे. त्याचे समोर दशमात गुरु धनस्थानावर पाहतो आहे. धनस्थिती चांगली होईल. प्रवास टाळावा. गृहस्वास्थ्य चांगले राहील. घरासंबंधीचे अनेक प्रश्न चांगल्या रीतीने सुटतील. पत्नी व भागिदार चांगले वागतील. बुध्द रवी पराक्रमात आहेत. हातून सत्कृत्य घडेल.

विद्याभ्यासात संपूर्ण यश प्राप्त होण्याचा योग आहे. सरकारी अनुदान मिळण्याचा योग आहे. आध्यात्मिक विचार मनात गोंधळ उत्पन्न करतील. कलाकारांना भाग्यो दयकारक व धनदायक आठवडा आहे. व्यापारधंद्यात अनेक संकटे निर्माण होतील. मशिनरीचे व्यापारी औषधाचा व्यापार करणारे यांना दिवस वाईट जातील. सर्व सप्ताह शुभफलदायी आहे.

मीन : शरीरप्रकृती चांगली राहील. लग्नी अष्टमेश शुक्र अचानक धनलाभ देईल. भावंडाची मदत होईल. प्रवासयोग टाळावा. मंगळवार बुधवार काही धार्मिक कामात भाग घ्यावा लागेल. घरात समाधान नांदेल. सरकारी कामात यशप्राप्ती होईल. विद्येच्या जोरावर मानमान्यता मिळेल. तत्वज्ञान विषयक चर्चेत भाग घ्यावा लागेल.

विद्याभ्यासात यश येईल. तत्वज्ञानांचा अभ्यास करणाराना दिवस प्रगतीपर आहेत. संततीकडून रविवारी सोमवारी त्रासदायक वागणूक होईल. मानसिक त्रास जाणवेल. शत्रूनाश होईल. सासुरवाडीकडून पैशाची मदत होईल. बौद्धिक व्यवसाय करणाराना नवीनवीं क्षेत्रे निर्माण होतील. शुभतारखा ९।१०।१२।१३।१४ □ □ □

## घरकुल

पृष्ठ ५९ वरून

चित्रपटाची निर्मिती सी. रामचंद्र यांनी केली आहे. चित्रपटाचे संगीतनियोजनही त्यांचेच आहे. हिंदी चित्रपट सृष्टी गाजवून सोडणाऱ्या चितळकरांनी मराठी चित्र निर्मितीकडे वळावे ही घटना स्वागतार्ह आहे. आपल्या चित्रपटाची संगीताची बाजूही त्यांनी छान सांभाळली आहे. चित्रपट विषयाशी अतिशय सुसंगत असणारे आणि राजा ठाकूर यांनी मोठ्या छान पद्धतीने चित्रीत केलेले 'पप्पा सांगा कुणाचे' हे गीत सी. रामचंद्र यांनी सुंदर चालीत बांधले आहे. चित्रपटातील सर्वच गीतांना त्यांनी चांगल्या चाली दिल्या आहेत. त्यांच्या चालीत बांधून निघालेले 'मलमली तारुण्य माझे' दीर्घकाल लक्षात राहील.

चित्रपटाच्या अन्य तांत्रिक बाजू समाधानकारक आहेत. या चित्रपटाला कर-मुक्ती मिळावी असे वास्तविक काहीही नाही. परंतु महाराष्ट्र शासन सध्या कर-मुक्तीच्या बाबतीत भलतेच उदार झाले आहे. त्याचा लाभ याही चित्रपटाला मिळाला ही चांगली गोष्ट आहे. आणि करमुक्त नसता तरी 'घरकुल' एकदा पाहण्यास हरकत नाही. तो समाधानकारक आहे निश्चित. □ □ □

रशियन राज्यक्रांतीविषयी प्रचारात्मक साहित्य विपुल आहे. उजेडात आलेल्या नवीन माहितीच्या आधारे लिहिलेला मराठीतील हा मात्र एकमेव ग्रंथ आहे.

# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

अठरा रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. M-H 649

# अग्निपुत्र

हिंदुस्थान सोशॅलिस्ट
रिपब्लिकन आर्मीचे
धुरंधर सेनापती
आणि सैनिक
यांच्या
हौतात्म्याची
वीरगाथा

वसंत पोतदार

मूल्य चौदा रुपये
राजहंस प्रकाशन